# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र

# समकालीन राजकीय समस्या

## (Contemporary Political Issues)

**सत्र २ : पेपर C-04**

(शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१९

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर C-04 (आवश्यक)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-52-6

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र

अध्यक्ष – **प्रा. डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. प्रकाश पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण–इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अनिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज–४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग एक च्या राज्यशास्त्र विषयाच्या आवश्यक पेपर क्रमांक C-04 सत्र दोन साठी 'समकालीन राजकीय समस्या' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

समकालीन राजकीय समस्या यामध्ये स्त्रीवाद आणि लिंगभाव न्याय, पर्यावरणवाद आणि परिसृष्टिवाद, विकासाचे प्रश्न, जागतिकीकरण आणि उदारीकरण या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. बी. शिंदे यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रविंद्र भणगे, मानवविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. संध्या जयसिंग माने**

चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**समकालीन राजकीय समस्या**
**एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र आवश्यक पेपर** C-04

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. संध्या जयसिंग माने**<br>चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १ |
| **डॉ. सुचिता सुरगीहळी**<br>न्यू लॉ कॉलेज, शाहूपुरी, कोल्हापूर | २ |
| **श्रीमती नेहा वाडेकर**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **प्रा. डॉ. अजितानंद यशवंत जाधव**<br>४६५/३७, स्वरूप कॉलनी, कदमबागेसमोर, सातारा | ३ |
| **प्रा. डॉ. एस. के. खडसे**<br>कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. संध्या जयसिंग माने**

चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | स्त्रीवाद आणि लिंगभाव न्याय | १ |
| २. | पर्यावरणवाद आणि परिसृष्टिवाद | २६ |
| ३. | विकासाचे प्रश्न | ४७ |
| ४. | जागतिकीकरण आणि उदारीकरण | ८० |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# स्त्रीवाद आणि लिंगभाव न्याय

## ( Feminism and Gender Justice )


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ स्त्रीवादाचा अर्थ

१.२.२ स्त्रीवादाची वैशिष्ट्ये

१.२.३ स्त्रीवादाचे सिद्धांत : (१) उदारमतवादी सिद्धांत, (२) मार्क्सवादी सिद्धांत, (३) जहाल स्त्रीवाद, (४) भारतीय स्त्रीवाद

१.२.४ लिंगभाव न्याय, लिंगभाव अंदाजपत्रक, लिंगभाव लेखापरीक्षण

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे

- स्त्रीवादाचा अर्थ समजून घेणे.
- स्त्रीवादाची वैशिष्ट्ये जाणून घेणे.
- स्त्रीवादाचे सिद्धांत समजून घेणे.
- समकालीन राजकीय विचारांमध्ये लिंगभाव न्याय, लिंगभाव अंदाजपत्रक व लिंगभाव लेखापरीक्षण याविषयीची चर्चा समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना

स्त्री व पुरुष दोघे मिळून एकत्र येऊन समाज तयार झाला. अर्थातच दोघांचेही महत्त्व समानच असायला हवे पण पुरुषसत्ताक अवस्थेमध्ये स्त्रीला मिळणारे स्थान, तिचा दर्जा, तिला प्राप्त होणारे स्वातंत्र्य, अधिकार यामध्ये असमानता आढळून येते. एकंदरितच स्त्रीला निव्वळ ती स्त्री आहे म्हणून कमी लेखणे ही प्रवृत्ती समस्या निर्माण करणारी आहे. या समस्येचा तिच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अभ्यास होणे गरजेचा आहे व यातूनच आपण पाहतो की स्त्रियांशी निगडीत सर्व प्रश्न हाताळताना स्त्रीवादी संकल्पना अस्तित्वात आली आहे. प्रस्तुत प्रकरणात यांच्याशी संबंधित स्त्रीवादाचा नेमका अर्थ, तिची वैशिष्ट्ये, विविध स्त्रीवादी सिद्धांत यांचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे. याचप्रमाणे स्त्रीवादी भूमिकांचा फक्त मर्यादित अभ्यास न करता अलिकडील काळातील स्त्रीवादी सिद्धांत, स्त्रीवादी अंदाजपत्रक, स्त्रीवादी न्याय यावर होणाऱ्या चर्चांचा अभ्यासही सदर प्रकरणात केला जाणार आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ स्त्रीवादाचा अर्थ (Meaning of Feminism)

प्राचीन समाजातील स्त्रियांचा दर्जा दुय्यम, कनिष्ठ प्रतीचा होता. स्त्री व पुरुष याची शारीरिक व मानसिक भिन्नता हा जरी जीवशास्त्रीय स्वरूपाची असली तरी सामाजिक स्तरावर तिला या लिंगभेदावर आधारित वागणूक मिळू लागली. स्त्री-पुरुष असमानता हा मूळ मुद्दा धरून तिला सर्वच क्षेत्रात कमीपणा प्राप्त झाला. दुय्यम स्थान प्राप्त झाले. परंतु हे दुय्यम स्थान हे अन्यायी विषमतेवर आधारित असल्याने याविरुद्ध स्त्रीत्वाचे दुय्यम स्थान नाकारून माणूस म्हणून व्यक्ती म्हणून समाजात स्थान मिळविण्यासाठी तिचा प्रयत्न सुरू झाला. या व्यवस्थेमध्ये तिला तिचे स्वतःचे स्थान निर्माण करण्याची गरज भासू लागली व यातूनच स्त्रीवादाचा जन्म झालेला दिसतो.

स्त्रीवादाचा अर्थात Feminism या शब्दाची व्युत्पत्ति लॅटिन भाषेतील Femina या शब्दापासून झाली आहे. फेमिनाचा अर्थ स्त्री (Woman) असा असून एलिस रॉसी यांनी फेमिनिझम हा शब्द प्रथम १८९५ साली "The Athenaeum' या नियतकालिकेत प्रथम वापरला.

स्त्रीवाद म्हणजे स्त्री-पुरुष समानतेसाठीचा लढा स्त्रीला तिचे गरजेचे, विकासाचे स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठीचा लढा. एकूणच समाजव्यवस्थेमध्ये पुरुषांप्रमाणे सर्व स्तरावर तिची गुणवत्ता, कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी तिला तिचे अस्तित्व एक व्यक्ती म्हणून स्थान मिळविण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक मांडणी व तिचा अभ्यास म्हणजे स्त्रीवाद होय.

एकूणच स्त्रीवादी संकल्पना स्पष्ट करताना तिला तिच्या अस्तित्वाचा, समानतेचा, स्वातंत्र्याचा, अधिकाराचा हक्क प्राप्त करण्यासाठी तिने उभा केलेली व्यवस्था म्हणजे स्त्रीवाद. जगातील विविध राष्ट्रांत यासंदर्भात अभ्यास सुरू आहे. आंतरराष्ट्रीय पातळीपासून ते अगदी स्थानिक पातळीपर्यंत स्त्रीवादी संकल्पना आपण अभ्यासताना पाहतो.

### १.२.१ स्त्रीवादाची वैशिष्ट्ये

स्त्रीवादाची संकल्पना, अर्थ समजून घेतल्यानंतर या स्त्रीवादी भूमिकेची प्रामुख्याने काही वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील ती पुढीलप्रमाणे -

**१. स्त्रीविषयक विचारांचा अभ्यास :**

स्त्रीवाद ही मुळातच 'स्त्री' या व्यक्तीला केंद्रीत धरून आहे. पुरुष जसा व्यक्ती आहे तशी स्त्री ही सुद्धा एक व्यक्ती आहे. मात्र पुरुषसत्ताक वृत्तीतून स्त्रीला कमी लेखण्याची तिला मनुष्यहीन म्हणून वागणूक देण्याची जी प्रथा पूर्वापार चालत आली तिला जागतिक पातळीवर फार मोठ्या प्रमाणात विरोध झालेला दिसतो. इंग्लंडमध्ये १७ व्या शतकाच्या मध्यंतर फर्ग्युसन यांनी सुरू केलेली धर्मनिरपेक्ष स्त्रीवादी चळवळ तद्नंतर मेरी कुल्सन क्राफ्ट, जे. एस. मिल, फ्रान्सच्या सिर्मान दि बोव्हा तसेच हेलन सिक्सम, ल्युसी कॉमिसार अशा अनेक स्त्रीवादी विचारवंतानी स्त्रियांविषयक आपली परखड मते मांडून स्त्रीवादी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. भारतात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, म. धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज अशा अनेक समाज सुधारकांनी आपल्या विचार व कृतीतून स्त्रीवादी भूमिकेस प्राधान्य देऊन स्त्रीपुरुष स्वातंत्र्य, समानता, विकास यासाठी कार्य केलेले दिसते. अगदी अलीकडील काळातील गेल ऑमवेट, डॉ. निलम गोरे, विद्युत भागवत, डॉ. छाया दातार यांनी स्त्रीवादी भूमिकाविषयक आपले विचार विविध प्रकारे मांडलेले दिसतात. एकूणच स्त्रीवादाचे वैशिष्ट्य म्हणून स्त्रीविषयक परखड, स्पष्ट, अभ्यासू व्यक्त होणारा विचारांचा एक स्वतंत्र भाग म्हणून अभ्यासता येतो.

**२. स्त्री-अत्याचारास विरोध व स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार :**

स्त्रीने चूल आणि मूल एवढेच सांभाळावे, तिचे कार्यक्षेत्र तेवढेच आहे. तिला कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नाही. धार्मिक अनिष्ठ चालीरितींच्या बंधनात ती जीवन जगते. तिला शिक्षण नाकारले गेले. गुलामासारखे स्थान तिला देण्यात आले. बालविवाह, सतीप्रथा, बुरखापद्धती अशा अनेक प्रकारे तिच्या मनाविरुद्ध, सक्ती करून, तिच्यावर अन्याय-अत्याचार केले जात. या सर्वांविरुद्ध स्त्रीवादी भूमिका उभा राहताना दिसते. मुळातच पुरुषाप्रमाणे स्त्रीसुद्धा एक व्यक्ती आहे. ज्यापद्धतीने स्वतःचा विकास करण्यासाठी पुरुष प्रयत्नशील असतो तसेच व्यक्ती म्हणून स्त्रीने स्वतःचा विकास साधण्यासाठी जे-जे आवश्यक आहे ते-ते प्राप्त करण्यासाठी स्वतःप्रती स्वातंत्र्याची मागणी करणे आवश्यक आहे व म्हणूनच स्त्रीवादी विचार स्त्री-स्वातंत्र्याच्या अधिकाराचा पुरस्कार करताना दिसतात. प्राचीन काळापासून स्त्री-स्वातंत्र्याचा फार मोठ्या प्रमाणात संकोच करण्यात आला आहे. या संकोचातूनच तिच्यावर अनेक बंधने लादण्यात आली. तिच्यावर अत्याचार घडला म्हणूनच या सर्व बंधनातून मुक्त होणे म्हणजेच स्त्री-स्वातंत्र्य, स्वःविकास प्राप्त करणे ही प्रमुख भूमिका स्त्रीवादाची असलेली आपणांस दिसते.

**३. लिंगभेदविरहीत स्त्री-पुरुष समानतेवर आधारीत समाजव्यवस्था :**

निसर्गतःच स्त्री व पुरुष हे दोन घटक प्रजोत्पादनाचे काम करतात. अर्थातच दोघांचेही स्थान हे तितकेच

समान पातळीवर महत्त्वाचे. पण सामाजिक अवस्थेमध्ये जीवन जगत असताना लिंगभेदाचा वापर करून स्त्रियांना विषमतेची वागणूक देण्यात आली. स्त्रीची शारीरिक रचना, मानसिक जडणघडण यास अनुसरून अनेक अविवेकी, पक्षपाती कायदे, अनिष्ट प्रथा, संकेत रूढ झाले. थोडक्यात, लिंगभेदामुळे स्त्रियांना सर्व पातळीवर पुरुषांप्रमाणे दर्जा, समान, आदर प्राप्त झाला नाही. अधिकार व स्वातंत्र्य डावलण्यात आले व म्हणूनच स्त्रीवादी विचारसरणीमध्ये स्त्री ही एक व्यक्ती आहे, व्यक्ती म्हणून तिला पहिले स्थान, सन्मान, आदर मिळायला हवा, ज्यावेळी स्त्रीकडे पुरुषाप्रमाणे समान पातळीवर पाहिले जाईल त्यावेळी असे घडेल असे मत स्त्रीवादी व्यक्त करताना दिसतात. जे. एस. मिल यांच्या मते, ''स्त्रियांच्या बुद्धिमत्तेचा स्वीकार केल्यास स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होईल.'' जीवनाच्या सर्व क्षेत्रात पुरुषांप्रमाणे समान संधी, स्वातंत्र्य तिला उपभोगायला आले पाहिजे आणि अशी समाजव्यवस्था निर्माण होण्याच्या दृष्टीने स्त्रीवादी आग्रही भूमिका मांडताना दिसतात.

**४. राजकीय सबलीकरण :**

जागतिक पातळीवर स्त्रियांना राजकीय अधिकार प्राप्त करण्यासाठी झगडावे लागले. विविध स्त्रीवादी संघटनांनी राजकीय अधिकार प्राप्तीसाठी चळवळीद्वारे आपले लढे उभे केले व आपले अधिकार प्राप्त केले. १९११ मधील इंग्लंडमधील स्त्रियांच्या स्वातंत्र्याची अर्थात मताधिकाराची चळवळ, अमेरिकेतील १८४८ मध्ये एलिझाबेथ कॅडी सॅटन आणि ल्युकेशिया मॉट यांनी स्त्रियांचा भरविलेला मेळावा व त्यामध्ये स्त्री-स्वातंत्र्याविषयी ''सेनेका फॉल्स'' हा प्रसिद्ध झालेला जाहीरनामा व पुढे १९२० साली अमेरिकन राज्यघटनेत १९ वी घटनादुरुस्ती होऊन स्त्रियांना प्राप्त झालेला मतदानाचा, अधिकार फ्रान्समध्ये १७८९ मध्ये झालेली क्रांती परंतु स्वातंत्र्य, समता व बंधुता या विचारसरणीमध्ये मागे पडलेले स्त्री-विषयक मूल्य व त्यासाठी जेन्सन, ऑलिम्पि-दि-गॉगस, सिमॉन दि बोव्हा यांनी व्यक्त केलेले क्रांतिकारक विचार अशा अनेक पद्धतीने विविध राष्ट्रांत स्त्रियांना स्वतःचे व्यक्ती म्हणून राजकीय अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी झगडावे लागले. भारतातही राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथेविरुद्ध उठविलेला आवाज, स्त्रीशिक्षणासाठी कार्य करणारे महात्मा ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनात्मकदृष्ट्या संविधानात दिलेले स्त्री-पुरुष समानता-स्वातंत्र्याविषयी कायदे, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने १९९३ साली झालेली ७३वी व ७४वी घटनादुरूस्ती अशाप्रकारे भारतातही स्त्रियांचा सहभाग व सबलीकरणाच्या दृष्टीने प्रयत्न झालेले दिसतात. संघर्षातून प्राप्त झालेले हे अधिकार समाजातील प्रत्येक स्त्रीपर्यंत पोहोचताना दिसत नाहीत. यामध्ये स्त्रियांची काही प्रमाणात असणारी राजकीय उदासीनता असली तरी पुरुषप्रधान सत्तेमध्ये पुरुषाची मानसिकता स्त्रीला सत्ता प्रदान करण्याची किंवा तिला निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेण्याची दिसत नाही. त्यामुळे स्त्रीवादी विचारसरणी राजकीय पातळीवर स्त्रीचे सबलीकरण करण्याची भूमिका व्यक्त करताना दिसतात.

**५. आधुनिकीकरणाचा स्त्रीवादावरील परिणाम**

एकोणिशे नव्वदपूर्वीचा स्त्रीवाद हा स्त्री म्हणून तिला न पाहता एक व्यक्ती म्हणून समाजाने पहावे यासाठी होता. तिच्या अस्तित्वाचा, स्वातंत्र्याचा, समानतेचा, अधिकारांचा, विकासाचा असा स्त्रीवाद होता. १९९१

नंतर जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण याचा प्रभाव संपूर्ण समाजकरण, अर्थकारणावर पडला. साहजिकच स्त्रीवादावरही याचा परिणाम झालेला दिसतो. I. C. T. च्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ, वाढीव स्त्री-भ्रूणहत्येसारखे गंभीर प्रश्न, कौटुंबिक हिंसाचाराचा प्रश्न, स्त्रियांविषयक असणारी आर्थिक भूमिका, प्रसारमाध्यमातील स्त्रीची मांडणी, यातून स्त्रियांवर होणारा परिणाम तसेच मानवी हक्क म्हणून प्राप्त झालेले स्त्रियांचे अधिकार व प्रत्यक्षात असणारी वस्तुस्थिती अशा विविध पातळीवर स्त्रीवादी अभ्यास होताना दिसतो. आधुनिकीकरणाचा परिणाम स्त्रीवादावर झाल्याने स्त्रीवादाला वेगळी दिशा प्राप्त झाली आहे.

**६. स्त्रीवादी विविध दृष्टीकोन व मतभिन्नता :**

स्त्रीवादी विचाराचा जन्म मुळात स्त्री ही एक व्यक्ती आहे, तिला तिचा विकास करण्यासाठी स्वातंत्र्य, समानता, सर्व अधिकार प्राप्त असणे गरजेचे आहे या विचारसरणीतून निर्माण झाले. अर्थात उद्देश समान असला तरी तो उद्देश साध्य करण्याच्या दृष्टीने विविध विचारप्रवाह अस्तित्वात आलेले दिसतात. स्त्रीवादी विचारात उदारमतवादी विचार व्यक्तीस्वातंत्र्यास प्राधान्य व स्त्री-पुरुष समानता मानणारी दिसते. समाजवादी विचारप्रवाहामध्ये उत्पादन साधनांवरील पुरुषांची मक्तेदारी नष्ट करणे, स्त्री दास्य अंत या विचारांना प्राधान्य देते. स्त्रीवादी विचारांचा मार्क्सवादी दृष्टिकोनात लिंगभेदातून निर्माण होणाऱ्या स्त्रीच्या शोषणांकडे लाभाबाबत विचार मांडले. स्त्रियांचे कौटुंबिक शोषणातून मुक्त करण्यासंबंधी विचार मांडले. उत्तर आधुनिक स्त्रीवादी दृष्टिकोनात लिंगभेद हा एकच मुद्दा स्त्रीवादापुरता मर्यादित न ठेवता विविध क्षेत्रातील, स्तरातील स्त्रियांचा वेगवेगळा प्रश्न असतो व ते अभ्यासणे हा भाग उत्तर आधुनिक स्त्रीवादाचा आहे. उच्चवर्णीय स्त्री, मध्यमवर्गीय स्त्री, निम्नस्तरीय स्त्री, धर्म, संस्कृती या विविध घटकातील स्त्रिया त्याची चर्चा या स्त्रीवादात होते. असे विविध स्त्रीवादी दृष्टिकोन अभ्यासता येतात.

याचप्रमाणे प्रादेशिक, भौगोलिक, भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक, शहरी, ग्रामीण अशा विविध घटकांना अनुसरून स्त्रीवादी संघटनामध्ये वेगवेगळी मते निर्माण होणाता दिसतात. वर्णभेद, वंशभेद अशा मुद्द्यांवरही स्त्रीसंघटनात मतभिन्नता दिसून येते. एकंदरीत स्त्रीवादी विचारप्रवाह व त्यामध्ये असणारे वेगवेगळे मतप्रवाह या गोष्टी स्त्रीवादाचा एक महत्त्वाचा भाग ठरतो.

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'फेमिनिझम' हा शब्द ............. भाषेतून आला आहे.

(अ) लॅटिन (ब) ग्रीक (क) इंग्लिश (ड) मराठी

२. सिमॉन दि बोव्हा हा ............. या देशाच्या स्त्रीवादी विचारवंत आहेत.

(अ) फ्रान्स (ब) जर्मनी (क) इटली (ड) ग्रीक

३. ७३वी व ७४वी घटनादुरुस्ती ............ कोणत्या साली झाली.

(अ) १९९४ (ब) १९७५ (क) १९९० (ड) १९९३

४. १७८९ साली ............ देशाची राज्यक्रांती झाली.

(अ) अमेरिका (ब) इंग्लंड (क) फ्रान्स (ड) जर्मनी

५. जे. एस. मिल हे ............ विचारांचे विचारवंत आहेत.

(अ) उदारमतवादी (ब) मार्क्सवादी (क) समाजवादी (ड) यापैकी नाही

## १.२.३ स्त्रीवादाविषयीचे सिद्धांत

पुरुष संस्कृत मानसिकतेतून, अनिष्ठ, अंधश्रद्धाळू चालीरिती, संकेत यातून या सर्व बंधनातून स्त्रियांची मुक्तता हा स्त्रीवादाचा मूळ हेतू आहे. अर्थात हा हेतू साध्य करताना त्या-त्या सामाजिक-आर्थिक-राजकीय परिस्थितीनुरूप निर्माण झालेले दिसतात. प्रामुख्याने स्त्रीवादी विचारांचा अभ्यास करताना स्त्रीवादी सिद्धांत अभ्यासणे गरजेचे ठरते.

यामध्ये प्रामुख्याने स्त्रीवादाचा उदारमतवादी दृष्टीकोन, मार्क्सवादी/समाजवादी दृष्टीकोन, जहालवादी दृष्टीकोन, उत्तर आधुनिकतावादी दृष्टीकोन असा स्त्रीवादी विविध सिद्धांतांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

### १. स्त्रीवादाचा उदारमतवादी सिद्धांत

मुळात उदारमतवादी सिद्धांत व्यक्तीला केंद्रस्थानी मानतो. व्यक्ती हितामध्ये समाजहित साधले जाते व साहजिकच समाजहितातून समाजविकास आपोआप घडतो. मात्र सार्वजनिक जीवन जगताना राज्यसंस्थेने आपली सत्ता मर्यादित ठेवून व्यक्तीवर किमान निर्बंध घालावेत व व्यक्तीच्या खाजगी जीवनात पूर्ण स्वातंत्र्य द्यावे ही भूमिका उदारमतवाद मांडताना दिसतो. व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीप्रतिष्ठा व समता यावर आधारित समाजजीवनाची जगण्याची, विकासाची संकल्पना उदारमतवाद मांडतो. उदारमतवादाची ही वैचारिक मांडणी विविध उदारमतवादी विचारवंतानी मांडलेली दिसते. १७८१ मध्ये जेरेम बँथम यांनी स्त्रियांना मतदानाचा अधिकार, सत्तेमध्ये सहभागी होण्याचा अधिकार असे प्रेरक विचार मांडले. तद्नंतर सन १७९२ मध्ये मेरी वोल्स्टन क्राफ्टने 'ए विंडिकेशन ऑफ दि राईट्स ऑफ वुमन' या ग्रंथात स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. स्त्रीला पुरुषाप्रमाणे शिक्षण मिळावे जर तिला शिक्षण प्राप्त झाले तर ती पुरुषांप्रमाणे स्वतःच्या विचारक्षमतेच्या आधारावर आपले हक्क उपभोगेल. पुरुषांप्रमाणेच ती नागरी जीवनात आत्मविश्वासाने सहभागी होईल, आपली जबाबदारी पार पाडेल अशी स्त्रियांविषयक प्रखर भूमिका मेरी वोल्स्टनक्राफ्टने मांडली. व्यक्तिस्वातंत्र्याचा खंदा पुरस्कर्ता जॉन स्टुअर्ट मिल याने १८६९ मध्ये 'दि सब्जेक्शन ऑफ वुमेन' पुस्तकात स्त्रीस्वातंत्र्याविषयी आपले विचार व्यक्त केले. पुरुषांप्रमाणे स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा, आपले अधिकार उपभोगण्याचा अधिकार असावा असे मत मिल व्यक्त करतात. समान वागणूक, समान कामासाठी समान वेतन या पद्धतीने स्त्री-पुरुष समानतेचा स्वातंत्र्याचा ते पुरस्कार करताना दिसतात. एकंदरित उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांत पुरस्कार प्रभावीपणे

साठोत्तर स्त्री चळवळीत स्वीकारलेला दिसतो. हॅरियर टेलर, मिल मार्गारिट फुल्लर, हॅरियन, मार्टिनोपासून ते ल्युक्रेशिया मॉट, एलिझाबेथ कॅडी स्टॅटन, बिटी फ्रिडन, जेनेट रिचर्डस्, सुसॉन मॉलर ऑकिन पर्यंतच्या कालखंडाचा विचार केला तर उदारमतवादी विचारसरणीचा स्वीकार या विचारवंतानी समाजमानसात रुजविण्याचा व स्त्रीवादी विचारांत फार मोठा बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरताना दिसतो.

उदारमतवादी स्त्रीवादाचा मुख्य हेतू हा की, स्त्रियांना राजकीय व कायदेशीर समता प्राप्त करून देणे, एकदा समाजात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित झाली की स्त्री तिच्या क्षेत्रात किंबहुना तिला हव्या त्या क्षेत्रात संधीच्याद्वारे स्वतःची कुवत, क्षमता सिद्ध करेल. विवेकवाद, समता, स्वातंत्र्य, व्यक्तीवाद या मूल्यांचा स्वीकार करून स्त्रीसुद्धा विवेकशील व्यक्ती असल्याने त्यांना पुरुष या व्यक्तीप्रमाणेच सर्व अधिकार, स्थान, दर्जा प्राप्त व्हावा व तो विवेकावर व सामाजिक न्यायावर आधारीत कायदे, वैचारिक प्रबोधन या माध्यमातून लैंगिक व सामाजिक विषमता नष्ट करून प्राप्त व्हावा अशा पद्धतीची भूमिका उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांत मांडताना दिसतो. एकंदरीत उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांताचा अभ्यास करताना पुढील मुद्दे ठळक पद्धतीने लक्षात येतात.

१. सर्व व्यक्ती समान आहेत. साहजिकच पुरुषांप्रमाणे स्त्री ही एक व्यक्ती असून ती पुरुषसमान आहे.

२. उदारमतवादाचे प्रमुख तत्त्व म्हणजे स्वातंत्र्य व संधीची समानता सर्व स्त्री-पुरुषांना आहे.

३. लिंगावर आधारित विषमता करू नये.

४. उदारमतवादाचा विवेकवादावर विश्वास आहे.

५. सामाजिक व सर्व पातळीवर चांगल्या परिवर्तनासाठी शिक्षण हा प्रमुख मार्ग आहे. ज्याचा अधिकार पुरुषांप्रमाणे स्त्रीला असणे गरजेचे आहे.

६. वैधानिक समता व कायद्याच्या समानतेद्वारा उदारमतवादी स्त्रीवाद आपले अस्तित्व सिद्ध करण्यासंदर्भात मांडणी करताना दिसतो.

७. स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांच्या बुद्धिमत्तेवर विश्वास, शैक्षणिक संधी, मताधिकार, राजकीय सहभाग, रोजगाराचा हक्क, समान वेतन, संधीची समानता, समान नागरी हक्क अशा विविध महत्त्वाच्या मुद्यांना अनुसरून उदारमतवादी विचाराने स्त्रीचे व्यक्तीभाव जागे करून त्यासाठी उदारमतवादी स्त्रीवादी विचार आग्रही राहिलेले दिसतात.

**२. मार्क्सवादी / समाजवादी स्त्रीवादी सिद्धांत**

स्त्रीवादी सिद्धांताचा अभ्यास करताना मार्क्सवादी / समाजवादी स्त्रीवादी अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भांडवलशाही समाजव्यवस्थेत कमकुवत, गरीब वर्गाचे शोषण केले जाते व म्हणूनच भांडवलशाही व्यवस्थेस मार्क्सवादी विचार विरोध करताना दिसतात. साहजिकच कमकुवत, शोषिक व दास्य वर्ग म्हणून स्त्रीकडे पाहिले जात असल्याने व मार्क्सवादी सिद्धांत हा शोषिक दास्य प्रथा यांना विरोध करत असल्याने

स्त्रीवादी विचार मार्क्सवादाकडे आकर्षित झालेले दिसतात. कार्ल मार्क्स, एंगेल्सच्या लिखाणात भांडवलशाही समाजात होणारी जुलूम, जबरदस्ती, अन्याय, शोषण, गुलामी थांबविण्यासाठी सर्व शोषित घटकांनी एकत्र येऊन लढा करण्याची व क्रांती करण्याची आवश्यकता स्पष्ट केली. साहजिकच स्त्री ही समाजाची एक महत्त्वपूर्ण घटक जरी असली तरी तिचे स्थान ही खालच्या दर्जाचे गुलाम म्हणून समजले जात होते. फ्रेडरिक एंगल्स यांच्या मते, आदिवासी समाजात मुक्त लैंगिक संबंध गैर नव्हते. अर्थव्यवस्था स्त्रीकेंद्रित होती. मातृसत्ताक पद्धती होती. मानवाचे जीवन एका ठिकाणी स्थिर झाल्यानंतर, कुटुंबसंस्था निर्मितीनंतर अर्थोत्पादनाच्या भूमिका बदलल्या व पुरुष कौटुंबिक व सामाजिक स्थानी सर्वोच्च झाला. साहजिकच संपत्ती, पैसा, समाज नियमावली या सर्व घटकांत स्त्रीचे स्थान दुय्यम होत गेले. एंगल्सने ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधारे हे स्पष्ट केले. श्रमविभागणीच्या मुद्यावर एंगल्सने आपल्या 'The Origin of the Family, Private Property and State' या पुस्तकात असे स्पष्ट केले की, ‘कुटुंबात पुरुष भांडवलदार व स्त्री ही श्रमिकाचे प्रतिनिधित्व करते. पुरुषांच्या श्रमाला मोल असते. परंतु स्त्रीच्या कुटुंबातील राबण्याला तिच्या श्रमाला मूल्य नाही तिचे श्रम हे मूल्यहीन आहेत म्हणजेच कुटुंब ही व्यवस्था स्त्रीचे दुय्यमत्व दर्शविते. हीच गोष्ट भांडवलदारांना पोषक ठरली. पुरुषाबरोबर समान पातळीवर श्रमाचा मोबदला पुरुषासारखाच स्त्रीलाही मिळावा यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोन प्रयत्नशील ठरतो.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अलेक्झांडर कोलोंटम आणि कॅलरा झेटकीनसारख्या मार्क्सवादी तत्त्वचिंतकानी स्त्रीप्रश्नांच्या संदर्भात भौतिक विचारमंथन केले. मारिया रोझा डालाकोस्ट या मार्क्सवादी स्त्रीवादी विचारवंताने घरात काम करणाऱ्या, कौटुंबिक जबाबदारी सांभाळणाऱ्या स्त्रीयांचा आर्थिक विकासात कसा संबंध येतो हे स्पष्ट केले. मात्र तिच्या या कामाची बाजारात विक्री होत नसल्याने तिचे श्रम दुय्यम, अर्थहीन ठरविले जातात. उलट तिची घरगुती श्रमातून आर्थिक उत्पादनाच्या माध्यमातून अतिरिक्त मूल्याचीही निर्मिती करते पण पुरुषशाही किंवा भांडवलशाही एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने बाजारपेठेत असो की कुटुंबात स्त्रीचे स्थान कमी दर्जाचे दुय्यम लेखते व म्हणूनच भांडवलशाही आणि घरकामाचे श्रम यांचे नाते लक्षात घेता स्त्रियांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी श्रमाच्या बाजारपेठेत प्रवेश मिळविण्यापेक्षा घरात राहून घरकामाचाच मोबदला मागितला पाहिजे असे मार्क्सवादी स्त्रीवादाचे मत आहे. घरकामाचे सामाजिक महत्त्व सांगून घरकाम ही भांडवलशाहीची अटळ गरज कशी आहे हे डालाकोस्टने स्पष्ट केले. सार्वजनिक उद्योगधंद्यात स्त्रियांना समान पातळीवर सहभाग घेता आला पाहिजे तसेच त्यासाठी समतावादी शासनाने बालसंगोपन, वृद्धांची देखभाल, कुटुंबात होणारे इतर उत्पादक काम यांची जबाबदारी उचलली पाहिजे असे मत मार्क्सवादी विचारवंतानी मांडले. एकंदरीत घरकामासाठी लागणाऱ्या स्त्रियांच्या श्रमास, त्यांच्या घरकामात मूल्याधिष्ठित दृष्टीकोन प्राप्त करून देण्यासाठी व लिंगभेदातून निर्माण होणाऱ्या स्त्रीशोषणाकडे लक्ष वेधण्याचे काम मार्क्सवादी स्त्रीवादी विचारांनी केलेले दिसते.

फुरिअर, साँ सीमाँवादी, रॉबर्ट ओवेन, विल्यम थॉम्प्सन आणि ॲन व्हीलरसारख्या समाजवादी तत्त्वचिंतकानी स्त्री प्रश्नाचा स्वतंत्रपणे विचार केला. फुरियर आणि साँ सिमाँवादी समाजवाद्यांनी स्त्रियांचे स्वातंत्र्य व समता म्हणजे समाजवाद अशी समाजवादाची व्याख्या केली. उदारमतवाद आणि मार्क्सवाद यातील

भूमिका घेऊन समाजवादी विचारसरणी निर्माण झाली. मार्क्सवादी विचारांचा पुढील टप्पा म्हणून समाजवादी विचारांकडे पहावे लागेल. इमेल्डा व्हेलइन, ज्युलिएट मिचेल या समाजवादी विचारवंतानी आपले समाजवादी स्त्रीवादाविषयी विचार मांडलेले दिसतात. पुरुष व भांडवलशाही या दोन्हीच्या शोषणातून स्त्रिया मुक्त होणे या भूमिकेतून समाजवादी स्त्रीवाद आपले विचार मांडताना दिसतात. ज्युलिएट मिचेलने कुटुंब या घटकाची आधारभूत मुद्यांची चर्चा करताना उत्पादन, पुनरुत्पादन, लैंगिकता यास महत्त्व देताना दिसते. खाजगी संपत्तीचे उच्चाटन करून व स्त्रियांना सार्वजनिक जगात, उद्योगधंद्यात सहभागी झाल्या की स्त्रियांच्या दुय्यमतेचे, शोषणाचे प्रश्न संपुष्टात येतात असे नाही. यासाठी मिचेल कौटुंबिक संरचनाबद्दल समाजवादी दृष्टीकोनातून विचार व्यक्त करतात. कुटुंबामध्ये असणाऱ्या लहान मुलांवर स्त्री किंवा पुरुष अशा पद्धतीने संस्कार करण्यापेक्षा माणूस म्हणून जर त्याच्यावर संस्कार झाले तर कुटुंब ही शोषणव्यवस्थेचा भाग राहणार नाही. किंबहुना पितृसत्ताक कुटुंबपद्धती नष्ट करावी अशी भूमिका समाजवादी स्त्रीवाद स्पष्ट करतो. मानसिकदृष्ट्या स्त्रिया, पुरुषी अन्यायाविरुद्ध, शोषणाविरुद्ध सक्षम उभे राहण्याची गरज समाजवादी स्त्रीवाद सांगतो.

मार्क्सवादी स्त्रीवादाने स्त्रीशोषणाचे आर्थिक पैलू स्पष्ट करून त्याविरोधात आवाज उठविला. मात्र समाजवादी स्त्रीवादाने आर्थिक शोषणाबरोबरच कुटुंब, पितृसत्ताक पद्धती अशा रचनामध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने विचार व्यक्त करून स्त्रियांनी स्वतःमध्ये यासाठी सक्षम मानसिक निर्माण करण्याची गरज स्पष्ट करतात. एकंदरित मार्क्सवादी / समाजवादी स्त्रीवादी विचारांचा अभ्यास करताना खालील मुद्दे ठळक वाटतात.

१. आर्थिक परावलंबत्वामुळे स्त्रीचे शोषण, स्त्रीवर अन्याय झाला आहे असे मार्क्सवादी स्त्रीवाद सांगतो.

२. भांडवलशाही व पुरुषसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियांचे घरगुती काम, श्रम याला मूल्य प्राप्त झाले नाही व स्त्रियांच्या पुनरुत्पादनाचा, अतिरिक्त मूल्यांचा विचार केला गेला नाही. तिला दुय्यम दर्जा प्राप्त झाला.

३. फक्त लिंगनिष्ठ श्रमविभागणी हा भागच फक्त स्त्रीशोषणास कारणीभूत नाही तर एकूणच कुटुंबसंस्था, पितृसत्ताक पद्धती या व्यवस्थांमुळे स्त्रीचे शोषण फार मोठ्या प्रमाणात झाले आहे.

४. उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांत व मार्क्सवादी स्त्रीवादी सिद्धांत यातील विचारांचा समन्वय साधून समाजवादी विचारसरणी निर्माण झाली.

५. अन्याय, शोषणविरुद्ध स्त्रीने सक्षम मानसिकता तयार करून अत्याचारी पुरुषी व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणे. यामध्ये पुरुष या व्यक्तीस विरोध नसून पुरुष व्यक्तीमधील वाईट विचार-आचारांना विरोध अशा पद्धतीने समाजवादी स्त्रीवादी पुरुष वर्चस्व व पुरुष सत्तेच्या विरोधात आपली मांडणी करताना दिसतात.

६. एकंदरित स्त्रीमुक्तीचा लढा हा लिंग व वर्ग या दोन्ही पातळ्यावर लढावा लागेल अशी भूमिका मार्क्सवादी समाजवादी स्त्रीवादी सिद्धांत स्पष्ट करतो.

## जहालवादी स्त्रीवादी दृष्टिकोन

इ.स. १९७० च्या नंतर स्त्रीवादाने उग्र स्वरूप धारण केले व पुढे १९८०च्या दशकामध्ये जहाल स्त्रीवाद पुढे आला. जहाल स्त्रीवादाने भांडवलदार व कामगार यांच्यात संघर्ष नसून स्त्री व पुरुष यांच्यातील संघर्ष हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे असे विचार मांडून स्त्रीवादी विचारांमध्ये आपले उग्र व जहाल विचार व्यक्त केले. जहाल स्त्रीवादविषयक विचार व्यक्त केले. जहाल स्त्रीवादविषयक विचार शुलमिथ फायरस्टोनने "The Dialectic of Sex" या ग्रंथात, सिमॉन द बुव्हाने "The Second Sex" या ग्रंथात, जर्मेन गिअरने "The Female Unique" या ग्रंथात मांडलेले आहेत.

जहालवादी स्त्रीवादी दृष्टीकोनामध्ये सर्वार्थाने पुरुषी वर्चस्वाला, पुरुषी सत्तेला विरोध दर्शविला आहे. जहाल स्त्रीवाद हा स्त्री जीवनावर अनुभवावर आधारित व्यक्त झालेला दिसतो. सामाजिक व्यवस्थेमध्ये जीवन जगताना स्त्री शोषण हे फक्त तेवढ्यापुरते मर्यादित न राहता स्त्रीचा येणाऱ्या सर्व घटकांशी संबंधित येतो. फक्त आर्थिक बाबीपुरते शोषण न राहता ते लैंगिक, भौतिक, सांस्कृतिक, ज्ञानात्मक, मानसिक अशा सर्व स्वरूपाचे असते व अशा सर्व संबंधित घटकांद्वारे तिचे शोषण होत राहते. म्हणून स्त्रीच्या शोषणाची व्याप्ती फार मोठी आहे असे मत जहाल स्त्रीवादी विचारवंत व्यक्त करताना दिसतात. स्त्री-पुरुषाचे नाते शोषित आणि शोषक आहे असे जहाल स्त्रीवाद म्हणतो कारण पुरुष सर्वत्र संपूर्ण नियंत्रण ठेवून आपले वर्चस्व हितसंबंध पद्धतशीरपणे जोपासतो. स्त्रीचे सामाजिक, राजकीय, आर्थिक जगण्यामध्ये पुरुषवर्गाचे वर्चस्व असते. म्हणजेच सार्वत्रिक ठिकाणी पुरुष वर्चस्वाबरोबर खाजगी जीवनात म्हणजेच विवाह, कुटुंब, कुटुंब संबंध, अपत्य अशा विविध घटकांत पुरुषी वर्चस्व स्त्रीवर असते. म्हणजेच स्त्रीचे जीवन खाजगी असो की सार्वत्रिक पुरुषी वर्चस्वाने स्त्रीचे जीवन व्यापलेले आपणांस दिसते.

सिमॉन द बुव्हाने १९४९ साली ''दि सेकंड सेक्स'' या आपल्या ग्रंथात त्या विधान करतात की, ''आपण बाई म्हणून जन्माला येत नाही तर आपण बाई होतो किंवा घडविलो जातो.'' एकूणच स्त्रीच्या जन्माबरोबरच पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेमध्ये तिचे स्थान दुय्यम गौण ठरविले जाते व या दडपणामध्ये तिची स्वतःला कमी लेखण्याची मानसिकता निर्माण होते. एकूणच कौटुंबिक, वैवाहिक व्यवस्थेमध्ये स्त्रीला दुय्यमत्व देऊन तिच्यावर वर्चस्व, नियंत्रण ठेवण्याची पद्धत पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये केली गेल्याने जहाल स्त्रीवाद या व्यवस्थेस दोष देतो. स्त्री-पुरुष संबंधामध्ये वर्चस्ववादी भूमिका न ठेवता मैत्रिभाव वाढवून स्वतंत्र माणूस म्हणून स्वतःचे अस्तित्व जोपासण्याचे काम स्त्रीने करावे. शिक्षण, नोकरी, राजकीय हक्क प्राप्त झाले पण त्याचबरोबर तिला दिल्या जाणाऱ्या दुय्यम, कनिष्ठ स्थानामुळे तिच्या समोरील समस्या वाढलेल्या दिसतात व या समस्या वाढण्याचे कारण म्हणजे पुरुषी सत्ता असे जहालवाद स्त्रीवादी विचारांत सिमॉन द बुव्हा व्यक्त करतात. शुलमिथ फायरस्टोन यांनी १९७३ मध्ये ''द डायलेक्टीक ऑफ सेक्स' या पुस्तकात पुनरुत्पादन किंवा वंशसातत्य तसेच मातृत्व यामध्ये स्त्री स्वतःला बांधून ठेवते व या अर्थाने पुरुष आपले पुरुषी वर्चस्व दाखवून स्त्रीला आपल्या अधिपत्याखाली ठेवतो व म्हणूनच लैंगिक विग्रह, स्त्रीत्व व पुरुषत्व या असमतोल शोषण पद्धतीचे उच्चाटन हा जहाल

स्त्रीवादाचा हेतू असल्याचे स्पष्ट करतात. याच पद्धतीने ''सेक्सुअल पॉलिटिक्स'' या आपल्या पुस्तकात लिंगभाव व्यवस्थेविषयी लिहिताना केट मिलेट म्हणतात, 'समाजाची संस्कारात्मक जडणघडण ही कुटुंबात घडत असते. कुटुंबपद्धती ही पितृसत्ताक आहे व साहजिकच मुलांची संस्कारक्षम जडणघडण, संगोपण ही स्त्रीची जबाबदारी येते व म्हणूनच स्त्रीला पुरुषी अधिसत्तेखाली रहावे लागते.' थोडक्यात, जीवन जगताना स्त्रीचा प्रत्येक मार्ग हा पुरुषाच्या हातात असतो व यातूनच पुरुषी वर्चस्व निर्माण होते, पुरुषी व्यवस्था दिसून येते व त्यामुळे या सर्व पुरुषी व्यवस्थेला जहाल स्त्रीवाद विरोध करतो. समाजातील ज्या संस्था लिंगभेद करून स्त्री-पुरुषांना समाजापासून दूर करतात त्या संस्था नष्ट केल्या पाहिजेत. कौटुंबिक जबाबदारी, अपत्यप्राप्ती, बालसंगोपन यामुळे स्त्रीविकास आणि स्त्री-स्वातंत्र्यावर मोठ्या प्रमाणात मर्यादा आल्यामुळे स्त्रियांनी यामध्ये स्वतःस न गुंतवता आत्मविश्वासाने स्वतःची प्रगती साध्य करावी. किंबहुना जहाल स्त्रीवाद याहीपुढे जाऊन असे स्पष्ट करतो की, मातृत्व, बालसंगोपन हा पुरुषी सत्तेचाच एक भाग असल्याने स्त्रीने याला बगल देऊन प्रगत प्रजनन तंत्रातील गोष्टी उदा. संतती नियमनाची साधने, कृत्रिम गर्भधारणा अशाद्वारे स्वतःला मुक्त करण्यासाठी प्रयत्नशील रहावे. एकूणच ''जे जे खाजगी ते ते राजकीय'' या स्त्रीवादी घोषवाक्यातून जहाल स्त्रीवादाची भूमिका स्पष्ट होताना दिसते. एकंदरित जहाल स्त्रीवादी सिद्धांताचा अभ्यास करताना काही ठळक मुद्दे स्पष्ट होतात ते पुढीलप्रमाणे :

१. पुरुषसत्ताक पद्धतीस जहाल स्त्रीवादी विचार विरोध करताना दिसतात.

२. कुटुंबव्यवस्था ही पितृसत्ताक पद्धतीचा भाग आहे म्हणजेच ती पुन्हा पुरुषसत्ताक पद्धतीचे प्रतिनिधित्व करत असल्याने जहाल स्त्रीवादाचा कुटुंबपद्धतीस विरोध आहे.

३. खाजगी, सार्वजनिक सर्वच क्षेत्रातील विकासात्मक संस्था पुरुषसत्ताक असल्याने सर्वत्र स्त्रीला गौण, कमी, कनिष्ठ दर्जाचे स्थान देण्यात आले असल्याने जहाल स्त्रीवाद या सर्व संस्थांना विरोध करतात त्यांचे समूळ नष्ट करण्याची भाषा बोलतात.

४. जहाल स्त्रीवाद पुनरुत्पादन/वंशसातत्य, मातृत्व, बालसंगोपण या स्त्रीत्वास दुय्यम स्थान देणाऱ्या घटकांना बगल देऊन प्रगत प्रजनन तंत्रज्ञानाद्वारे स्त्रीत्वास मुक्त करण्याच्या विचारांना स्त्रीवाद प्राधान्य देतो.

५. लैंगिक विग्रह, स्त्रीत्व व पुरुषत्व या साचेबंदपणाचे उच्चाटन हा जहाल स्त्रीवादाचा अंतिम हेतू आहे.

६. जहाल स्त्रीवाद हा मुख्यत्वे स्त्रीच्या स्त्री म्हणून येणाऱ्या अनुभवावर आधारित विचार आहे.

७. स्त्री-पुरुष मैत्रीभाव, आधुनिक प्रजनन तंत्राचा वापर अशा गोष्टीद्वारे समाजाची पुर्नबांधणीची अपेक्षा जहाल स्त्रीवाद व्यक्त करतो.

**४. उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद**

१९८० च्या दशकात उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादी विचार तीव्रतेने पुढे आले. दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या यूनोच्या स्थापनेने, आंतरराष्ट्रीय पातळीवरील शीतयुद्धाने जगातील राष्ट्रे एकमेकांच्या संपर्कात आली.

जगातील राष्ट्रांमधील सीमा जवळ येऊन व्यापारीकरणाच्या कक्षा वाढल्या. वेगवेगळ्या राष्ट्राच्या व्यवस्था, नागरिक, संस्कृती जवळ असल्याने नवीन संबंधाची, नवीन विचारांची ओळख वाढून संस्कृतीची एक नवीन बैठक तयार झाली. यामध्ये विकसित दळणवळणाची साधने, आधुनिक प्रगत तंत्रज्ञान, आकाशवाणी, दूरदर्शन, व्हिडिओ कॅमेरे, वृत्तपत्रे, साहित्य, नियतकालिके व अत्याधुनिक तत्काळ माहिती व संपर्कतेचा भाग म्हणजे संगणकाचे जाळे विकसित झाले. या सर्वाचा परिणाम अर्थात स्त्रीवर झालेला दिसतो. या उत्तर आधुनिकतावादी विचारवंतानी याबाबत आपले विचार व्यक्त केले. डेल्युझे आणि इरीगॅरे तसेच ग्रोस, बटलर, गॅलॉप या उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादी विचारवंतानी स्त्री शरीर, लिंगभाव, भौतिकवादी सिद्धांत, संस्कृती अशा विविध मुद्यांना स्त्रीवादी भूमिकेतून मांडले.

उत्तर आधुनिकतावादात भाषेला महत्त्व आहे. उत्तर आधुनिकतावादात वंश, धर्म, लिंग, राष्ट्रीयत्व भिन्न वंशीयता यांचा समावेश होतो. इतिहासातील स्त्रियांचे विषय मुद्दाम दुर्लक्षिले गेले असल्याने तिकडे लक्ष देण्याची गरज उत्तर आधुनिकवादी स्त्रीवादी स्पष्ट करते. उत्तर आधुनिकवाद प्रस्थापित परंपरांना व प्रस्थापित आधुनिक जीवनमार्गाला अशा कल्पनांना आव्हान देताना दिसते. आधुनिकतावादात कायदा, बुद्धीस महत्त्व, सुव्यवस्था अशा गोष्टींना प्राधान्याने महत्त्व देते. मात्र या सर्वांचा शेवट म्हणजे उत्तर आधुनिकतावाद होय.

उत्तर आधुनिकवादी स्त्रीवाद्यांनी परंपरागत पुरुषसत्ताक पद्धतीच्या सत्तेस विरोध दर्शविला आहे. धर्मशास्त्रे व निसर्ग यांना हा सिद्धांत विरोध करतो. ज्ञानाचा संबंध हा सत्तेशी येतो. त्यामुळे त्याचे मूल्यमापन झालेल्या परिणामांच्या संदर्भात घ्यावा लागेल. स्त्रियांच्या बाबतीत समाजाच्या विशिष्ट धारणा, त्यांना मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्याची पद्धती यातून स्त्रीमुक्ती करण्याची भूमिका उत्तर आधुनिक स्त्रीवाद करताना दिसतो.

इरीगॅरे यांनी पुरुषसत्ताक संस्कृती व 'इतर' म्हणून उल्लेखलेल्या स्त्रियांवर आपले विचार व्यक्त केले तर ग्रोस यांनी स्त्री शरीराच्या भौतिकवादी उपयोगावर भर दिला. तर उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादी विचारक बटलर यांनी स्त्री शरीराचा भौतिकवादी सिद्धांत मांडून एक वेगळ विषय स्त्रीवादी अभ्यासास दिला. एकूणच उत्तर आधुनिक स्त्रीवाद हा विषय थोडासा वेगळा मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो.

केवळ लिंगभेद हा संपूर्ण स्त्रियांना एकाच वर्गातील सिद्ध करणयासाठी पुरेसा नाही. उच्चवर्णीय, निम्नस्तरीय, मध्यमवर्गीय अशा विविध वर्गातील स्त्रियांचे प्रश्न वेगळे असू शकतात. वेगवेगळ्या वंशाच्या, संस्कृतीच्या, धर्माच्या स्त्रियांचा प्रश्न वेगवेगळा असू शकतो. त्यामुळे सर्वसमावेशक स्त्री हा मुद्दा घेऊन जरी स्त्रीवाद मांडला तरी त्याच्यापुढे अशा विविध मुद्यांतर्गत विविध स्त्रियांचे प्रश्न, समस्या, आव्हाने करण्याबाबत उत्तर आधुनिक स्त्रीवाद आपली भूमिका मांडतो. काही ठराविक मुद्दे उत्तर आधुनिक स्त्रीवादाच्या अभ्यासात आढळतात ते पुढीलप्रमाणे :

१. स्त्री हा एक वर्ग नसून आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक वंश अशा विविध वर्गातील स्त्रियांसमोरील प्रश्न, समस्य, आव्हाने ही वेगवेगळी आहेत.

२. प्रगत तंत्रज्ञानाचा स्त्रीवर झालेला परिणामाचा विचार करणे उत्तर आधुनिक स्त्रीवाद्यांना महत्त्वाचा वाटतो.

३. केवळ पुरुषी वर्चस्वाला विरोध न करता अशा संघर्षाऐवजी स्त्री विरोधात असणाऱ्या इतर वंश, धर्म, वर्ण, संस्कृती, समाज अशा घटकांविरोधात जी स्त्री दास्यास, स्त्री गुलामगिरीस कारणीभूत ठरतात त्याचा विरोध स्त्रियांनी करावा अशी उत्तर आधुनिक स्त्रीवादी विचारपद्धती सांगते.

*** भारतीय स्त्रीवादी दृष्टिकोन**

साधारणतः स्त्रीवादी विचारांचा अभ्यास करताना स्त्रीवादाचा अर्थ, वैशिष्ट्ये, सिद्धांचा अभ्यास करावा लागतो. पण याच बरोबर भारतातील स्त्रीवादाचा अभ्यास करणे इथे गरजेचे वाटते. भारतातील स्त्रीवादाची ओळख थोडक्यात इथे आपण करून घेऊ -

*** पार्श्वभूमी**

भारताच्या सामाजिक-आर्थिक-राजकीय बाबतीत आपणांस फार मोठी वर्गीय, जातीय, धार्मिक, शैक्षणिक विषमता आढळून येत होती. साधारणतः ब्रिटिशपूर्व भारतात सामाजिक विषमता प्रचंड होती. पण या विषमतेमध्ये ज्यावेळी समाजातील महत्त्वपूर्ण घटक म्हणून स्त्री-पुरुष व्यक्तींचा विचार केला जातो तेव्हा स्त्रीची परिस्थिती ही चूल व मूल पर्यंतच मर्यादित होती. तिला पुरुषांच्या बरोबरीने समतेने राहण्याचा-आचार-विचाराचा अधिकार नव्हता. तसेच तिला शिक्षण घेण्याचा, मत मांडण्याचे किंबहुना तिला बुद्धिजीवी स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य प्राप्त नव्हते. तिला इथल्या समाजाने बुद्धिहीन समजून गौण, कनिष्ठ दर्जाचे स्थान दिले होते.

१९व्या शतकात भारतात ब्रिटिश प्रशासन स्थिरावले. तसतसे ब्रिटिश साहित्यांमुळे स्वातंत्र्य, समता, अधिकार, उदारमतवाद याची ओळख इथल्या शिक्षित तरुणांना होऊ लागली. जात, धर्म व त्यातील अनिष्ट स्त्रीला निव्वळ गुलाम बनविणाऱ्या प्रथा, परंपरा याद्वारे तिचे होणारे शोषण, सामाजिक, आर्थिक, लैंगिक शोषण यामुळे तिचे स्त्रीत्व हे फक्त पुरुषाच्या दृष्टीने निव्वळ मादी रूप, वस्तुरूप ठरले होते. सतीची प्रथा, बाल विवाह, जरठ विवाह, केशवपन, विधवा विवाहास प्रतिबंध, तिला शिक्षणास विरोध अशा पद्धतीच्या चुकीच्या प्रथांना ती बळी पडत होती. या प्रकारांमुळे इथल्या समाजसुधारकांनी उदारमतवादी विचारवंतानी याबाबत प्रखर विचार मांडण्यास सुरुवात केली. काही समाजसुधारकांनी विचार आणि त्याचबरोबर प्रत्यक्ष कृतीतून, स्त्रीत्वासाठी, तिला पुरुषांप्रमाणे मानसन्मान अधिकार, स्वातंत्र्य, समता, हक्क मिळण्यासाठी पुढाकार घेतला. राजा राममोहन रॉय, गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ताराबाई शिंदे अशा अनेक विचारवंत समाजसुधारकांनी याबाबत आपल्या विचार-कार्यातून स्त्रीशिक्षण, स्त्री-पुरुष समानता, स्वातंत्र्य, हक्क, स्त्रीविकास यासाठी प्रयत्न केला.

राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेविरुद्ध सुधारणा चळवळ केली. १८२९ मध्ये सती बंदीचा कायदा झाला. १८४८ मध्ये स्त्रीशिक्षणाचे प्रणेते महात्मा ज्योतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी पुणे येथे पहिली मुलींची शाळा सुरू करून स्त्रीशिक्षणाची सुरुवात केली. १८८८ मध्ये गोपाळ गणेश आगरकरांनी ''सुधारक'' वर्तमानपत्र सुरू केले. यामध्ये विविध लेख स्त्रीउद्धारकतेसंबंधी लिहिले. स्त्री-पुरुषांसाठी समान स्वातंत्र्याची व समान संधीची मागणी आगरकरांनी केली. बालविवाहास विरोध, विधवा

पुनर्विवाह अशा गोष्टींना त्यांनी मान्यता देऊन त्याकाळी या संदर्भात प्रखर विचार मांडले. आगरकरांच्यावर उदारमतवादी विचारसरणीचा प्रभाव पडलेला होता. १९२० ते १९४७ हा कालखंड स्त्रीहक्क चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. या काळात म. गांधींनी स्त्री-पुरुष समानतेबाबत विचार व्यक्त केले. त्यांच्या मते, ''बाईपणा आणि पुरुषीपणा बाजूला ठेवून स्त्री-पुरुषांनी सामाजिक, राजकीय कार्यासाठी राष्ट्र उभारणीच्या उच्चस्तर ध्येयासाठी एकत्र येऊन कार्य केलं तर खऱ्या अर्थाने स्त्रिया निर्भर होतील व सार्वजनिक जीवनात त्या योगदान देऊ शकतील.'' या अर्थाने सर्व क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता आणली गेली तर राष्ट्र उभारणी व राष्ट्र विकास हा महत्त्वाचा भाग आपण कणखरपणे करू असा होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील चातुर्वण्यपद्धती, जातीय विषमता, धार्मिक अनिष्ठ रूढी पद्धती यामध्ये बंदिस्त झालेल्या स्त्रीजीवनास मुक्त करण्याचे काम भारतीय संविधानामार्फत केले. यामध्ये स्त्री-पुरुष समानता, स्वातंत्र्य, सर्व अधिकार, मतदानाधिकार असे सर्व पातळीवरचे अधिकार स्त्रियांना घटनात्मक पातळीवर कायद्याद्वारे संरक्षित केल्याने स्त्रीमुक्तीसाठी त्याचे कार्य महान ठरते. त्याची ही स्त्रीमुक्ती ही समाजातील सर्व जाती, धर्म, वर्गातील स्त्रियांसाठी होती हे आपण लक्षात घेतले पाहिजे. १८८२ साली ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री-पुरुष तुलना' हे स्त्रीशोषणाची वस्तुस्थिती मांडणारे महत्त्वाचे पुस्तक ठरते. पुरुषी वर्चस्वाला विरोध करून स्त्री अन्यायाची बाजू त्यांनी यामध्ये मांडली. त्यावेळी त्यांचे हे लेखन पुरुषप्रधान संस्कृतीला फार मोठा धक्का होता. तद्नंतर अनेक समाजसुधारक, विचारवंतानी मांडलेले विचार, केलेले कार्य हे भारतातील स्त्रियांच्या प्रगतीच्या दृष्टीने पुढचे पाऊल ठरले.

१९७५ ते १९८५ हे दशक युनाने आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून जाहीर केले व भारतातील स्त्रीहक्क चळवळ यानिमित्ताने अधिक प्रगतीपथावर चालली. विविध शासकीय समित्या, योजना महिला संरक्षण, विकास, दृष्टीने स्थापित झाल्या, कार्यरत झाल्या. विविध कायदे स्त्रियांच्या दृष्टीने राजकीय, सामाजिक क्षेत्राशी निगडित घटनादुरूस्तीने अस्तित्वात आले. १९९३ साली ७३वी व ७४वी घटनादुरूस्तीने स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राजकीय सहभागाच्या दृष्टीने मंजूर करून कार्यरत केले.

साधारणतः भारतीय स्त्रीवादी चळवळीमध्ये स्त्रीमुक्तीसाठी, स्त्री-पुरुष समानतेसाठी प्रगल्भ स्त्री-पुरुष नाते, स्त्री-स्वातंत्र्यासाठी, स्त्री शिक्षणासाठी मुक्ता साळवी, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, कमला देशपांडे, जनाक्का शिंदे अशा कितीतरी स्त्रीवादी महिला आपल्या विचारातून, लेखणीतून, कार्यातून स्त्रीवादी चळवळीचे कार्य करीत होत्या. अलिकडील काळात अनेक स्त्रीवादी विचारवंत भारताच्या, महाराष्ट्राच्या क्षेत्रात आपल्या विचारातून, कार्यातून भूमिका मांडताना दिसतात. विद्यापीठ, स्त्रीवादी अभ्यास केंद्रे, स्त्रियांवरील काम करणाऱ्या विविध समित्या, एन.जी.ओ. अशा विविध अंगानी भारतात स्त्रीवादी चळवळीचे कार्य सुरू असतानाही स्त्रियांवर लैंगिक अत्याचार, बलात्कार, स्त्रियांवर ॲसिड फेकणे, कामाच्या, कौटुंबिक अशा ठिकाणी त्यांचे मानसिक, शारीरिक, आर्थिक शोषण, स्त्री म्हणून अवहेलना होताना त्यातही खालच्या वर्गातील मागास जातीतील स्त्रीवर अत्याचार, नग्न धिंड, सार्वजनिक ठिकाणी स्त्रीस मारहाण, अवहेलना अशा विविध समस्यांना भारतातील स्त्रीवाद तोंड देत आहे. अलिकडील सायबरच्या, आय.टी.च्या

माध्यमातून १९९१ नंतरच्या जागतिकीकरणाच्या वातावरणात, माध्यमांच्या अतिरेकी भडकपणामध्ये स्त्रीचे झालेले बाजारीकरण, तिची मानसिक घुसमट, आर्थिक स्वावलंबन असूनही परावलंबन तसेच आधुनिक तंत्रज्ञानातील गोष्टीमुळे झालेली स्त्रीवादी मांडणी, गर्भलिंग चाचणी, स्त्रीभ्रूणहत्या, पुरुषी जन्मास दिलेले प्राधान्य अशा विविध गोष्टी आज आधुनिक काळात भारतीय स्त्रीवादासमोर आव्हान म्हणून समोर असलेल्या दिसत आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............. ते ............. हे वर्ष महिला दशक म्हणून साजरे करण्यात आले.

(अ) १९९० (ब) १९७५ (क) १९९० (ड) १८७५

२. सिमॉन द बुव्हाने............. हा ग्रंथ लिहिला.

(अ) सेक्स्युल पॉलिटिक्स (ब) दि सेकंड सेक्स (क) कार्ल मार्क्स (ड) यापैकी नाही

३. उत्तर आधुनिक स्त्रीवादी विचार............. दशकात पुढे आले.

(अ) १९२५ (ब) १९८० (क) १९८५ (ड) २०००

४. Sexual Politics हा ग्रंथ ............. यांनी लिहिला.

(अ) जे. एस. मिल (ब) सिमॉन द बुव्हा (क) कार्ल मार्क्स (ड) केंट मिलेट

५. भारतात सतीबंदचा कायदा ............. साली झाला.

(अ) १८२९ (ब) १९२९ (क) १९७५ (ड) १९२०

### १.२.३ लिंगभाव न्याय, लिंगभाव अंदाजपत्रक, लिंगभाव लेखापरीक्षण

मानवी जीवन जगत असताना निसर्गतः पुरुष व्यक्तीप्रमाणे स्त्री ही एक व्यक्ती आहे परंतु व्यक्तीस असणाऱ्या निसर्गदत्त बुद्धि या घटकामुळे व त्याच्या वैचारिक जडणघडणीमुळे त्याने इतर सजीव प्राण्यांपेक्षा सर्व क्षेत्रात प्रगती केली. परंतु ही प्रगती साध्य करत असताना शारीरिक, मानसिक व बौद्धिक दृष्टीकोनातून स्त्री ही व्यक्ती आपल्यापेक्षा कमी पात्रतेची, कनिष्ठ दर्जाची एकंदरित तिचे स्थान फक्त अन्न शिजवणे व अपत्य जन्मास देणे व संगोपन करणे म्हणजे चूल व मूल एवढ्यापुरती मर्यादित आहे हा विचार समाज चाकोरीत रुजला गेला. साहजिकच स्त्री ही पुरुषी वर्चस्वाखाली, दबावाखाली आपले जीवन व्यतीत करू लागली. अशा पद्धतीने सामाजिक जीवन जगण्याची पुरुषप्रधान, पुरुषसत्ताक व्यवस्था आजही जगली जात आहे.

अर्थात, या असमान स्त्री-पुरुष जीवन जगण्याच्या पद्धतीबाबत समाजसुधारक, विचारवंत यांनी स्त्री ही व्यक्ती आहे व ती पुरुषाप्रमाणे समान पातळीवर आपले जीवन जगू शकते ही विचारधारा समाजात विकसित करण्याचा प्रयत्न सुरू केला. याचा विचार आपण स्त्रीवादी सिद्धांतामध्ये, भारतीय स्त्रीवादात मागील घटकात

केला आहे. साधारण १९६० नंतर पाश्चिमात्य जगात ''स्त्री प्रश्ना''संबंधी नवा विचार सुरू झाला. १९६० नंतर शिक्षण आणि तत्सम सुविधा मिळूनही आपण केवळ शोभेच्याच वस्तू म्हणून कशा राहिलो आहोत हे स्त्रियांना जाणवू लागले. तद्नंतर जागतिक पातळीवर स्त्रीवाद विचारांचा, स्त्रीवादी अभ्यासांचा जोर वाहू लागला. प्रगत तंत्रज्ञान, दळणवळणाची साधने, कॉम्प्युटर, इंटरनेट, मोबाईल यासारख्या प्रगत, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर तसेच १९९१ नंतरच्या जागतिक बाजारीकरणाद्वारे राट्राराष्ट्रांतील कमी झालेले अंतर, वस्तूंचे व्यापारीकरण, आय. टी. क्षेत्रातील रोजगार निर्मिती, काम अशा अनेक गोष्टींचा परिणाम समाजातील विविध क्षेत्रातील, स्तरातील स्त्रियांवर कमी-अधिक प्रमाणात विविध पद्धतीने होऊ लागला. स्त्रीवादी विचारवंत, अभ्यासक याचा अभ्यास करू लागले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर हा मुद्दा महत्त्वाचा ठरला.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून स्त्रीशिक्षणास सर्व समाजसुधारक व विचारवंतानी पाठिंबा दिला. स्त्रिया शिकू लागल्या. सर्व क्षेत्रात स्वतःची प्रगती साध्य करू लागल्या. घटनात्मकदृष्ट्या तिला कायद्याचे संरक्षण मिळाले. सर्व काही स्त्रीविकासाच्या दृष्टीने चांगले सुरू आहे पण अजूनही समाजातील कष्टकरी, गरीब, तळागाळातील किंबहुना अगदी नोकरदार स्त्रिया अजून पूर्णतः विकसित झालेल्या नाहीत. यासाठी अगदी महत्त्वाचा भाग म्हणजे शासकीय पातळीवर प्रत्येक राष्ट्रात तिच्यासाठी महत्त्वाच्या उपाययोजना काटेकोरपणे राबविणे. लिंगभाव न्यायाची संकल्पना, लिंगभाव, अंदाजपत्रक व लिंगभाव लेखापरीक्षण अजूनही तिच्यापर्यंत पोहोचल्या नाहीत. मुळात त्या शासकीय पातळीवर तेवढ्या ताकदीने रुजणे व तिची अंमलबजावणी या गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात. त्यामुळे त्या संकल्पना अभ्यासणे गरजेचे ठरते.

*** लिंगभाव न्याय** (Gender Justice)

लिंगभाव न्यायास साधारण इंग्लिशमध्ये "Gender Justice" असे म्हणतात. न्यायाच्या संकल्पनेशी निगडीत लिंगभावावर आधारित हा लिंगभाव न्यायाची संकल्पना अभिप्रेत आहे. यासाठी मुळात आपल्याला न्याय या संकल्पनेचा अर्थ व लिंगभाव या संकल्पनेचा अर्थ ज्ञात पाहिजे.

मानवी समाजात प्रारंभापासून न्यायाच्या संकल्पनेस महत्त्व देण्यात आले आहे. न्याय हे समाजाचे एक मुख्य व अविभाज्य अंग आहे. न्यायामध्ये समतावादी दृष्टीकोन अपेक्षित असतो. नैसर्गिकदृष्ट्या, नैतिकदृष्ट्या, विवेकवादी भूमिकेतून योग्य असणे म्हणजे न्याय म्हणता येईल. न्याय या संकल्पनेसाठी इंग्रजीमध्ये Justice हा शब्द आहे. जस्टिस हा शब्द 'जस्टिसीयी' या ग्रीक शब्दापासून बनलेला आहे. त्याचा अर्थ जोडणे किंवा बंध निर्माण करणे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तीन तत्त्वांना जोडून न्याय प्रस्थापित करणे ही भूमिका यामध्ये दिसते.

समाजातील वातावरण शांततापूर्ण राहण्यासाठी न्याय ही संकल्पना महत्त्वाची ठरते. सामाजिक जीवन जगत असताना आपले अधिकार, हक्क सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने न्याय संकल्पना महत्त्वाची ठरते. कायद्याचे, नियमाचे उल्लंघन करून जर अन्याय व अत्याचार होत असेल तर अशा वेळी न्यायाच्या आधारे कायद्याच्याद्वारे अन्याय निराकरण करणे ही भूमिका महत्त्वाची ठरत असते. सामाजिक, आर्थिकदृष्ट्या कमकुवत, अज्ञान, अंधश्रद्धा, स्त्रिया, मागास वर्ग अशा अनेक घटकांच्या बाबतीत न्यायाची भूमिका महत्त्वाची ठरते. थोडक्यात

सामाजिक घटकांच्या बाबतीत ज्यावेळी अन्याय होतो त्यावेळी सामाजिक न्याय प्रस्थापित होणे गरजेचे होते. याचप्रमाणे आर्थिक न्यायचीही संकल्पना अभिप्रेत आहे. सामाजिक न्यायाचा संदर्भ सामाजिक, आर्थिक, राजकीय घटकांशी येतो. इथे सामाजिक संदर्भ घेण्याच कारण म्हणजे समाजाचे स्त्री व पुरुष हे दोन महत्त्वाचे घटक आहे व आजची स्थिती ही प्राचीन काळापासून घेतली तर ती पुरुषप्रधान आढळते. याचा अर्थ स्त्रियांचे ती कोणत्या जातीची, धर्माची, वंशाची, वर्णाची, भाषेची असेल तिची आर्थिक स्थिती कशी आहे ? अशा सर्व पातळीवर स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी सामाजिक न्याय महत्त्वाचा ठरतो. याअर्थाने लिंगभाव या शब्दाचा अर्थ पाहताना असे म्हणावे लागेल की, सामाजिकदृष्ट्या तुमची जी घडण मानसिक, बौद्धिक, वैचरिक जडणघडण होते ती म्हणजे त्याअर्थाने लिंगभाव होय. सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या तुमची लिंगभावाधारित भूमिका लिंगभाव आधारित असते. आपल्यावर कुटुंबापासून होणारे संस्कार, रूढीबद्धता, सामाजिक संकेत, आर्थिक व शैक्षणिक पडलेले पायंडे या गोष्टी आपला लिंगभाव स्पष्ट करत असतात आणि या पायंड्यामधून संकेतातून समाजाची लिंगभावाकडे बघण्याची-वागण्याची पद्धती ठरत असते. मुलीने बाहुलीशी खेळावे, मुलाने कुस्ती खेळावी, मुलाच्या शिक्षणास कर्ज काढून प्राधान्य, ठराविक शिक्षणानंतर मुलीचे शिक्षण बंद, लग्न अशा विविध संकेतावरून साधारण आपण लिंगभाव पद्धती जाणू शकतो.

लिंगभाव न्यायाची संकल्पना आपल्याकडे स्वतंत्र अर्थाने तटस्थ म्हणून पाहणे गरजेचे आहे. अर्थात कायद्यासमोर समानता या अर्थाने सर्व स्त्री-पुरुष मग ते कोणत्याही जातीचे, धर्माचे, पंथाचे, वंशाचे, भाषेचे असो त्याचा आर्थिक स्तर कोणताही असो. कायद्यासमोर समान ही भूमिका सर्वत्र मान्य झाली आहे. म्हणजे ज्यावेळी आपण सामाजिक पातळीवर सर्वांना समान मानतो त्यावेळी अन्याय होणे व न्याय मागणे हा भाग संदर्भित होत नाही. म्हणजेच न्यायाचा दृष्टीकोन हा एका अर्थाने समतेचा दृष्टीकोन म्हणता येईल. ज्यावेळी असमानता, विषमता हा दृष्टीकोन निर्माण होते त्यावेळी तो अन्यायाचा भाग ठरतो. हे इथे स्पष्ट करण्याचे कारण कायद्यासमोर समानता हा भाग स्त्री व पुरुष या दोघांनाही लागू होतो परंतु प्रत्यक्षात मात्र पुरुषसत्ताक पद्धतीमुळे समाजजीवनात, व्यवहारात सर्व क्षेत्रात तिला कमी लेखले जाते. तिला कमी, कनिष्ठ दर्जा दिला जातो. त्यामुळे सामाजिक पातळी नव्हे अगदी कुटुंबापासून तिच्या जन्मापासून तिच्यावर लिंगभावी अन्याय सुरू होतो. तिला लिंगभाव न्याय प्राप्त होत नाही. त्यामुळे लिंगभाव न्याय प्रस्थापित न होण्यापाठीमागे काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे -

**१. लैंगिक भेदाचा दृष्टीकोन** : निसर्गतः स्त्री व पुरुष हे दोन्ही घटक, समाजविकास, पुनरुत्पादन यासाठी आवश्यक असले तरी सामाजिक पातळीवर स्त्री जन्माला आल्यानंतर किंवा एकंदरीत स्त्रीकडे शारीरिक, मानसिक, वैचारिक पातळीवर ती कमकुवत आहे, नाजूक आहे अशा भावनांनी तिच्याकडे पाहिले जाते. तिच्याकडे मादी, वस्तूरूपाने पाहिले जाते व त्यामुळे साहजिकच तिच्याकडे बघण्याची बुद्धीच जर सामाजिक पातळीवर अशी असेल तर सामाजिक पातळीवर नव्हे लिंगभाव न्यायाच्या दृष्टीने ती दुर्बल ठरविली जाते.

**२. धार्मिक, सांस्कृतिक दृष्टीकोन** : आपण जर विविध धर्म, विविध समाजाच्या संस्कृतीचा अभ्यास केला तर त्यामध्ये पुन्हा स्त्रीत्वास कमी लेखले आहे. धार्मिक, सांस्कृतिक घटकांमध्ये स्त्रियांवर विविध प्रकारची

बंधने, मर्यादा घातलेल्या आहेत. विविध संस्कृती, धर्माचा पगडा समाजजीवनावर वर्षानुवर्षे रुजला गेला असल्याने साहजिकच धर्मातील, संस्कृतीतील अनिष्ठ चालीरिती विरोध विशेषतः स्त्रियांच्या बाबतीत असणाऱ्या अनिष्ठ प्रथा, परंपरांना सहजा सहजी समाज विरोध करत नाही. त्यामुळे धार्मिक, सांस्कृतिकता या गोष्टीमुळे लिंगभाव न्याय प्रस्थापित होताना दिसत नाही.

**३. कौटुंबिक, सामाजिक दृष्टीकोन** : लिंगभाव न्यायाची सुरुवात कुटुंबात समाजात प्रस्थापित होताना दिली पाहिजे पण प्रत्यक्षात गर्भलिंग चाचणी करून स्त्रीगर्भ असेल तर तिची भ्रूणहत्या केली जाते. म्हणजेच कौटुंबिक पातळीवरच लिंगभाव न्याय नाकारलेला आपणास दिसतो. याच पद्धतीने समाज जीवनात ती जीवन असताना तिच्याकडे एक व्यक्ती जी पुरुषाप्रमाणे आहे असे न समजता तिला सामाजिक पातळीवर कमी लेखले जाते. आपले पुरुषत्वाचे वर्चस्व रहावे यादृष्टीने तिच्याकडे पुरुष कौटुंबिक पातळीपासून ते सामाजिक पातळीपर्यंत तिला गौण ठरवतो. यामुळे लिंगभाव न्याय कुटुंबापासून जोपासला जात नाही. मुलगा-मुलगी भेदभाव मग तो खाण्यापिण्याच्या बाबतीत, हौसमजेच्या बाबतीत, शिक्षणाच्या बाबतीत, आवडीनिवडीच्या बाबतीत, कुटुंबापासून-समाजापर्यंत रुजला गेला असल्याने लिंगभाव न्याय प्रस्थापित होताना दिसत नाही.

**४. राजकीय, आर्थिक दृष्टीकोन** : स्त्रीचे पहिले कर्तव्य म्हणजे चूल व मूल ही संकल्पना जोपर्यंत पुरुषांच्या किंबहुना समाजाच्या, व्यवहाराच्या विचारातून पूर्ण जात नाही तोपर्यंत लिंग-भाव न्याय प्रस्थापित होणे अशक्य आहे. राजकीय पातळीवर सुद्धा स्त्रीने सत्ता हस्तगत केली किंवा आर्थिक पातळीवर ती जर कमवती स्त्री असली तरी तिच्याकडे वस्तुतः स्त्री म्हणून बघण्याचा दृष्टीकोन समाजमानसामध्ये रुजला असल्याने तिचा कामाच्या ठिकाणी मानसिक, शारीरिक (लैंगिक) शोषण करणे, वेतनाच्या बाबतीत काम करूनही तिची आर्थिक लुबाडणूक करणे अशा अनेक गोष्टींमुळे लिंगभाव न्यायाची संकल्पना रुजणे किती आवश्यक आहे हे लक्षात येते. ज्याची आज तीव्र गरज आहे.

**५. न्यायिक दृष्टीकोन** : समाजाची मांडणी ही मुळातच पुरुषप्रधान आहे. इथली पोलीस, जेल, न्यायदान या सर्व व्यवस्था पुरुषप्रधान आहेत. स्वाभाविकच सगळी पुरुषी सत्ता असल्याने स्त्रीवर कोणत्याही प्रकारचा अन्याय झाल्यास त्याचे निराकरण करतानाही तिला विचार करावा लागतो. लैंगिक अत्याचार, बलात्कार, ॲसिड फेकणे, कौटुंबिक हिंसाचार अशा अनेक अत्याचाराबाबत ज्यावेळी न्याय मागण्यासाठी स्त्रिया न्याययंत्रणेकडे याचना करतात त्यावेळी तिथल्या एकूणच पुरुषी मानसिकतेपुढे स्त्रिया घाबरतात. न्याय मिळण्याच्या प्रतिक्षेमध्ये तिथे होणाऱ्या मानसिक, शारीरिक छळाबाबत कुठेच दाद मागता येत नाही. त्यामुळे लिंगभाव न्यायाच्या बाबतीत स्त्रियांना न्याय मिळण्याच्या यंत्रणेचाच तीव्रतेने विचार करावा लागतो.

अर्थात स्त्रीवादी चळवळी, समाजसुधारकाची विचारधारा व कार्य यामुळे समाजव्यवस्थेत पुरुषी-स्त्री संबंधात परिवर्तन होताना दिसत आहे. स्त्रीची प्रगती होत आहे. पण शासकीय पातळीवरील उपाययोजना या तळागाळापर्यंत जाऊन रुजणे गरजेचे आहे. लिंगभाव न्यायाची संकल्पना कायद्यापुढे समानता याअर्थी ज्यावेळी खऱ्या आचार-विचारातून अस्तित्वात येईल त्यावेळी समाज पुरुषप्रधान न राहता स्त्री-पुरुष प्रधान असा असेल.

साधारणपणे लिंगभाव न्यायास अनुसरून म्हणण्यापेक्षा स्त्री-पुरुष समानतेविषयक कायदे अस्तित्वात आले. परंतु प्रत्यक्षात कायदे राबविणाऱ्या यंत्रणेमध्येच जर स्त्री-पुरुष असमानतादर्शक मानसिकता रुजली असल्याने लिंगभाव न्याय प्रत्यक्षात प्रस्थापित होणे अवघड आहे. यासाठी काही गोष्टी शासकीय पातळीवर, आंतरराष्ट्रीय पातळीवर राबविल्या गेल्या. स्त्री विकास, स्त्री संरक्षण, स्त्री शिक्षण अशा विविध दृष्टीकोनातून योजना राबविल्या जात आहेत. मात्र आणखीनही काही गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे.

**१. कौटुंबिक मानसिकता बदलणे आवश्यक** : लिंगभाव न्याय प्रस्थापित होण्याच्या दृष्टीकोनातून कौटुंबिक पातळीवर मुलगा व मुलगी हा भेदभाव पालकांनी करता कामा नये. पालकांनी या दृष्टीने स्वतःची मानसिकता परिपक्व करणे, समतोल ठेवणे आवश्यक आहे. मुला-मुलींची लिंगभेदास अनुसरून भेदभाव करण्याची मानसिकता नाकारली गेली पाहिजे. मुलांइतकेच मुलीला आरोग्य, शिक्षण, संधी, आवडीनिवडी, छंद या सर्व गोष्टी करण्याची समान भूमिका जर कुटुंबाने घेतली तर कुटुंबातील तरुण प्रौढ होणाऱ्या पुरुषाची मानसिकता स्त्री-पुरुष समानतेबाबत सकारात्मक होईल व समाजात तशी ती रुजली जाईल.

**२. शिक्षणव्यवस्थेत लिंगभाव समानता आणणे आवश्यक** : शिक्षण हे समाज परिवर्तनाचे, समाजविकासाचे प्रभावी माध्यम आहे. परंतु इतके असूनही शैक्षणिक वातावरणात स्त्री-पुरुष समानतेची तत्त्वे मुळापासून रुजणे आवश्यक आहे. स्त्री-शिक्षणाबाबत खूप योजना राबविल्या जातात. परंतु त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्याबाबत निराकरण करणे गरजेचे आहे. आर्थिक असमानता, सामाजिक असमानता यामुळे मुलींच्या बाबतीत शाळांकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. त्यामुळे शाळेतील मुलींच्या शिक्षणाबाबत असणारे वातावरण, शिक्षकाची भूमिका महत्त्वाची ठरते. याचबरोबर शैक्षणिक अभ्यासक्रमात लिंगभावाचे शिक्षण, लैंगिक शिक्षण यांचा अंतर्भाव झाला तरी त्याबाबतीतील निरपेक्षपणे, मोकळ्यापणाने शिक्षण देण्याची पद्धती या सर्व गोष्टी लिंगभाव न्याय रुजण्यासाठी व खऱ्या अर्थाने तो समजण्यासाठी शिक्षणव्यवस्थेत लिंगभाव समानता आणणे आवश्यक आहे.

**३. कायद्याची साक्षरता आवश्यक** : स्त्री-पुरुष समानताबाबत, स्त्री संरक्षणाबाबत, स्त्रीविकासाबाबत असणाऱ्या विविध कायद्याने ज्ञान प्राप्त करून घेणे हे प्रत्येक स्त्री व प्रत्येक पुरुषाचे कर्तव्य असणे आवश्यक आहे असे झाले तर लिंगभाव न्यायाबाबतची जागरूकता होण्यास वेळ लागणार नाही.

**४. स्त्रियांच्या बाबतीतील अनिष्ठ संकेत/रुढी बदलणे आवश्यक** : एकूणच स्त्रीच्या मासिक पाळीबाबत, ऋतुकाळाबाबत, तिच्या प्रजनन प्रक्रियेबद्दल, शारीरिक जडणघडण, क्षमताबाबत असणाऱ्या चुकीच्या रूढी/संकेताबाबत स्त्रियांची मानसिकता बदलवणे आवश्यक आहे. या गोष्टीबाबत मुली मोकळ्यापणाने बोलायला संकोचतात, लाजतात. त्यामुळे ही स्त्रीच्या बाबतीतील असणारी नैसर्गिक प्रक्रियेचा भाग आहे व त्याबाबत उलट मुलीला योग्य पद्धतीने शास्त्रीय दृष्टीने माहिती देणे आवश्यक आहे. या अर्थाने ती स्वतःला कमकुवत समजू शकणार  नाही तिची मानसिक जडणघडण ही खंबीरपणे होईल व ती सक्षमपणे उभी राहील. यास अनुसरून असणाऱ्या चुकीच्या प्रथा, परंपरांना ती बदलेल, विरोध करेल किंबहुना याबाबत स्त्रीप्रमाणे पुरुषाचेही प्रबोधन, शिक्षण दिले गेले तर लिंगभाव न्याय प्रस्थापित होण्यास वेळ लागणार नाही.

लिंगभाव न्याय ही संकल्पना समाजात मानसिकदृष्ट्या प्रथमतः रुजली तर कायद्याची समानता प्रस्थापित होईल.

*** लिंगभाव अंदाजपत्रक**

आज आपण एकविसाव्या शतकात वावरतो. विज्ञान युगामध्ये तांत्रिक प्रगती करून अवकाशात झेप घेतली. परंतु या प्रगत तंज्ञानामध्ये स्त्री-पुरुष शारीरिकदृष्ट्या वेगळे असले तरी बौद्धिक, गुणवत्ता, संधी क्षमता यांच्यातील तुलना शास्त्रीयदृष्ट्या का, कशी वेगळी आहे याची कारणे आपण शोधून काढली तरी प्रत्यक्षात आपण ते मान्य करत नाही. याचमुळे कायद्यानेसुद्धा स्त्री-पुरुष समानता सांगितली असली तरी तिच्या अंमलबजावणीबाबत पुन्हा तोच प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे शासकीय पातळीवर याबाबत विविध उपाययोजना, संकल्पना राबवून त्याबाबत ती राबविण्याच्या दृष्टीने वातावरण समाजात निर्माण करण्याची भूमिका अलिकडे फार मोठ्या प्रमाणात दिसत आहे. यात संदर्भितच एक संकल्पना म्हणजे लिंगभाव अंदाजपत्रक होय.

स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीकोनातून लिंगभाव अंदाजपत्रक किंवा महिला केंद्रित अंदाजपत्रक ही संकल्पना समाजात रुजत आहे. पितृसत्ताक पद्धती किंवा पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे तिला समान स्थान प्राप्त करून देण्यासाठी व तिचा विकास घडवून आणण्यासाठी देशाच्या आर्थिक अंदाजपत्रकात या संदर्भात खास तरतूद केली जाते. लिंगभाव अंदाजपत्रकास इंग्लिशमध्ये 'Gender Budget' असे म्हटले जाते. लैंगिक समानतेसाठी तयार करण्यात आलेल्या कायद्याव्यतिरिक्त देशाच्या आर्थिक अंदाजपत्रकात महिला सशक्तीकरण/सबलीकरण आणि बालकल्याणासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद केली जाते. त्यास 'लिंगभाव अंदाजपत्रक' असे म्हटले जाते. लिंगभाव अंदाजपत्रक हे जगभरामध्ये अलिकडील दोन दशकांमध्ये अस्तित्वात आलेला शब्द किंवा संकल्पना आहे. याद्वारे सरकारी योजनांमध्ये महिलांसाठी खास तरतूद केलेल्या योजनांची अंमलबजावणी केली जाते.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना आर्थिक सहकार्य देऊन त्यांचा विकास करण्यासाठी, त्यांचे आरोग्य, शिक्षण, व्यवसाय एकंदरित महिलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, तिचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी तसेच या सर्व अर्थाने तिची सामाजिक प्रतिष्ठा, मान-सन्मान वाढविण्यासाठी हा महिला केंद्रित किंवा लिंगभाव अंदाजपत्रकाचा भाग देशाच्या पातळीवर स्वीकारला जात आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा यादृष्टीने पाऊले उचलली जात आहेत.

*** भारतामधील लिंगभाव अंदाजपत्रक :**

स्त्री-पुरुष असमानता नष्ट करण्यासाठी व लैंगिक समानता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने भारतामध्ये २००५ पासून आर्थिक अंदाजपत्रकात महिलाकेंद्रित किंवा लिंगभावसमानतेला अनुसरून अंदाजपत्रक तयार केले जात आहे. २००५ पासून अंदाजपत्रक तयार करताना प्रामुख्याने शासनाच्या प्रत्येक खात्यामध्ये महिलांशी निगडीत काही रकमेची तरतूद त्याचा विकास व सक्षमीकरण हा मुद्दा समोर ठेवून अंदाजपत्रकात केली जाते.

अंदाजपत्रकातील काही भागामध्ये महिला विकासासाठी १००% तरतुदीचा ठेवला जातो तर काही भागामध्ये कमीत कमी ३०% पर्यंतची रक्कम तरतूद केली जाते. एकंदरीतच महिलांचा विकास, स्त्री-पुरुष विषमत कमी करण्यासाठी लिंगभाव अंदाजपत्रकामध्ये आर्थिक तरतुदी केल्या जातात व यास अनुसरून भारतातील आतापर्यंत १६ राज्यांना अशा प्रकारच्या अंदाजपत्रकाचा स्वीकार त्यांच्या राज्यस्तरीय आर्थिक अंदाजपत्रकात केला आहे. यामध्ये अभ्यास केला असता असे निदर्शनास आले आहे की लिंगभाव अंदाजपत्रकाचा सकारात्मक परिणाम झालेला दिसून आले आहे. ही एकंदरितच जमेची बाजू म्हणावी लागेल.

*** लिंगभाव अंदाजपत्रक तयार करण्याचे फायदे :**

१. लिंगभाव अंदाजपत्रक खऱ्या अर्थाने महिलाकेंद्रित झाले तर महिलांचा आत्मविश्वास वाढेल, त्या आर्थिकदृष्ट्या सक्षमही होतील व आर्थिक स्वातंत्र्यही त्या भक्कमपणे भोगू शकतील.

२. सरकारी क्षेत्रातील असो की खाजगी क्षेत्रातील असो ज्या महिला नोकरदार आहेत त्यांना महिला सुरक्षितता, मातृत्व काळातील रजा, महिला विकास यासाठी समान योजना व कायदे लागू होणे आवश्यक आहे तर खऱ्या अर्थाने सर्व नोकरदार महिला लिंगभाव अंदाजपत्रकाचा फायदा उचलू शकतील.

३. महिलाकेंद्रित अंदाजपत्रक हे शासनाच्या प्रत्येक खात्याच्या महिलाविषयक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक खात्यात तशी तरतूद केली जाईल व त्यामुळे या बाबत प्रत्येक खात्याचा लोकप्रतिनिधी स्त्रीविकासाच्या दृष्टीने जबाबदारीने व जाणिवेने काम करेल.

४. स्त्री ही समाजाची अर्धी शक्ती आहे. परंतु स्त्री-पुरुष असमानतेमुळे तिचे स्थान गौण ठरविले गेले. परंतु महिला लिंगभाव अंदाजपत्रकातील महिलांविषयक आर्थिक तरतुदीमुळे खऱ्या मार्गाने तळागाळातील महिलांपर्यंत योजना पोहोचल्या की नाही त्याचा फायदा झाला की नाही हे ओळखून त्या दृष्टीने संबंधित अंदाजपत्रकात बदल करणे, सुधारणा करणे शक्य होईल जे स्त्रीविकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल.

युनीफेम (Unifem) आणि इतर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्याने दिल्ली येथे 'दक्षिण आशियामधील राष्ट्रांच्या अंदाजपत्रकातील स्त्री हितविषयक भूमिका' या २००० मध्ये आयोजित केलेल्या कार्यशाळेमुळे लिंगभाव अंदाजपत्रकास किंबहुना महिला केंद्रित अंदाजपत्रकास भारतात चालना मिळाली. २००५ पासून भारतात अशा लिंगभाव अंदाजपत्रकास सुरुवात झाली पण याचबरोबर देशभरातील निरनिराळ्या विद्यापीठामध्ये 'स्त्री अभ्यास केंद्रा'ची सुरुवात झाली. स्त्रियांच्या बाबतीत असणाऱ्या गोष्टींचा खऱ्या अर्थाने अभ्यास व्हावा. विविध अभ्यासाच्या माध्यमातून शासनास स्त्रियांची स्थिती लक्षात यावी व या अर्थाने शासनास उपाययोजना राबविता याव्यात, या दृष्टीने भारतात प्रयत्न होत आहेत. एकंदरित पाहता महिलांना पुरुषांच्याबरोबरीने पुढे आणणे, समानता प्रस्थापित करणे, स्त्रीचा आत्मविश्वास वाढविणे, तिला स्वयंनिर्भर करणे हेच धोरण यापाठीमागे दिसते.

*** लिंगभाव लेखापरीक्षण :**

स्त्री-पुरुष समानतेसाठी फक्त लिंगभाव न्याय अस्तित्वात आणणे अथवा राष्ट्राच्या आर्थिक अंदाजपत्रकात लिंगभाव अंदाजपत्रकाची तरतूद करणे एवढेच अपेक्षित नाही तर लिंगभाव अंदाजपत्रकाप्रमाणे त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली का? याचा अभ्यास करून त्या अंमलबजावणीमार्फत खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने काही फायदा झाला आहे का? स्त्री विकासाचा दर प्रगत झाला आहे का याचा अभ्यास लिंगभाव लेखा परीक्षणाद्वारे केला जातो. सार्वजनिक धोरणातील एक मुख्य प्रवाहाचा भाग म्हणून लिंगभाव लेखापरीक्षणाकडे पाहिले जाते. सार्वजनिक धोरणांअंतर्गतील कायद्याचा, नियमावलीचा, कर आकारणीचा, सामाजिक प्रकल्पांचा सर्व अभ्यास करताता तो स्त्री उत्कर्षवादी आहे का ? तसा झाला आहे हे पाहिले जाते. लिंगभाव लेखापरिक्षण हे सरकारच्या उत्पन्नाच्या आणि खर्चाच्या परिदृश्याचे विश्लेषण करते म्हणजेच यातून स्त्री विकासाचा अंदाज लावून त्या दृष्टीने नियोजन करता येते. लिंगभाव लेखापरीक्षणाचा मूळ उद्देश स्त्री-पुरुष अशी समानता प्रस्थापित करणे व सामाजिक विषमता या संदर्भातील नष्ट करणे हा होय.

महिलांसाठी संयुक्त राष्ट्र विकास निधी, राष्ट्रकुल, सचिवालय, आणि आंतरराष्ट्रीय विकास संशोधन केंद्र हे जगातील राष्ट्रांना आणि सल्लागार संघटनांना लिंगभाव लेखापरीक्षण करण्यासाठी प्रोत्साहित करतात. तसेच ते या लेखापरीक्षणाच्या आलेल्या निष्कर्षाच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रांना प्रेरित करतात. जेणेकरून राष्ट्रीय अर्थसंकल्प लिंगपेक्षी दृष्टीकोनातून अधिक न्यायसंगत ठरावा.

*** लिंगभाव लेखापरीक्षण कशासाठी :**

साधारण राष्ट्रीय अंदाजपत्रक सादर करतेवेळी नागरिक व सर्व समान या दृष्टीने ते निर्देशित केलेले असते. परंतु प्रत्येक नागरिक मग तो स्त्री की पुरुष, त्याचप्रमाणे त्याची आर्थिक परिस्थिती या गोष्टीचा विचार राष्ट्रीय अंदाजपत्रकाचा अभ्यास करताना करावा लागेल. कारण स्त्रियांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती या घटकांवर राष्ट्रीय अंदाजपत्रक विचारात घ्यावे लागते व त्यामुळे मग राष्ट्रीय आर्थिक अंदाजत्रकात लिंगभाव अंदाजपत्रक तयार केल्याने व लिंगभाव लेखापरीक्षण केल्याने महिलांना आर्थिक लाभ मिळतो की नाही, त्याचा फायदा त्यात घेतात की नाही. त्यातून राष्ट्रीय उत्पन्नास फायदा किती, कसा झाला याची माहिती मिळते. त्यामुळे लिंगभाव लेखापरीक्षण आवश्यक आहे.

लिंगभाव लेखापरीक्षणामुळे स्त्रियांमधील जागरूकता वाढीस लागेल. आर्थिक गोष्टींमध्ये, घटकांमध्ये पुरुषांचा सहभाग हा स्त्रियांपेक्षा जास्त असतो. सामान्यतः लिंगभाव लेखापरीक्षणामुळे स्त्रियांची आर्थिक जागरूकता जागी होईल व ती आर्थिक बाबतीत राष्ट्रीय अंदाजपत्रकाच्या लिंगभाव अंदाजपत्रकास व त्याच्या लेखापरीक्षणास जास्तीत जास्त सहभाग घेऊन स्वतःची आर्थिक प्रगती साधण्यासाठी व स्त्री-पुरुष समानता निर्माण करण्यासाठी, ती विकसित करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

याशिवाय लिंगभाव लेखापरीक्षणाद्वारे राष्ट्रीय अंदाजपत्रकामधील खर्चाच्या बाबती या कोणाला म्हणजे पुरुषाला की स्त्रीला जास्त फायदेशीर ठरल्या आहेत. हे पाहता येईल. स्त्री मग ती मोलमजुरी करणारी, नोकरदारी,

गृहिणी, व्यावसायिक अर्थात वेगवेगळ्या क्षेत्रातील व वेगवेगळी आर्थिक स्थिती असणाऱ्या स्त्रियांच्याबाबतीत राष्ट्रीय आर्थिक अंदाजपत्रकात लिंगभाव अंदाजपत्रक तपासले जाते व त्याअर्थाने त्याचे लिंगभाव लेखापरीक्षण केल्याने खऱ्या अर्थाने स्त्रीचे आर्थिक दृष्टीकोनातून स्वातंत्र्य, सक्षमीकरण या गोष्टीस न्याय मिळण्यासाठी व स्त्री-पुरुष समानता निर्माण होऊन स्त्रीस सामाजिक मान-सन्मान दर्जा प्राप्त होण्याच्या दृष्टीने लिंगभाव लेखापरीक्षण ही महत्त्वाची बाब राष्ट्रीय पातळीवर ठरत आहे.

## १.३ सारांश

स्त्रीवाद म्हणजे काय, स्त्रीवादाची वैशिष्ट्ये कोणकोणती आहेत. स्त्रीवादाचे सिद्धांत कोणत्या आधाराने तयार झाले व त्या सिद्धांताचा आधार काय आहे व त्यांना या सिद्धांताच्याद्वारे नेमके काय ध्येय प्राप्त करावयाची आहे हे आपण पाहिले. स्त्रीवादात अलिकडील काळात विकसित झालेल्या लिंगभाव न्याय, लिंगभाव अंदाजपत्रकआणि लिंगभाव लेखापरीक्षण या संकल्पनाची माहिती आपण पाहिली. खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता आणण्याच्या दृष्टीने अनेक वर्षानुवर्षे प्रयत्न सुरू आहेत. विचारवंत, समाजसुधारक यांच्याद्वारे सुरू झालेल्या व सुरू असणाऱ्या या भूमिकांना, कार्यांना शासनाने विविध राज्यघटनेतील कायद्याद्वारे, योजनांद्वारे, उपक्रमाद्वारे पाठबळ दिले आहे, देत आहे. अनेक बिनसरकारी सामाजिक संघटना, संस्था सुद्धा यात आपले मौल्यवान सहकार्य देत आहेत. सगळ्यात महत्त्वाचे या विषयात अनुसरून सरकारी पातळीवर महिलांविषयक आयोग, समित्या नेमल्या गेल्या व त्या संदर्भित त्या कार्य करत आहेत. शैक्षणिक विद्यापीठ पातळीवर स्त्री-अभ्यास केंद्राची उभारणी करून त्या अर्थाने विद्यार्थ्यांना सजग करण्याचे, स्त्रीचा विकास, सक्षमीकरण यासाठी त्याची विचार जागृती करण्याचे व स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने त्यांच्या विचारांची बैठकी तयार करण्याचे काम चालू आहे.

समाजातील पुरुषप्रधान, पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून स्थान न मिळालेल्या व गुलामगिरीच्या बंधनात अडकलेल्या या स्त्रीचे स्थान स्वातंत्र्य, समता, अधिकार या मूल्यांशी जोडण्याचे या तत्त्वाप्रमाणे जीवन जगण्याचे, उपभोगण्याचे अधिकार स्त्रीला मिळवून देण्यासाठी स्त्रीवादी विचारसरणी कार्यरत असलेली आपणांस दिसून येते.

## १.४ पारिभाषिक शब्द

- **स्त्रीवाद** : स्त्रियांना पुरुषांच्याबरोबरीने समान हक्क मिळावे अशा मतप्रणालींची चळवळ.
- **मार्क्सवाद** : जर्मन देशाचा विचारवंत कार्ल मार्क्स. त्यांनी मांडलेल्या विचारांना मार्क्सवाद या नावाने ओळखले जाते.
- **स्वातंत्र्य** : मुक्तता, मनाप्रमाणे वागण्याची मोकळीक.
- **समता** : समान दर्जा
- **अंदाजपत्रक** : वर्षभराचे आर्थिक समायोजन

- **लिंगभाव** : लिंगावर आधारित, विशेषतः स्त्री केंद्रित
- **लेखापरीक्षण** : आर्थिक व्यवहाराची तपासणी.

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

| | | |
|---|---|---|
| १. लॅटिन | २. इटली | ३. १९९३ |
| ४. फ्रान्स | ५. उदारमतवादी | |

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

| | | |
|---|---|---|
| १. १९७५ ते १९८५ | २. The Second Sex | ३. १९८० |
| ४. केंट मिलेट | ५. १८२९ | |

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

१. स्त्रीवादाचा अर्थ स्पष्ट करून त्याची वैशिष्ट्ये सांगा.
२. स्त्रीवादी सिद्धांतावर चर्चा करा.
३. स्त्रीवादी भूमिकेतून लिंगभाव न्यायाची चर्चा करा.
४. टिपा लिहा :
   १. लिंगभाव अंदाजपत्रक
   २. लिंगभाव लेखापरीक्षण
   ३. भारतीय स्त्रीवाद.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

१. गंजेवार डी. एन. – स्त्री-पुरुष अभ्यासातील आव्हाने आणि उपाय, अपूर्वा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, २०१३.

२. घडियाली रेहाना : अनुवाद मंजुषा गोसावी, समकालीन भारतातील नागरी स्त्रिया, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००७.

३. मिल जॉन स्टुअर्ट – अनुवाद – व. भा. कर्णिक, स्वातंत्र्याविषयी, साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य १९७२.

४. डॉ. पाटील भारती – स्त्रिया : समाज आणि राजकारण हर्मिस प्रकाशन, पुणे २०१४.

५. S. P. Singh, D. S. Sutraia - Gender Budgeting and Women Empowerment in India, Serials Publication, New Delhi, 2010.

६. डॉ. सुरजे बी. पी., डॉ. पवार युवराज : लिंगभाव, शाळा आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, २०१६.

७. प्रा. सुमंत यशवंत : स्त्रीवादी ओळख, प्रगत अध्ययन केंद्र, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, डिसेंबर, २०१२.

८. भागवत विद्युत : स्त्री–प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

❖❖❖

# घटक – २

# पर्यावरणवाद आणि परिसृष्टीवाद

## ( Environmentatism & Ecologism )

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ पर्यावरणवाद

 २.३.१ पर्यावरणवादाचा अर्थ व व्याख्या

 २.३.२ पर्यावरणवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी व महत्त्व

 २.३.३ पर्यावरणवादाची वैशिष्ट्ये

२.४ परिसृष्टीवाद

 २.४.१ परिसृष्टिवादाचा अर्थ व व्याख्या

 २.४.२ परिसृष्टिवादाचा विकास व स्वरूप

 २.४.३ परिसृष्टिवादाचे विविध प्रवाह

 २.४.४ सखोल परिसृष्टिवादाची आधारभूत तत्त्वे

२.५ पर्यावरणवाद व परिसृष्टिवाद यांमधील फरक

२.६ पारंपारिक व अपारंपरिक ऊर्जा स्रोत या विषयावरील चर्चा (वादविवाद)

२.७ समारोप

२.८ स्वयं अध्ययन प्रश्न

२.९ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ सूची

### २.१ उद्दिष्टे

- या घटकाच्या अभ्यासामधून पर्यावरणवादाचा अर्थ, वैशिष्ट्ये व महत्त्व समजून घेणे.
- परिसृष्टिवादाचा अर्थ व स्वरूप समजून घेणे.

- पर्यावरणवाद व परिसृष्टीवादाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
- पारंपारिक ऊर्जा व अपारंपारिक ऊर्जा स्रोत यांवरील चर्चा (वादविवाद) समजून घेणे.
- पर्यावरणपूरक जीवनपद्धतीचा शोध घेणे.

## २.२ प्रस्तावना

पर्यावरणवाद व परिसृष्टिवाद या मुद्द्यांचा (तत्त्वप्रणालींचा) आपण समकालीन राजकीय मुद्दे या अनुषंगाने अभ्यास करीत आहोत. या घटकामध्ये आपण पर्यावरणवादाचा अर्थ, वैशिष्ट्ये आणि महत्त्व जाणून घेणार आहोत. मानवी विकासाच्या प्रक्रियेत पर्यावरणाची अतोनात हानी झाली आहे. सजीव व सजीवेतर जगावरही याचा परिणाम झाला आहे म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी या विचारधारेचा उदय झालेला दिसून येतो. तसेच मानववंश केंद्री दृष्टिकोनाच्या पलीकडे जाऊन पर्यावरणाच्या शाश्वततेचा विचार करणाऱ्या परिसृष्टिवादाची विचारधारा आपण येथे अभ्यासणार आहोत. तसेच पर्यावरणवाद व परिसृष्टिवाद यांमधील फरक येथे समजून घेणार आहोत. अखेरीस पर्यावरणाची शाश्वता ज्या मुद्द्यांवर अवलंबून तो म्हणजे पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जा यावरील चर्चा समजून घेणार आहोत.

## २.३ पर्यावरणवाद

### २.३.१ पर्यावरणवादाचा अर्थ व व्याख्या

पर्यावरण संरक्षणाविषयीच्या व्यापक विचारधारेला पर्यावरणवाद असे संबोधता येईल. पर्यावरणवादामध्ये पर्यावरणाचे आरोग्य सुधारण्यावर भर दिला आहे. पर्यावरणवादाच्या मते मानवी विकासामुळे पर्यावरणाची अतोनात हानी होत आली आहे. तसेच केवळ मानव प्राणी आणि वनस्पतीच नव्हे तर (सजीवेतर) जगावर देखील याचा परिणाम झाला आहे. म्हणूनच पर्यावरणाचे पूर्वीचे वैभव पुन्हा आणण्यासाठी पर्यावरणाचे संवर्धन आणि पुनर्संचयन (पुनर्रचना) करण्याच्या अनेक पद्धतींचा (मार्गांचा) पुरस्कार पर्यावरणावादामध्ये केला आहे. हे तत्त्वज्ञान असे मानते की मानवी जीवन व इतर सजीव व्यवस्था या परस्परावलंबी आहेत तसेच त्याच्या सहअस्तित्वासाठी त्यांचा समतोल आवश्यक आहे.

**व्याख्या**

**डाना लव्हलेडी** : पर्यावरणाच्या कल्याणावर केंद्रित सामाजिक चळवळीस किंवा अशा विचारधारेस पर्यावरणवाद संबोधता येईल.

**लॉरेन इलिएट** : पर्यावरणवाद म्हणजे अशी चळवळ ज्यामध्ये पर्यावरणासाठी घातक मानवी कृतींमध्ये बदल घडवून नैसर्गिक पर्यावरणाच्या दर्जाचे संरक्षण व त्यामध्ये सुधारणा केली जाते.

## २.३.२ पर्यावरणवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी व महत्त्व

- **बौद्ध तत्त्वज्ञान**

गौतम बुद्ध हे पर्यावरण समतोलाचे समर्थक होते. प्राचीन भारतामध्ये राजे महाराजे अनेक प्रकारचे यज्ञ करीत असत. या यज्ञांमध्ये आहुती म्हणून अनेक प्राण्यांची हिंसा केली जात असे. परंतु बुद्धांना हे मान्य नव्हते. या प्राणीहत्यांचा पर्यावरण समतोलावर अनिष्ट परिणाम निश्चितच होईल असे त्यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी अशा यज्ञांना विरोध केला. म्हणूनच त्यांनी पंचशील तत्त्वामधील पहिल्या शीलामध्ये कोणत्याही प्राण्याची हत्या करू नये असे म्हटले आहे. तसेच बुद्धांनी सांगितलेल्या दहा पारमीतांमधील म्हणजेच शील मार्गांमधील नववा व दहावा मार्ग पुढीलप्रमाणे आहेत.

करुणा म्हणजेच सर्व प्राणिमात्र व मानवाविषयीची प्रेमपूर्ण दयाशीलता व मैत्री म्हणजे सर्व प्राणी, मित्र, शत्रूविषयी देखील नव्हे तर सर्व जीवनमात्रांविषयी बंधुभाव बाळगणे होय. म्हणजेच संपूर्ण बुद्ध तत्त्वज्ञानामध्ये आपल्याला सत्य, अहिंसा, करुणा व शांतीचा संदेश मिळतो. त्याचा उद्देश एकूण पर्यावरण संवर्धनाचा आहे असे नक्कीच म्हणता येईल.

थोडक्यात, पर्यावरणवाद ही अलिकडील विचारधारा म्हणून आपण अभ्यास करत असलो तरी प्राचीन काळामध्ये देखील याविषयीची जाणीव जागृत दिसते आणि पर्यावरण संवर्धनाचे प्रयत्न अनेकांनी केलेले दिसून येतात.

- **शिवाजी महाराजांचे पर्यावरण विषयक धोरण**

पर्यावरणवाद आणि परिसृष्टीवाद ह्या जरी अलीकडील काळातील संकल्पना दिसल्या तरी इतिहासामध्ये डोकावले तर पर्यावरणाविषयीची जाणीव ही इतिहास काळातच अधिक प्रगल्भ दिसते. मराठी राजवटीचा विचार केला तरी शाहू महाराजांच्या काळातील धरण प्रकल्प, पाणी साठा करण्याच्या पद्धती पाहिल्या काय किंवा त्याही पूर्वी शिवकाळामध्ये डोकावले तरी शिवाजी महाराजांच्या पर्यावरणविषयक धोरणांमध्ये ही जाणीव जागृतच दिसते.

मराठेशाहीची मुहूर्तमेढ रोवणे आणि स्वराज्य संकल्पना मनामनांत रुजविण्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना जसे अनेक निष्ठावान सहकाऱ्यांचे, मावळ्यांचे सहकार्य लाभले तसेच पर्यावरणीय घटकांचीही भूमिका मराठेशाहीच्या उदय व विकासास महत्त्वाची ठरते. महाराजांच्या राजकीय धोरणामध्ये पर्यावरणाचा अतिशय कौशल्याने उपयोग करून घेतलेला दिसतो. परंतु हे करत असताना पर्यावरणाच्या संरक्षणाचा जाणीवपूर्वक विचार त्यांनी केला होता. म्हणूनच त्यांच्या पर्यावरण नीतीचा भाग म्हणून आपल्याला गनिमी कावा, दुर्गनिर्मिती, आरमार उभारणी, जलव्यवस्थापन, वनसंपत्ती संवर्धन, दुष्काळ निर्मूलन अशा अनेक बाबींचा अभ्यास करावा लागतो. शिवरायांनी सह्याद्रीच्या डोंगररांगांवर तसेच कोकण किनारपट्टीवर अभेद्य असे दुर्ग व जलदुर्ग निर्माण करताना पर्यावरणाचा अभ्यास केल्याचे दिसून येते. पर्यावरणाचे व भूगोलाचे परिपूर्ण

ज्ञान असल्याशिवाय हे करता येणे शक्य नाही. १६६४ मध्ये बांधलेल्या सिंधूदुर्ग या जलदुर्गावरून आपल्याला याची प्रचिती येते. दुर्ग किंवा जलदुर्ग बांधताना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि पर्यावरणपूरक शौचालयांचा महाराजांचा आग्रह नेहमीच असे. पाणी उपलब्ध नसल्याने विहिरी, तलाव यांची व्यवस्था व त्यांचे संवर्धन यामधून महाराजांची जलव्यवस्था नीती दिसून येते. इ.स. १६३० तसेच १६५० या वर्षी शिवकाळामध्ये दुष्काळ पडल्याच्या नोंदी आढळतात. तेव्हाही हवामानाचा लहरीपणा लक्षात घेऊन जलव्यवस्थापनावर भर दिल्याचे दिसून येते.

शिवाजी महाराजांनी जलसंवर्धनाबरोबरच वनसंवर्धनालाही खूप महत्त्व दिले होते. गडावर आंबा, वड, नारळ, साग, शिसव अशी झाडे लावली जात होती. रायगडाच्या पायथ्याला शिवरायांची मोठी आमराई असल्याचा उल्लेख मिळतो. तसेच वृक्षतोडीस विरोधाची भूमिका त्यांनी नेहमीच घेतली. वनसंपत्ती आणि दऱ्याखोऱ्या ह्या भौगोलिक परिस्थितीचा वापर करूनच त्यांनी गनिमी कावा हे युद्धतंत्र त्यांनी विकसित केले होते.

अशा प्रकारे पर्यावरणवाद ह्या विचारधारेचा अलिकडील काळात अभ्यास होत असला तरी इतिहासामध्ये विषयीची जाणीव जागृत होती असे दिसते.

- **संत तुकारामांचे पर्यावरण पूरक विचार**

पर्यावरण विषयक जाणीव आपल्याला संत परंपरेत देखील जागृत दिसते. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, संत कबीर, संत सावता माळी, संत चोखामेळा या सर्व संतांच्या साहित्यामधून ती परावर्तित होते. भारतामध्ये संत तुकाराम महाराजांनी सुमारे चारशे वर्षांपूर्वी समाजाला वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी। पक्षीही सुस्वरे आळविती।। असा पर्यावरणासंबंधीचा संदेश दिला. संतांनी वृक्षांना आणि एकूणच सृष्टीला आपले सगे-सोयरे, नातलग, मित्र असेच मानले होते. त्यामुळे आपण या नात्यांची जशी काळजी घेतो तशीच पर्यावरणाचीही घेणे गरजेचे आहे.

## पाश्चात्त्य पर्यावरणवादाचा ऐतिहासिक आढावा

मानवी शोषणापासून पर्यावरणाचे रक्षण करण्याची गरज मानवी इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रतिपादित केली गेली आहे. जगभरातील धार्मिक आणि आदिकाळातील अनेक कृती आणि प्रघांतामधून हे तत्त्वज्ञान निर्माण झाले आहे. इ.स.वी. सन पूर्व सहाव्या शतकातील जैन धर्मामध्ये या तत्त्वज्ञानाचे पुरावे सापडतात. लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशियामधील इतर भागांमध्ये देखील अशाच पद्धतीचा प्रघात पहावयास मिळतात. पर्यावरणसंरक्षणा संबंधीचे काही सर्वात पुरातन कायदे देखील पहावयास मिळतात. सहाव्या शतकामध्ये चीन मध्ये, सातव्या शतकामध्ये मध्यपूर्वे मध्ये आणि तेराव्या शतकामध्ये इंग्लंडमध्ये यासंबंधीचे कायदे पहावयास मिळतात. मध्यपूर्वेमध्ये खलिफ अबू बक्र यांनी झाडे तोडण्यावर बंदी घातली. तर १२७२ मध्ये किंग एडवर्ड याने हवेच्या प्रदुषणात कारणीभूत ठरणाऱ्या समुद्री कोळशाच्या ज्वलनावर बंदी घातली.

आधुनिक काळामध्ये विचारवंतानी पर्यावरणाच्या भविष्यातील हानी रोखण्याच्या आवश्यकतेसंदर्भात विचार व्यक्त केले आहेत. तसेच जॉन रस्कीन, जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी आपल्या लिखाणामधून या समस्ये-विषयी चर्चा केली आहे. प्रदुषणाविषयी रस्कीनचा टिकात्मक दृष्टिकोन होता. त्याच्या मते गरिबांचे राहणीमान हे इंग्लंडमधील औद्योगीकरणाचा थेट परिणाम होता. त्याने उद्यानांच्या स्वरूपामध्ये 'हरित पट्टे' (Green Belts) निर्माण करण्याची कल्पना मांडली. त्यामुळे कोणालाही शुद्ध हवेमध्ये श्वास घेणे शक्य होईल. थोरो या अमेरिकेमधील पर्यावरणवादी विचारवंताने त्याच्या जीवनामधून पर्यावरणपूरक जगण्याचे एक उदाहरण घालून दिले. त्याने आपले जीवन वाल्डन सरोवराच्या काठी अतिशय एकाकीपणे घालवले. ते जगत असताना त्यांनी निसर्गामधून केवळ आवश्यकतेपुरते घेतले. तसेच त्याच्या परिसरामध्ये त्यांना लागणाऱ्या वनस्पतींची लागवड करीत असत. जंगलांमध्ये फिरण्यामध्ये ते आपला वेळ घालवत असत. त्यामुेच ते शेकडो वनस्पती आणि प्राणी जीवनाविषयी निरीक्षणे लिहू शकले. त्यांच्या लिखाणामुळे वन्य संरक्षणाच्या चळवळींना नेहमीच प्रेरणा मिळत आली आहे. जॉन मूर या दुसऱ्या अमेरिकेच्या विचारवंताने नेवाडा पर्वतरांगा आणि योसेमाईट प्रदेशाच्या संरक्षणासाठी प्रयत्न करण्यामध्ये आपले आयुष्य खर्च केले. परंतु १९६० च्या दशकामध्ये एक चळवळ म्हणून आधुनिक पर्यावरणवादाचा उदय झाला. औद्योगिक विकास हा एका अत्युच्च शिखरावर होता. ही विकास प्रक्रिया पर्यावरणीयदृष्ट्या विध्वंसक होती. त्याची परिणती संसाधनांच्या शोषणामध्ये झाली. पाण्याचे साठे कोरडे पडू लागले. जंगले उद्ध्वस्त झाली. नैसर्गिक संसाधनांमध्ये अपरिवर्तनीय घट झाली आणि अनेक प्राणी प्रजात आणि वनस्पतींचे जीवन संपुष्टात आले. या सर्व पार्श्वभूमीमुळे पर्यावरणवादाविषयीच्या युक्तिवादाला बळ मिळाले आहे. या परिस्थितीमध्ये अमेरिकेमधील वाळवंटातील चळवळीला आणि पर्यावरणीय न्यायाच्या चळवळीला गती मिळाली. सरतेशेवटी प्रगत देशातील शासन आणि लोकांना याविषयी पुनर्विचार करणे भाग पडली.

### २.३.३ पर्यावरणवादाची वैशिष्ट्ये

पर्यावरणवादाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. मानववंशीय केंद्री** : मानववंशकेंद्री (Anthropocentricism) शब्द ग्रीक भाषेतील 'anthropos' आणि 'Kentron' या शब्दांपासून तयार झालेला दिसून येतो. Anthropos म्हणजे 'मानव' आणि Kentron म्हणजे 'केंद्र' म्हणून Anthropocentric म्हणजे मानव केंद्रीभूतता मानवकेंद्री दृष्टिकोन हे पर्यावरणवादाचे एक वैशिष्ट्य आहे. पर्यावरणवाद निसर्गाकडे त्याची मानवाप्रती असलेल्या मूल्याच्या स्वरूपात पाहतो. मानव हा विश्वातील अतिशय महत्त्वाची अस्मिता आहे असे यामध्ये गृहीत धरले जाते. ह्या दृष्टिकोनामुळे मानव हा नेहमीच सर्वांच्या केंद्रस्थानी राहिला आहे. त्यामुळे प्रत्यक्षपणे निसर्गावर माणसाचे वर्चस्व निर्माण झाले आहे. एका अर्थाने आपण निसर्गाबरोबर कोणताही व्यवहार करू शकतो असा समज मानवामध्ये निर्माण झाला आहे. रॅशेल कारसन आणि जेम्स लव्हलॉक हे या दोहोंच्या मते मानवाचा हा दृष्टिकोन आणि त्या अनुषंगाने पर्यावरणाचे होणारे शोषण हेतुपुरस्सर नसेल परंतु अक्षम्य आहे. म्हणूनच

कारसन यांनी 'Silent Spring' या पुस्तकात मानवाला त्याच्या निसर्गाप्रती असणाऱ्या वर्तणुकीबद्दल तसेच पर्यावरणाच्या शोषणाबद्दल कडक शब्दांत जाब विचारला आहे. मानव जात ही अन्य जीवांपेक्षा अधिक महत्त्वाची आहे (मुल्यवान) आहे. ह्या चुकीच्या समजावर मानवकेंद्री दृष्टीकोन आधारला आहे.

**२. मानवी वर्चस्व** : मानववंशकेंद्री दृष्टीकोनामुळे ह्या विश्वावर मानवी वर्चस्व प्रस्थापित निर्माण झाले आहे. जंगलतोड, नद्या, समुद्र आणि महासागर यांचे प्रदूषण, वन्य जीव व वनस्पतींच्या आसऱ्याच्या ठिकाणावर कब्जा करणे, सर्वांना असुरक्षितता निर्माण होईल या प्रमाणापर्यंत हवा प्रदूषित करणे यांसारख्या आक्रमक व घातक कृतींमधून माणूस आपल्या वर्चस्वाची नेहमी जाणीव करून देत आला आहे. या सर्वाचा परिणाम म्हणून होणाऱ्या विश्वाची अपरिमित हानी होत आहे. याबद्दल त्याच्या मनामध्ये किंचितही चिंता असलेली दिसत नाही. माणसाला जणू असे वाटू लागले आहे की तोच या निसर्गाचा कर्ता करवीता आहे. माणूस हा कधीची समाधानी दिसत नाही तर नेहमी प्रत्येक गोष्टीचा हव्यास करताना दिसतो. त्याला असे वाटते की या विश्वामध्ये त्याला विशेष असे स्थान आहे.

**३. मानव हे निसर्गापासून भिन्न (वेगळा) आहे** : वरील वैशिष्ट्यांमुळे मानव अशा चुकीच्या निष्कर्षाप्रत पोहोचला आहे की मानवाचे स्थान हे निसर्गापेक्षा केवळ उच्च नाही तर तो निसर्गापासून भिन्न आहे. हे वर्चस्वाबद्दलचे केवळ गृहितक नसून तो निसर्गाशी ज्या पद्धतीने वागत आहे त्याबद्दलची बेपर्वाई आहे. माणसाचा असा समज आहे की निसर्ग हा त्याच्या वापरासाठी अस्तित्वात आहे. त्यामुळे तो आपला हक्क असल्याप्रमाणे निसर्गाच्या संपत्तीचे शोषण करीत आहे. हा विचार मानव हा सर्वात महत्त्वाचा आहे या मानववंशकेंद्री विचाराशी साधर्म्य साधतो. निसर्गातील वनस्पती किंवा प्राण्यांसारख्या इतर सर्व गोष्टी ह्या केवळ मानवाच्या गरजांसाठी आहेत. अनेक विचारवंतानी ह्या कृतींचा संबंध भांडवलशाही, पुरुषसत्ताक आणि शोषणयुक्त स्वरूपाच्या मानवी समाजाशी जोडला आहे.

**४. उथळ स्वरूप** : पर्यावरणवादाचे स्वरूप हे उथळ आहे. यामध्ये असे मानले जाते की, आपल्या जीवनपद्धतीमध्ये बदल करून तसेच आपल्या बाजूच्या पर्यावरणाबरोबरच्या आपल्या वर्तनामध्ये बदल करून आपण पर्यावरणीय समस्या सोडवू शकतो. त्यामुळेच या दृष्टिकोनाला उथळ स्वरूप प्राप्त झाले आहे. आधुनिक समाजाच्या पर्यावरणाशी असणाऱ्या वागणुकीमध्येच मूलतः काही चुकीचे आहे या वास्तवाचा विचार येथे केलेला दिसत नाही. वस्तूचे पुनर्चक्रण किंवा नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिवापरामध्ये कपात करणे यांसारखे मार्ग ही छोटी सुरुवात असली तरी ते समस्येचे शाश्वत निराकरण ठरू शकत नाहीत. यामुळे केवळ आपण शक्य तेवढे वस्तूंचे व्यवस्थापन करू शकतो. त्यानंतर सखोल परिसृष्टीवादाने जगाला शाश्वत उपाय उपलब्ध करून दिले.

**५. पर्यावरणीय समस्येविषयीचे निर्णय तज्ज्ञांकडून घेतले गेले पाहिजेत** : पर्यावरणवाद्यांच्या मते, पर्यावरणीचे समस्यांचे निरसन शोधून काढणे हे संबंधीत तज्ज्ञांचे कार्य आहे. या जगाचा एक नागरिक म्हणून माणूस आपली जबाबदारी पूर्णतः झटकून टाकतो. परंतु प्रत्येकाने हे समजून घेतले पाहिजे की पर्यावरणीय

समस्या या क्लिष्ट आहेत आणि हाताळण्यास फार अवघड आहेत. त्याचे निराकरण हे कुशल ज्ञान आणि अनुभवाने युक्त हवे. उदाहरणार्थ आरोग्य आणि प्रदुषणाशी संबंधीत बाबी ह्या त्या क्षेत्रातील ज्ञान आणि कौशल्य असणाऱ्या व्यक्तींकडून चांगल्या पद्धतीने सोडविल्या जातील. परंतु यामुळे ह्या गोष्टींमध्ये मदत करण्यासाठी काही अभिनव मार्ग शोधून काढण्याची लोकांची जबाबदारी नाहीशी होते का ? याचा विचार केला गेला पाहिजे.

**६. मानव हे निसर्गापेक्षा वेगळे आहेत** (Objects are independent of other parts) : पर्यावरणवादामध्ये निसर्गातील सर्व गोष्टींकडे यांत्रिकी दृष्टीकोनातून पहाण्यात येते. त्यामुळे मानव आणि निसर्गातील  इतर सजीव आणि निर्जीव गोष्टींमध्ये कोणतीही बांधिलकी प्रस्थापित होत नाही. खर तर मानवी पुढील पिढ्यांप्रती असणारी बांधिलकी देखील नाकारलेली दिसते. या वर्चस्ववादी दृष्टिकोनामुळे निसर्गातील जीवन व्यवस्थांचा आदर करण्याची मानवाची जबाबदारी येथे नाकारण्याचा प्रयत्न होताना दिसतो. सजीव व्यवस्थांमधील परस्परावलंबनामुळे निसर्गातील सर्वांवर ही जबाबदारी दिलेली आहे. आणि याच कारणामुळे मानव निसर्ग व निसर्गातील इतर व्यवस्था या एकमेकांपासून स्वतंत्र समजता येणार नाहीत.

## २.४ परिसृष्टीवाद

### २.४.१ परिसृष्टीवादाचा अर्थ व व्याख्या

परिसृष्टीवाद ही एक मूलगामी (radical – जहालवादी) पर्यावरणवादी तत्त्वप्रणाली आहे. यामध्ये शून्य आर्थिक वाढ आणि लोकसंख्या वाढीमध्ये कमालीची घट अपेक्षित आहे. ही तत्त्वप्रणाली मूलतः स्थानिक संस्कृती आणि राहणीमानाशी जुळवून घेण्याच्या मानवी समाजाच्या क्षमतेशी निगडीत आहे. यामध्ये प्रादेशिक परिसृष्टीय परिस्थितींना प्राधान्य दिले गेले आहे. तसेच मानवाच्या प्रत्येक कृती या सृष्टीचे संरक्षण व संतुलनाच्या दिशेनेच घडाव्यात असे अपेक्षित आहे. उदा. परिसृष्टीवादाच्या मते घरे बांधताना लोकांनी स्थानिक उपलब्ध असलेल्या वस्तूंमधून बांधावे तसेच आपल्या परिसरामध्ये निर्माण होणाऱ्या वस्तूंचाच विनियोग (उपयोग) करावा. ही उदाहरणे फार वरवरची दिसली तरी परिसृष्टीवादाचा अर्थ आणि त्याचे मूलगामी स्वरूप जाणून घेण्यासाठी मदतशीर (उपयोगी) आहेत. परिसृष्टीवादाचा अर्थ शाश्वतता तसेच ती प्राप्त करण्यासाठी मूलगामी आणि दूरगामी सुधारणांना पाठिंबा असे म्हणता येईल.

**व्याख्या :**

**१. ब्रायन बॅक्सटर** (Brian Baxter) : परिसृष्टीवाद ही एक नवी राजकीय विचारधारा असून मानवेतर जगाची दखल घेणे हे नैतिकदृष्ट्या पात्र आहे या भूमिकेवर आधारित आहे.

**१. ॲन्ड्र्यू डॉबसन** (Andrew Dobson) : परिसृष्टीवादामध्ये असे मानले जाते की शाश्वत आणि परिपूर्ण अस्तित्वासाठी (जगण्यासाठी) मानवेतर जगाबरोबरील आपले संबंध आणि आपले सामाजिक राजकीय जीवन यामध्ये परिवर्तन आवश्यक आहे / (ही पूर्ण अट आहे.)

### २.४.२ परिसृष्टीवादाचा विकास व स्वरूप

पर्यावरणीय समस्यांचे निरसन शोधण्यामधील पर्यावरणवादाच्या अपयशामधून परिसृष्टीवादाचा उदय झालेला दिसून येतो. पर्यावरणवादाला सैद्धांतिक बैठक नसल्यामुळे अनेक समस्यांना उत्तर शोधण्यामध्ये पर्यावरणवाद असमर्थ ठरला. याचे मुलभूत कारण म्हणजे पर्यावरणवादाचे कधीही समस्या व त्यांची कारणे यांचा सहसंबंध स्वीकार किंवा स्थापित करू शकला नाही. समस्या आणि कारणे ही योगायोगाने एकत्रितरित्या निर्माण झाली असे यामध्ये गृहीत धरले गेले. उदाहरणार्थ ते जगातील अनेक भागांमधील अन्न टंचाई, जंगलतोड किंवा अविकसितपणा यांसारख्या समस्यांशी संबंध जोडू शकले नाहीत. आणि याच सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात परिसृष्टीवाद यशस्वी ठरला. परिसृष्टीवादामध्ये अशी मांडणी केली गेली. ज्यामुळे सर्व समस्या समजून घेणे व त्यांचा सहसंबंध जोडणे शक्य झाले. मूलतः त्यांच्या असे लक्षात आले की या सर्व समस्या ह्या केवळ मानवाने या पृथ्वीवरील निसर्गाशी केलेल्या गैरवर्तनाचे परिणाम स्वरूप निर्माण झाल्या आहेत.

१९६० च्या दशकाच्या अंतापर्यंत अनेक विचारवंताना पर्यावरणवादाच्या कमतरता (मर्यादा) समजून येऊ लागल्या आणि या विचारप्रणालीच्या पुनर्निमाणाची अभ्यासांचे केंद्रे बनली. परिसृष्टीवादाने विचारवंतांना विविध पैलूंमध्ये संबंध प्रस्थापित करण्यास चालना दिली. या परस्परसंबंधामुळे एक समग्र दृष्टीकोन निर्माण झाला. हे विचार पर्यावरणवादाच्या जाणीवांपेक्षाही पलिकडे गेले आणि परिणामी एक पर्यावरण केंद्री विचार निर्माण झाला (दृष्टिकोन निर्माण झाला) ज्यामध्ये हे संपूर्ण जग एक आहे आणि त्यामधील प्रत्येक जीवन हे एकमेकांशी जोडलेले आणि परस्परावलंबी आहे अशी जाणीव निर्माण झाली. मानवकेंद्री दृष्टिकोनापासून पर्यावरणकेंद्री दृष्टीकोनाकडे झालेली ही वाटचाल फार महत्त्वाची होती. जेम्स लव्हलॉक, रॅखेल कारसन, जॉर्ज सेशन्स यांसारख्या विचारवंतानी परिसृष्टीवादाच्या तत्त्वप्रणालीचा विकास केला. परंतु नॉर्वेच्या पर्यावरणवादी अर्ने नॅस यांनी परिसृष्टीवादाची संकल्पना अधिक लोकप्रिय ठरली.

परिसृष्टीवाद हा भांडवलशाही वरील थेट हल्ला असून तो पर्यावरणवादाप्रमाणे कोणताही मध्यम मार्ग सुचवत नाही. भांडवलवाद आणि साम्यवाद या दोहोंचाही औद्योगिकरण हाच महत्त्वाचा जाहीरनामा असल्याचे दिसून येते. औद्योगिकरण हे पृथ्वीच्या संसाधनाच्या कायमस्वरूपी शोषणावर आधारित आहे. म्हणूनच परिसृष्टीवादाने आपल्या शतकांपूर्वीच्या मुलभूत गृहितकांनाच प्रश्न विचारले आहेत. परंतु असे करताना आपण वास्तव विसरून जातो की, आपण एका नश्वर जगामध्ये राहात असून ते जगच आपोआप आपल्या वृद्धीवर मुख्यतः औद्योगिक वृद्धीवर बंधन घालत असते.

परिसृष्टीवादामध्ये भौतिकवाद आणि अर्थकारणाला निसर्गाचे शत्रू समजले जाते. कारण यामुळे भ्रष्टाचार आणि शोषणाला वाव मिळतो आणि या अर्थाने परिसृष्टीवाद ही एक नूतन विचारप्रणाली आहे. माणसाचे निसर्गाशी असलेले नाते सुधारणे हे परिसृष्टीवादाचे उद्दिष्ट आहे. हे नाते सुज्ञपणा आणि कृतज्ञता यावर आधारलेले असले पाहिजे. मानव आणि निसर्गामधील दरी नष्ट करणे तसेच मानवामध्ये

निसर्गाप्रती जबाबदारी विषयी नैतिक जागरूकता निर्माणकरणे हे परिसृष्टीवादाचे ध्येय आहे. माणसाचे लक्ष स्वतःकडून निसर्गाकडे वळवणे ज्यामुळे त्याच्या नैतिक जाणीवेमध्ये वाढ होईल हा परिसृष्टीवादाचा हेतू आहे.

परिसृष्टीवादामध्ये देखील अनेक प्रकार आहेत. ही एक मूलगामी (जहाल) विचारप्रणाली असल्याने विविध विचारवंत विचारसरणीच्या विविध छटा घेऊन समोर येतात. कारण त्यांना हे ठाऊक असलेले दिसते की जे ते मांडतील ते सर्वच मान्य केले जाणार नाही. तसेच काहींना अत्यंत जहाल (मोठ्या) बदलांशिवाय काहीही मान्य करण्यास तयार नाहीत.

### २.४.३ परिसृष्टीवादाचे विविध प्रकार / प्रवाह

**१. सौम्य / उथळ परिसृष्टीवाद** (Shallow Ecologism) : पहिला प्रवाह म्हणजे सौम्य परिसृष्टीवाद. सौम्य परिसृष्टीवाद हा पर्यावरणवादाच्या जवळ असणारा प्रवाह आहे. कारण यामध्ये प्रगतीत किंवा औद्योगिकरणाला पूर्णतः विरोध केलेला दिसत नाही. यामध्ये केवळ प्रगती आणि औद्योगिकरणाचा वेग कमी करण्याविषयी मांडणी केलेली आहे. ते शाश्वत विकासाची मांडणी करतात परंतु मूल्यगाम्यांच्या मते आपल्या समोरील समस्यांसाठी हा केवळ मध्यम मार्ग आहेत. शाश्वत विकास हे निरसन जरी परिसृष्टीवादाच्या सर्व प्रवाहांनी मान्य केले असले तरी हा केवळ अपुरे पर्याय आहेत. ॲन्ड्र्यू हेवूड यांच्या मते सौम्य परिसृष्टीवाद हा 'प्रबुद्ध मानववंशकेंद्रिभूतते'मध्ये विश्वास ठेवतो. ज्यामध्ये अल्पकालीन व दीर्घकालीन हितामध्ये फारकत केली आहे. यामध्ये भौतिक सुखांवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत आणि निसर्गाबद्दल अधिकाधिक कृतज्ञतेची हमी देण्यात आली. यामध्ये उत्पादन व उपभोगाच्या पद्धतींमधील बदलांवर भर देण्यात आला आहे. सौम्य परिवसृष्टीवादाची कल्पना ही त्याची ध्येये साध्य करण्यासाठी राज्याच्या प्रभावाची हस्तक्षेपाच्या अपेक्षेवर आधारीत आहे.

**२. सखोल परिसृष्टीवाद** (Deep Ecologism) : परिसृष्टीवादाचा दुसरा प्रवाह म्हणजे सखोल परिसृष्टीवाद होय. सखोल परिसृष्टीवाद ही संज्ञा सर्वप्रथम नॉर्वेच्या तत्त्वज्ञ आणि विचारवंत अर्ने नॅस (Arne Naess) यांनी वापरली. त्याचा हेतू परिसृष्टीवादाचे तत्त्वज्ञान आणि मानववंशकेंद्री तत्त्वज्ञान यामध्ये फारकत करणे हा होता. सखोल परिसृष्टीवाद सृष्टीविषयीच्या आपल्या विचारांमध्ये मूलगामी बदल करण्यावर भर देतो. नॅस आमूलाग्र बदल —> आणि मूलगामी साकल्यवादाचे समर्थन करतो. त्याच्या मते सर्व गोष्टींचा परस्परसंबंध (परस्पर जोडलेपणा) हा सखोल परिसृष्टीवाद समजून घेण्यामधील महत्त्वाचा भाग आहे. नॅस असे मानतो की, या पृथ्वीवरील प्रत्येक जीवनाला फुलण्याचा, भरभराटीस येण्याचा अधिकार आहे व त्यांना अस्तित्वाचा समान हक्क प्रदान केलेला आहे. म्हणूनच निसर्गातील दुसऱ्या कोणत्याही गोष्टींच्या आधी मानवी हितसंबंधांना प्राधान्य देणे हे अविवेकी आहे. तसेच ही विचारसरणी निसर्ग आणि निसर्गातील प्रत्येक गोष्टीचे मूल्य यावर विश्वास ठेवते. हे गाभामूल्य निसर्गामधून मिळविल्यामुळे नैतिकच असते. मानव जोपर्यंत हे चुकीच्या पद्धतीने हाताळत नाही तोपर्यंत ते मूल्य शूद्ध राहते. ही मांडणी

निसर्गातील प्रत्येक गोष्टीचे मूल्य हे तिच्या उपयोगितेवर ठरते. या पर्यावरणवादाच्या गृहितकाच्या विरुद्ध असल्याचे दिसते. म्हणजेच वनस्पती किंवा नद्या यांचे मूल्य हे त्यांच्या मानवासाठी असलेल्या उपयोगितेवरून ठरत नाही. या उदाहरणावरून हे अधिक समजून येईल. ते या निसर्गाची एक निर्मिती असल्याने ते निसर्गाचे अविभाज्य भाग आहेत आणि त्यामुळेच त्यांना महत्त्वाचे मूल्य प्राप्त झाले आहे.

सखोल परिसृष्टीवादामध्ये देखील शाश्वततेचा पुरस्कार केला आहे. परंतु येथे अधिक सशक्त शाश्वतता अपेक्षित आहे. येथे पुढील पिढ्यांसाठी निसर्ग आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी कोणत्याही वरवरच्या बदलांना पाठिंबा दिलेला नाही. येथे शाश्वतता म्हणजे माणूस ज्या पद्धतीत आपले जीवन व्यतीत करतो ती पद्धत अपेक्षित आहे. येथे विकासासाठी विकास याचे समर्थन खोल परिसृष्टीवाद करत नाही. यामध्ये अधिक साध्या आणि काटकसरी जीवनपद्धतीबद्दल सांगितले गेले आहे. त्यांच्या मते जेव्हा माणसा–माणसांमधील हा भेद जेव्हा नाहीसा होईल तेव्हा सर्वांच्या आयुष्यामध्ये आनंद आणि परिपूर्णता निर्माण होईल. येथे हा मूलगामी विचार आहे की आर्थिक फायद्यासाठी निसर्गाशी छेडछाड करण्यापेक्षा निसर्गाला आहे तसंच स्वीकारणं गरजेचं आहे.

### २.४.४ सखोल परिसृष्टीवादाची आधारभूत तत्त्वे

**१. आंतरिक मूल्य** : पृथ्वीवरील प्रत्येक मानवी व मानवेतर जीवनाला एक आंतरिक मूल्य असते. ही मूल्ये मानवी हेतूंसाठी मानवेतर जगाच्या असणाऱ्या उपयोगितेपासून स्वतंत्र असतात. मानवेतर जगामध्ये झाडे, नद्या आणि संपूर्ण परिसृष्टीचा समावेश होतो. एखाद्या गोष्टीचे आंतरिक मूल्य ओळखणे म्हणजे त्या गोष्टीचे निसर्गातील स्थान ओळखण्याचा मार्ग होय. यामुळे आपणास या संपूर्ण सृष्टीचे आकलन होते.

**२. विविधता** : या सर्व जीवनांमध्ये एक समृद्धता आणि विविधता आहे. विविधता ही स्वतःमध्येच एक मूल्य आहे. वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रत्येक प्रजातीचे या समृद्धतेत आणि विविधतेत आपले योगदान देत असतात. तसेच सातत्याने चालणाऱ्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेबरोबर या समृद्धतेत वाढ होताना दिसते. अगदी सूक्ष्म जीवाचे योगदान देखील नाकारणे म्हणजे या परिसृष्टीतील त्याची भूमिका नाकारल्यासारखे होईल.

**३. महत्त्वाच्या / आवश्यक गरजा** : प्रत्येक मानव किंवा मानवेतर जीवाला काही आवश्यक गरजा असतात. म्हणूनच स्वतःच्या गरजा भागविण्या पलीकडे मानवाला या विविधतेला कोणताही धक्का लावण्याचा अधिकार नाही. अर्थात देशांमधील नैसर्गिक साधन संपत्तीचे शोषण एका रात्रीत थांबणे शक्य नाही खास करून ज्या देशांमध्ये लोकांना नैतिक संपन्नतेत जगण्याची सवय झाली आहे अशा देशांमध्ये हे चित्र पालटणे तितकेसे सोपे नाही. परंतु निसर्गाच्या या शोषणामुळे आधीच या जीवन व्यवस्थेची अवनती झाली आहे. तसेच अनेक प्रजाती दुर्मीळ होण्याच्या परिस्थितीत आहेत. म्हणून सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आवश्यक गरजा ओळखणे जेणेकरून त्या भागविण्यासाठी होणारा मानवी हस्तक्षेप कमीत कमी करता येईल.

**४. लोकसंख्येतील/ची घट** : जर मानव आणि मानवेतर जीवांच्या जीवनांची भरभराट व्हायची असेल तर मानवी लोकसंख्येमध्ये लक्षणीय घट होणे आवश्यक आहे. मोठ्या लोकसंख्येमुळे उपभोग्यतेचे तसेच कचरा निर्मितीचे प्रमाण वाढते. परिणामी नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण मोठ्या प्रमाणावर होते. यामुळे जीवावर म्हणजेच परिसृष्टीला मोठा धोका निर्माण होतो. म्हणूनच सखोल परिसृष्टीवादाचे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे मानवी लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर कमी झाली पाहिजे. म्हणजे त्यामुळे ती परिसृष्टीवादाच्या उद्देशाशी सुसंगत असेल.

**५. मानवी हस्तक्षेप** : नॅस यांच्या मते मानवेतर जगतामधील हस्तक्षेप हा वाढत आहे आणि परिस्थिती वेगाने बिघडत आहे. याचे परिणाम जंगलतोड, अनेक प्रजाती दुर्मीळ बनणे इ. या स्वरूपात दिसून येतात. निसर्गातील इतर जीवांची पर्यावरणीच अपरिहार्यता मानवी जगताने ओळखली पाहिजे आणि जतन केली पाहिजे. याकरिता त्यांनी निसर्गामधील आपला हस्तक्षेप व आधुनिकता यावर मर्यादा घातल्या पाहिजेत.

**६. धोरणात्मक बदल** : वरील तत्त्वे प्रत्यक्षात आणण्यासाठी धोरणांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. अलीकडे बहुतांश देशांमध्ये अवलंबली जाणारी आर्थिक वृद्धी (आर्थिक विकास) सखोल परिसृष्टी-वादाच्या उद्दिष्टांच्या विरुद्ध आहे. प्रचंड उत्पादन आणि वापर (खप) ही आज प्रतिष्ठेची मापदंडे झाली आहेत. विकसनशील देश देखील या धोरणांमुळे होणाऱ्या अपरिमित हानीचा विचार न करता विकसित देशांचे अनुकरण करत आहेत. धोरणांमध्ये बदल घडवून आणल्यास सद्य परिस्थितीमध्ये खोलवर बदल होण्याची शक्यता आहे. सखोल परिसृष्टीवाद मध्यम मार्गी तसेच पर्यायी तत्त्वज्ञानावर भर देतो.

**७. जीवनाचा दर्जा** : सखोल परिसृष्टीवादामध्ये उच्च राहणीमानाच्या दर्जापेक्षा स्वाभाविक मूल्य असणाऱ्या जीवनावर भर दिला आहे. ही तत्त्वे असे सांगतात की अशा परिस्थितीमध्ये माणसाला मोठे आणि महान यामधील फरकाबद्दल जाणीव निर्माण होईल. जीवनाचा दर्जा भौतिकतेमध्ये मोजू शकत नाही. या निसर्गाचा राज्यकर्ता म्हणून नव्हे तर निसर्गाचा भाग म्हणून जीवनामध्ये मूल्ये, नैतिकता आणि जबाबदाऱ्या पार पाडून हे अधिक अनुभवता येईल.

**८. कृतीचे बंधन** : सखोल परिसृष्टीवादाप्रमाणे जे कोणी वरील तत्त्वांशी सहमत असतील त्यांच्यावर आवश्यक बदल करण्याचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष बंधन आहे. परिसृष्टीवाद ही केवळ एक विचारधारा नाही तर कृतीयोजना आहे हे या तत्त्वाने अधोरेखित केले आहे. प्रत्येकावरच अशी कृती करण्याची आणि बदल अंमलात आणण्याची जबाबदारी आहे.

वरील तत्त्वांवरून हे स्पष्ट होते की, नॅसचा उद्देश मानवांना सर्वच प्रकारच्या जीवनांबद्दल आदर असावा हाच होता. त्याच्या मते, या वागण्यामध्ये एक परिसृष्टीय शहाणपण आहे ज्याला तो 'Ecosophy' म्हणजेच परिसृष्टीय युक्तिवाद असे संबोधतो. अर्ने नॅस यांनी त्यांच्या तत्त्वज्ञानाला एक आध्यात्मिक आधार प्रदान केला आहे. सखोल परिसृष्टीवादाचे पुरस्कर्ते आधुनिक औद्योगिक समाजाच्या विनाशीपणामुळे फार दुखावले गेले आहेत. (सखोल परिसृष्टीवादाच्या पुरस्कर्त्यांना आधुनिक औद्योगिक समाजामधील

विनाशीपणा / वृत्ती मान्य नाही) नॅस यांना असे वाटते की आपण आहे त्या परिस्थितीबरोबर पुढे जाऊ शकत नाही. म्हणूनच आपल्याला आहे त्याही पेक्षा अधिक चांगले काही केले पाहिजे. नॅस यांच्या तत्त्वज्ञानाचा हेतू भिन्न सांस्कृतिक आणि धार्मिक पार्श्वभूमी असणाऱ्या लोकांच्या मनात जागृती निर्माण करणे हा आहे. त्याला असे वाटते की एका व्यक्तीने ह्या तत्त्वांप्रमाणे कृती करण्यास आरंभ केला की ते निश्चितच अशा समविचारी लोकांच्या संपर्कात येतील. अशा प्रकारची पर्यावरण संरक्षणाप्रतीची सामूहिक जबाबदारी निश्चितच पर्यावरणीय संकट निवारण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल.

नॅस प्रामाणिकपणे मान्य करतात की त्यांच्याकडे संपूर्ण योजना तयार नाही. परंतु त्यांना असे वाटते जसे आपण या दिशेने मार्गक्रमण करू त्याप्रमाणे ती योजना विकसित करता येईल / करावी लागेल. पुढील कृती योजना कोणती असावी हे जाणून घेण्यासाठी तो प्रश्न विचारण्याची पद्धती अवलंबतो. समस्या आणि प्रश्नांच्या मूळाशी जाण्याचा तो प्रयत्न करतो. त्याच्या मते प्रश्न विचारण्याची ही प्रक्रिया निरंतरपणे चालू असते. आणि त्यांच्या परिणामस्वरूप त्यांच्या अपेक्षित असलेले सर्व प्रत्यक्षात येण्यास मदत होते. या परिणामांनाच तो 'Ecosophy T' असे संबोधते. यामधील 'T' हे अक्षर डोंगरामधील त्याच्या घराचे प्रतिनिधीत्व करते. त्याच्या मते 'Ecosophy T' (पर्यावरणीय तत्त्वज्ञान) अहिंसा, प्रेम, कौतुक, नम्रता आणि आदर या सर्वांचे प्रतिनिधित्व करते. तसेच या विचारधारेमध्ये जीवनाचे आधार प्रतिबिंबीत होतात.

## २.५ पर्यावरणवाद व परिसृष्टीवाद यांमधील फरक (भेद)

पर्यावरणवाद आणि परिसृष्टीवाद ह्या दोन भिन्न तत्त्वप्रणाली आहेत. ज्या समकालीन पर्यावरणीय समस्यांकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात. या दोन्हींमध्ये मुलभूत फरक दिसून येतात. पर्यावरणवादाची मुळं आपल्याला इतिहासामध्ये खोलवर दिसतात तर परिसृष्टीवाद ही तुलनात्मकरित्या नवीन तत्त्वप्रणाली दिसते. परिसृष्टीवादाचा उदय प्रामुख्याने १९६० आणि १९७० च्या दशकांमध्ये झाला. या दोन्ही तत्त्वज्ञानांमधील काही तत्त्वे ही परस्परविरोधी असलेली दिसतात तर काही त्या त्या विचारप्रणालीमध्येच वैशिष्ट्यपूर्णपणे आढळतात. आता आपण पर्यावरणवाद व परिसृष्टीवाद यांमधील फरक पुढील मुद्द्यांच्या आधारे पाहू.

**१. मानववंशकेंद्री विरुद्ध पर्यावरण (परिसृष्टी) केंद्री :** पर्यावरणवादाचा निसर्ग आणि पर्यावरण समस्यांप्रती असलेला दृष्टिकोन हा मानवकेंद्रि आहे. तसेच पर्यावरणवाद हा मानवाचा त्यांच्या सभोवतालच्या पर्यावरणाकडे पाहण्याचा एक पारंपरिक दृष्टिकोन आहे. मानव हे या भूतलावरील सर्वात महत्त्वाची अस्मिता (गोष्ट) आहे असे मानवकेंद्रीवादामध्ये समजले जाते. यामध्ये जगातील प्रत्येक सजीव व निर्जीव गोष्टींचे मूल्य त्याच्या उपयोगितेवर ठरविले जाते. मानवेतर जगाशी असणाऱ्या मानवी व्यवहारामध्येही मानवी मूल्ये आणि प्रघातांना महत्त्वाचे स्थान असलेले दिसते. या दृष्टिकोनामुळे एक श्रेणीबद्ध व्यवस्था निर्माण होते. त्यामध्ये मानवाला सर्वात महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. अशा प्रकारचा समज हा केवळ मानवजातीसाठी नव्हे तर या पृथ्वीवरील प्रत्येक गोष्टीसाठी घातक आहे. मानवकेंद्री दृष्टिकोनामुळे प्रत्येक

गोष्टीचा तिच्या मानवासाठी असलेल्या उपयोगितेच्या दृष्टिकोनातून विचार केला जातो. परिणामी नैसर्गिक संसाधने आणि इतर जीवन व्यवस्थांचे अपरिमित शोषण होत आहे. इतरांना जे नाकारले जाते ते सर्व मानव जातीसाठी विशेषाधिकार म्हणून प्रदान केले जाते. पर्यावरणवादी हे मानवेतर जगाला मानवाकडून होणाऱ्या हानीबद्दल उदासीन दिसतात.

याउलट परिसृष्टीवादाचा दृष्टिकोन हा पर्यावरणकेंद्री किंवा जैव–केंद्रि असल्याचे दिसून येते. पर्यावरण केंद्री दृष्टिकोन वस्तूंच्या मानवाप्रती असलेल्या उपयोगितेचा विचार न करता वस्तूच्या आंतरिक मूल्यामध्ये विश्वास ठेवतो. हा दृष्टिकोन मानवकेंद्री नसून निसर्गकेंद्री असल्याने येथे संपूर्ण जीवावरण महत्त्वाचे आहे आणि मानव हा केवळ या विस्तृत निसर्गव्यवस्थेचा एक भाग आहे. अशा प्रकारे परिसृष्टीवादामध्ये कोणत्याही श्रेणीबद्ध व्यवस्थेशिवाय किंवा कोणत्याही एका जीवाला महत्त्व देण्यापेक्षा संपूर्ण निसर्गावर भर दिलेला आहे.

**२. उथळ दृष्टिकोन आणि सखोल दृष्टिकोन** : पर्यावरणवाद पर्यावरणीय समस्यांचे निराकरण शोधण्याकडे एक संकुचित दृष्टिकोनातून पाहतो. यामध्ये या समस्यांमधून बाहेर पडण्यासाठी माणसाच्या जीवनपद्धतीमध्ये अगदी लहान आणि वरवरचे बदल सुचविले आहेत. याचा सरळ अर्थ म्हणजे हा दृष्टिकोन समस्यांच्या मुळाशी पोहोचण्याचा प्रयत्न करीत नाही. या दृष्टिकोनामध्ये माणसाच्या जीवनशैलीत कोणतेच मूलगामी बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. कपात, पुनर्वापर आणि पुनप्रक्रिया (Reduce-Reuse-Recycyle) हा पर्यावरणवादाचा एक कार्यक्रम हे त्याचेच एक उदाहरण आहे. पर्यावरणवाद काही गोष्टींच्या वापरावर बंदी आणण्यावर भर देत नाही तर केवळ वरील प्रमाणे तीन आर (Rs) चा कार्यक्रम अवलंबण्याची शिफारस करतो. हा दृष्टिकोन अगदीच उथळ आहे. कारण नैसर्गिक संसाधनांचा वापर तसेच निसर्गाचे शोषण बाबत कोणतीच ठाम भूमिका यामध्ये घेतली गेलेली दिसत नाही. निसर्गातील जे काही जोपर्यंत माणसाच्या उपयोगाचे आहे तोपर्यंत त्याचा वापर परंतु केवळ काळजीपूर्वकरित्या करण्याची मांडणी यात केली आहे.

याऊलट सखोल दृष्टिकोन अशा सर्व वरवरच्या कृतींचे खंडन करतो. हा दृष्टिकोन माणसाच्या जीवन पद्धतीमध्ये पायाभूत व मूलगामी बदल करण्याचे समर्थन करतो. या दृष्टिकोनामध्ये केवळ मानवाला उपयोगी आहे तितकेच घेण्यावर भर दिला आहे. ही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्या दृष्टिकोनामध्ये लोकसंख्येमध्ये तीव्र घट आणि शून्य आर्थिक वाढ यांचे समर्थन केले आहे. अशा प्रकारच्या अभूतपूर्व कल्पनांमुळे ह्या तत्त्वप्रणालीचे समर्थकांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. यासारख्या मूलगामी बदलांसाठी अनेक अनावश्यक गोष्टींचा त्याग करणे गरजेचे आहे. जे अनेक लोकांना मान्य होण्यासारखे दिसत नाहीत. परंतु जे याचे समर्थक आहेत ते मात्र या तत्त्वप्रणालीच्या परिणामकारकतेबद्दल खात्रीशीर आहेत.

**३. अस्तित्वात असणाऱ्या रचनांमध्ये बदल विरुद्ध समाजाचे पुनर्निर्माण** : पर्यावरणामध्ये अस्तित्वात असलेल्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक रचनांमध्ये बदल करण्याचे समर्थन केले आहे. या जगाने आणि जगातील लोकांनी व त्यांच्या पुढाऱ्यांनी हे ठरविले आहे की काय स्वीकारार्ह गोष्टी

अंमलात आणण्याचा विचार करतात. परंतु या मार्गामध्ये अनेक अडचणी आहेत. जगात असणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या शासनव्यवस्थांना हे बदल प्रत्यक्षात आणणे सोपे नाही. उदाहरणार्थ विकसनशील देशांना त्यांच्या आर्थिक धोरणांसहीत त्यांच्या विकासाच्या (जाहीरनाम्यांमध्ये) धोरणांमध्ये अशा प्रकारचे पर्यावरणदृष्ट्या आवश्यक बदल करणे अतिशय अवघड आहे. अशाप्रकारे हे स्पष्ट आहे की पर्यावरणवाद हा केवळ एक मध्यम मार्ग आहे.

परंतु परिसृष्टीवादामध्ये संपूर्ण समाजाच्या पुनर्बांधणीची गरज प्रतिपादित केली गेली आहे. यामध्ये केवळ राजकीय व आर्थिक बाजूंवर भर दिला गेला नाही तर संपूर्ण समाजामध्ये सुधारणा करणे हे या तत्त्वप्रणालीचे उद्दिष्ट आहे. आपल्या जगण्याच्या पद्धतीमध्ये मूलगामी बदल करणे आणि त्यायोगे आपणाला राज्याकडून अपेक्षित असलेल्या राजकीय व आर्थिक अपेक्षांमध्ये बदल घडवून आणणे हे या विचारधारेचे उद्दिष्ट आहे. या प्रक्रियेसाठी मानवाच्या गरजा, संसाधनाचा वापर आणि भविष्याबद्दल असलेल्या कल्पना यांमध्ये मूलभूत परिवर्तन होण्याची गरज आहे. या दृष्टिकोनमध्ये असे मानले आहे की एकदा जर माणसाने काटकसरी आणि गरजांवर आधारित जीवन जगण्याची सुरुवात केली की बाकी सर्व आपोआप सुरळीत होईल. परंतु अशा प्रकारची आमूलाग्र पुनर्रचना हे फार मोठे कार्य असणार आहे.

**४. विचारांना ऐतिहासिक पार्श्वभूमी विरुद्ध** : नवीन संकल्पना पर्यावरणवादाला एक ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. इतिहासकाळापासून विचारवंतानी आपले दृष्टिकोनाची मांडणी केली आहे. आपण सहाव्या शतकापासून पर्यावरणाच्या संरक्षणासाठी निर्णय घेणाऱ्या अनेक राज्यकर्त्यांची उदाहरणे पाहिली. परंतु एकोणिसाव्या शतकापासून या विचारांची औपचारिक मांडणी होऊ लागली. पर्यावरणाचा चिरकालापर्यंत उपयोग करता यावा म्हणून आपण पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे हे तत्त्व पर्यावरणवादामध्ये प्रतिपादित केले आहे.

परिसृष्टीवाद ही तुलनात्मकरित्या नवीन विचारधारा आहे. या तत्त्वप्रणालीचा उदय १९६० आणि १९७० च्या दशकामध्ये झालेला दिसून येतो. पर्यावरणीय समस्यांचे निरसन शोधण्यामधील पर्यावरणवादाच्या अपयशामधून परिसृष्टीवादाचा उदय झाला असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. यामध्ये पर्यावरण समस्या सोडविण्यासाठी अनेक नावीन्यपूर्ण कल्पना सुचविल्या गेल्या. खरं तर जग हे एका नवीन राजकीय आणि आर्थिक युगाकडे मार्गक्रमण करत होते. लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागृती निर्माण झाली होती. ज्यामुळे अशा प्रकारची विचारधारा निर्माण होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले होते.

**५. राजकीय दृष्टिकोन विरुद्ध धार्मिक, आध्यात्मिक दृष्टिकोन** : पर्यावरणवाद हा एक राजकीय दृष्टिकोन आहे. पर्यावरणीय प्रश्न सोडविण्यासाठी तो पूर्णपणे राजकीय व्यवस्थेवर अवलंबून आहे. हा दृष्टिकोन असे मानतो की केवळ राज्यसंस्था या संदर्भामध्ये भूमिका बजावू शकते. म्हणूनच विकास प्रक्रिया निरंतरपणे सुरू ठेवणे व त्याच वेळी आवश्यक कायदे, नियम आणि समाजाचे नियमन करून पर्यावरणाच्या समस्या सोडविणे हे दोन्ही कर्तव्ये राज्याचीच आहेत.

दुसऱ्या बाजूला परिसृष्टिवाद मात्र जीवनाप्रती असलेल्या नैतिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनामध्ये या तत्त्वज्ञानाची तत्त्वे शोधण्याचा प्रयत्न करतो. यामध्ये लाभदायक परिणामांसाठी समाजातील सर्वांच्याच सहभागाची गरज प्रतिपादित केली आहे. यामध्ये कृती केवळ राजकीय व्यवस्थेपुरती मर्यादित नाहीत. परिसृष्टीवादामध्ये या विचारधारेची तत्त्वे मानवी जीवनात अवलंबवण्यासाठी त्याच्या जीवनाच्या आध्यात्मिक आयामावर प्रकाश टाकते. तसेच निसर्गाशी सुसंगत अशी जीवनपद्धती शिकविणाऱ्या धार्मिक तत्त्वावरही येथे भर दिला आहे.

**६. पर्यावरणीय समस्या सोडविण्यामधील विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका विरुद्ध अशा भूमिकांचे खंडन** : पर्यावरणवादामध्ये तंत्रज्ञानाचा वापर टाळण्यापेक्षा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वेगळ्या पद्धतीने उपयोग करून पर्यावरणाच्या समस्या सोडविता येतील. तंत्रज्ञान शोधून सोडवणे नक्कीच शक्य आहे. म्हणून पर्यावरणवादामध्ये औद्योगिकरणाला विरोध केलेला दिसत नाही आणि याच कारणामुळे पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यात पर्यावरणवादाला यश आले नाही.

परिसृष्टिवादामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या या भूमिकेचे खंडन केले आहे. यामध्ये असे मानले आहे की विज्ञान तंत्रज्ञान या सर्व समस्यांसाठी जबाबदार आहे. त्यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने या समस्यांचे निराकरण करणे शक्य नाही. म्हणूनच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने समस्यांचे निरसन शोधता येईल. या समाजाचे परिसृष्टीवादामध्ये खंडन केले आहे. यामध्ये तत्त्वज्ञानाशिवाय किंवा तंत्रज्ञानाच्या अत्यल्प मदतीने असणारी मुलभूत मानवी जीवनपद्धती अपेक्षित आहे.

**७. पिरॅमिड दृष्टिकोन विरुद्ध महासागरास्वरूपातील (विस्तृत) दृष्टिकोन** : पर्यावरणवादामध्ये पिरॅमिड दृष्टिकोन आढळून येतो. मानव हा या संपूर्ण सजीव सृष्टीमधील सर्वात वरिष्ठ श्रेणीमधील जीव आहे असे पर्यावरणवादामध्ये मानले गेले आहे आणि इतर सर्व जीवनांना हे त्यांच्या मानवाप्रती असलेल्या उपयोगितेच्या आधारावर मानवा नंतरच्या श्रेण्यांमध्ये स्थान मिळते. म्हणूनच अशाप्रकारे मानवापेक्षा कनिष्ठ पातळीवर स्थान असणारे जीव हे मानवापेक्षा कमी महत्त्वाचे असणार आहेत. या दृष्टिकोनामध्ये एक श्रेणीबद्ध व्यवस्था निर्माण केल्याचे दिसते. ज्यामध्ये प्रत्येक गोष्टीचे स्थान हे त्या गोष्टीचे मानवापती असणाऱ्या महत्त्वावर ठरते.

याउलट परिसृष्टिवादामध्ये विस्तृत दृष्टिकोन स्वीकारला आहे आणि त्याप्रमाणे या परिसृष्टीतील सर्व गोष्टींना समान लेखले गेले आहे. कारण कोणतीही जीवन व्यवस्था स्वतंत्र असू शकत नाही तर सर्व जीवन व्यवस्था या परस्परांवर अवलंबून असतात. यामध्ये या पृथ्वीतलावरील प्रत्येक जीवनाचे महत्त्व अधोरेखित केले असून येथे शोषणाला जागा नाही. पर्यावरणवादामधील मानव हा या जगातील सर्वात महत्त्वाची अस्मिता असून त्याला निसर्गातील इतर गोष्टींशी त्यांच्या इच्छेप्रमाणे वर्तन करण्याचा अधिकार आहे या कल्पनेला परिसृष्टीवादामध्ये नाकारले आहे. या विस्तारित दृष्टिकोणामध्ये परिसृष्टीवादाच्या तत्त्वज्ञानाचे अतिशय समर्पक स्पष्टीकरण केले गेले आहे.

**८. नियंत्रित औद्योगिकरण विरुद्ध औद्योगिकरणाला विरोध :** पर्यावरणीय समस्या ह्या प्रत्यक्षात अनियंत्रित औद्योगिकरणाचे परिणाम आहेत. या समस्यांसाठी कारणीभूत असणारा हा सर्वात मोठा घटक आहे. म्हणूनच पर्यावरणवादामध्ये नियंत्रित औद्योगिकरणाचा पुरस्कार केला गेला आहे. म्हणजेच औद्योगिकरण झाले पाहिजे परंतु काही मर्यादांसहीत किंवा बदलांसहित. या कारणामुळेच पर्यावरणवादाकडे संकुचित विचारधारा/उथळ तत्त्वज्ञान असे संबोधण्यात येते. या तत्त्वज्ञानामध्ये केवळ वरवरच्या उपाययोजना करून समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

परिसृष्टीवाद ही विचारधारा संपूर्णपणे औद्योगिकरणाच्या विरोधात आहे. यामध्ये राज्याने औद्योगिकरणाची प्रक्रिया पूर्णपणे थांबवावी असे सांगितले आहे. परिसृष्टीवादाचा आर्थिक विकासाला (वृद्धीला) संपूर्णपणे विरोध असल्याने या तत्त्वज्ञानात औद्योगिकरणाला काहीही महत्त्व दिलेले नाही. या तत्त्वज्ञानामध्ये अत्यंत साध्या राहणीचा पुरस्कार केला गेला आहे. या पृथ्वीतलाच्या या दयनीय अवस्थेसाठी औद्योगिकरणाला जबाबदार धरले गेले आहे. म्हणूनच परिसृष्टीवादाच्या मते औद्योगिकरणास विरोध हाच केवळ या सृष्टीला वाचविण्याचा मार्ग आहे.

**९. लोकसंख्येबाबत कोणतीही भूमिका नाही विरुद्ध लोकसंख्येमध्ये कपात :** पर्यावरणवादामध्ये लोकसंख्येबाबत कोणतीही भूमिका मांडलेली दिसत नाही. पर्यावरणावादाच्या चर्चेमध्ये लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांची चर्चा कुठेच होताना दिसत नाही. परंतु हा या विचारधारेतील दोष आहे कारण लोकसंख्येमुळे नैसर्गिक संसाधनांवर अत्यंत दबाव निर्माण होतो. प्रचंड लोकसंख्येचे नियमन करणे अत्यंत कठीण आहे तसेच त्यामुळे या सृष्टीचे संरक्षण करण्याच्या उपाययोजनांमध्ये देखील अपयश येते / अपयशास कारणीभूत ठरते.

परिसृष्टिवादामध्ये हे स्पष्ट केले आहे की जर पृथ्वीतलाचे संरक्षण करावयाचे असेल तर लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात घट होणे आवश्यक आहे. जेवढी अधिक लोकसंख्या तेवढा नैसर्गिक साधनांवरील दबाव अधिक आणि अधिक शोषण. मोठी लोकसंख्या ही एखाद्या विस्फोटकाप्रमाणे आहे. त्यामुळे केवळ संसाधनांचे अधिकाधिक वापर होत नाही तर त्यांचे नियमनही कठीण होते. अशा प्रकारे पर्यावरणातील लोकसंख्येच्या परिणामाचे विश्लेषण व चर्चा होणे आवश्यक आहे.

## २.६ पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जास्रोतांमधील या विषयावरील चर्चा

आधुनिक पद्धतीच्या विकासासाठी ऊर्जेच्या अक्षय (अनंत) पुरवठ्याची आवश्यकता असते. ऊर्जा ही विकासाचा आधार आहे त्याचबरोबर विकासाचा स्रोत आहे. साहजिकच प्रत्येक राष्ट्राला जगाचे नेतृत्व करण्याची किंवा नेतृत्व करणाऱ्या गटामध्ये सामील होण्याची इच्छा असते, त्यामुळे ऊर्जा स्रोतांचे अधिकाधिक शोधन, वापर आणि ते प्राप्त करणे हे त्यांच्या कृती योजनेमध्ये सर्वात वरच्या प्राधान्य क्रमामध्ये समाविष्ट असते. आजचा उपलब्ध ऊर्जास्रोतांचा साठा जर पाहिला तर आपल्याला दाहक वास्तवाची जाणीव होईल. ते वास्तव म्हणजे विकासाच्या प्रक्रियेमध्ये देश ऊर्जास्रोतांचे इतक्या भयप्रद प्रमाणापर्यंत शोषण करत आहे की

त्यांनी या पृथ्वीतलावर अनंत अडचणी निर्माण केल्या आहेत. प्रचंड प्रमाणावरील जंगलतोड, खाणकाम, तेल शुद्धीकरण प्रकल्प इ. अनेक अपारंपारिक ऊर्जास्रोतांच्या ऱ्हासास कारणीभूत ठरत आहेत. उदाहरणार्थ अन्न आणि कृषी संघटनेच्या (FAO) माहितीनुसार प्रतिवर्षी अठरा दशलक्ष एकर जंगले कमी होत आहेत; याचा अर्थ प्रत्येक सेकंदाला दीड एकर जंगले कमी होत आहेत आणि याच वेगाने हे घडत राहिले तर शंभर वर्षांच्या आतच पृथ्वीवरील सर्व जंगले नष्ट होतील. त्याचप्रमाणे खाणकामामुळे केवळ हवा जमीन आणि पाणी प्रदूषित होत नसून त्याचा या सृष्टीतील अनेक जीवांचे निवारे नष्ट होत आहेत.

या सर्व परिस्थितीमुळे जगातील सर्व राष्ट्रांसमोर पर्यायी ऊर्जास्रोतांचा शोध घेण्याची गरज उभी राहिली आहे. पारंपारिक ऊर्जास्रोत हे अतिशय मर्यादित आहेत. आणि कोणतेही राष्ट आज ऊर्जास्रोतांशिवाय विकास करू शकत नाही. त्यामुळेच पारंपारिक ऊर्जास्रोतांना पर्याय शोधण्याव्यतिरिक्त आणि अपारंपारिक ऊर्जास्रोतांचा वापर करण्याशिवाय कोणताही पर्याय ऊरला नाही. अशा प्रकारचे अपारंपारिक स्रोत म्हणजे सौर ऊर्जा, समुद्राच्या लाटांपासून निर्माण होणारी ऊर्जा, पवन ऊर्जा, जैव ऊर्जा इत्यादी होत. अशा प्रकारचे ऊर्जास्रोतांचा वापर करण्याविषयीची चर्चा गेल्या काही वर्षांपासून सुरू झालेली दिसून येते. परंतु अजूनही जगाला पारंपारिक ऊर्जा स्रोतांना पूर्णपणे पर्याय निर्माण करण्यात यश मिळालेले नाही.

**पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जास्रोतांमधील फरक** : पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जा स्रोतांबद्दलची जागतिक चर्चा समजून घेण्यापूर्वी आपण यांमधील फरक जाणून घेऊ. पाणी, कोळसा, नैसर्गिक वायू आणि पेट्रोलियम सारख्या पारंपारिक ऊर्जास्रोतांचा वापर आपण फार काळापासून करत आलो आहोत. पाणी सोडले तर इतर सर्व स्रोत मर्यादित स्वरूपात उपलब्ध आहेत. वास्तविक पाणी हा स्रोतदेखील अनेक वेळा बेजबाबदार वापर आणि प्रदूषण यांसारख्या करणांमुळे अनेकदा हानी होत आली आहे. हे सर्व पारंपरिक स्रोत जमिनी मधून उत्खनन करून मिळवावे लागतात. तसेच काहींचा साठा करावा लागतो. त्यांना वापरण्यायोग्य बनविण्यासाठी त्यांच्यावर प्रक्रिया करावी लागते. तसेच स्रोतांबाबत आणखी एक काळजीची गोष्ट म्हणजे ते ऊर्जा स्रोत भविष्यात संपूण शकतात व पुन्हा नूतनीकृत करणे शक्य नाही. आणि याच कारणामुळे आपण त्यांसाठी पर्याय शोधत आहेत.

या उलट अपारंपारिक ऊर्जा स्रोत हे अक्षय आहेत तसेच ते कमी खर्चिक असून स्थानिक पातळीवरही याची निर्मिती व वापर करता येणे शक्य आहे. या ऊर्जा स्रोतांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रदूषणमुक्त आहेत. सौर ऊर्जा, लाटांची ऊर्जा, जैव ऊर्जा आणि भूऔष्णिक ऊर्जा ही या ऊर्जा स्रोतांची काही उदाहरणे आहेत.

**पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जास्रोतांवरील चर्चा (वादविवाद)** : वर पाहिलेल्या पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जास्रोतांच्या तुलनेवरून आपल्याला अपारंपारिक ऊर्जास्रोतांची का आवश्यकता आहे हे स्पष्ट होते. ऊर्जा हा आर्थिक संरचनेमधील महत्त्वाच्या घटकांपैकी एक घटक आहे. म्हणूनच कोणत्याच राष्ट्रांची या विकासाच्या स्पर्धेमध्ये मागे राहण्याची तयारी नाही. उदाहरणार्थ जेव्हा डोनाल्ड ट्रम्प हे राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीला उभे राहिले होते तेव्हा तर त्यांनी आपण निवडून आलो तर पॅरिस

करारामधून बाहेर पडू असे मत मांडले होते. यावरून जागतिक तापमान वाढ आणि त्याच्या परिणामांबद्दल काय संवेदनशीलता आहे हे दिसून येते आणि राष्ट्रपती झाल्यानंतर या करारामुळे अमेरिकेच्या अर्थकारण क्षीण होण्याचा धोका असल्याचे कारण पुढे करून या करारामधून माघार घेतली. ट्रम्प प्रशासनामधील पर्यावरण संरक्षण संघटनेमधील प्रशासक स्कॉट प्य्रूट यांनी तर मानवामुळे निर्माण झालेला कार्बन हा हवामान बदलामधील प्रमुख घटक नसल्याची आश्चर्यकारक मांडणी केली.

अशा प्रकारची मांडणी ही अपारंपारिक ऊर्जास्रोतांच्या भविष्यासाठी फार काही प्रोत्साहनीय नाही. असे असले तरी अशा ऊर्जास्रोतांचा वापर करण्याबद्दल अनेक महत्त्वाचे प्रयत्न होत आले आहेत. १९९७ च्या क्योटो प्रोटोकॉलने विकसित राष्ट्रांमधील उत्सर्जनावर निर्बंध घातले आहेत. या करारामध्ये सत्तर देशांचा समावेश असून त्यांचा उद्देश हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात कपात करणे हा आहेत आणि अधिक सुरक्षित ऊर्जा स्रोतांच्या वापराकडे जाण्याचे हे एक पाऊल म्हणता येईल. या अनुषंगाने पॅरिस करार हा देखील एक महत्त्वाचा करार आहे ज्यामध्ये राष्ट्रांवर उत्सर्जनासंबंधी बंधने लादली आहेत तसेच अधिक चांगल्या ऊर्जा स्रोतांचा वापर करण्याविषयी आग्रही भूमिका घेतली आहे. या करारामध्ये पर्यावरण बदलांशी संबंधित समस्या सोडविण्यासाठी सामुहिक आणि सहकार्यात्मक प्रयत्न करण्यासाठी एक कृती योजना आखली आहे.

अपारंपारिक किंवा अक्षय ऊर्जेच्या स्रोतांचा वापर करण्याचा मार्ग फार दुष्कर आहे. अमेरिकेमधील टेक्सास या राज्यामधील जॉर्ज टाऊन हे शहर १००% सौर ऊर्जेवरील वीज वापरणारे शहर बनले. परंतु आज या शहराला गंभीर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. कारण हे महत्त्वाकांक्षी पाऊल उचलताना त्यांना अपेक्षित खर्चापेक्षा कितीतरी अधिक रक्कम खर्च करावी लागली. त्यामुळे हे समजून घेतले पाहिजे की असे निर्णय घेताना मोठे नियोजन आणि सहकार्यात्मक प्रयत्नांची आवश्यकता आहे. परंतु अनेक चांगले बदल घडत आहेत. पूर्णपणे renewable ऊर्जास्रोतांवर आधारित (अवलंबून) असणाऱ्या शहरांची संख्या २०१५ पासून दुप्पट झालेली दिसून येते.

संपूर्ण अमेरिकेमधून जवळजवळ ७४०० महापौर ट्रम्प यांच्या पॅरिस करारामधून बाहेर पडण्याच्या निर्णय व कृतीविरुद्ध निदर्शने करण्यासाठी एक संघटन बनविण्यासाठी एकत्र आले. यामुळे अधिकाधिक शहरांना अपारंपारिक ऊर्जास्रोतांवर अवलंबून राहण्यासाठी नवनवीन पर्याय शोधण्यास प्रोत्साहन मिळाले. ऑकलॅन्ड, नैरोबी, ऑसलो यांसारखी अधिकाधिक शहरे आज जीवाश्म इंधनाचा वापर टाळत आहेत. इंग्लंडमध्ये जवळ जवळ ८४ देशांनी शासनाचे २०५० पर्यंत शंभर टक्के स्वच्छ ऊर्जा वापरण्याचे लक्ष साधण्यासाठी कटिबद्धता दाखविली आहे. लॅटिन अमेरिकेमध्ये २०१८ या वर्षी तीनशी दशलक्ष डॉलरहून अधिक किमतीचे अक्षय ऊर्जा प्रकल्प सुरू केले गेले आहेत.

थोडक्यात गोष्टी बदलत आहेत. परंतु अजून फार मोठे मार्गक्रमण करणे बाकी आहे. अधिकाधिक देशांनी मुख्यतः विकसनशील देशांनी यामध्ये सामील होणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्यामध्ये केवळ गंभीर हवामान बदलांच्या परिणामांना कमी करण्याची नाही तर अधिकाधिक निसर्गप्रेमी जगण्याविषयीची जाणीव निर्माण होइल.

## २.७ समारोप

मानवाच्या विकास प्रक्रियेमध्ये मानवाच्या अनेक कृतींमुळे निसर्गाची अतोनात हानी होत आहे. परंतु मानवी जीवन व इतर सजीव व्यवस्था या परस्परावलंबी आहेत. तसेच त्यांच्या सहअस्तित्वासाठी त्यांचा समतोल आवश्यक आहे. मानवी आक्रमणापासून पर्यावरणाचे रक्षण करण्याची गरज पर्यावरण-वादामध्ये प्रतिपादित केली गेली आहे व त्यासाठी पर्यावरणाचे संवधर्रन व पुनर्संचयन करण्याच्या अनेक पद्धतींचा पुरस्कार पर्यावरणवादामध्ये केला आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमीसहीत १९६०च्या दशकात एक चळवळ म्हणून आधुनिक पर्यावरणवादाचा उदय झाला. परंतु मानवकेंद्री दृष्टिकोनामुळे पर्यावरणीय समस्यांचे निरसन शोधण्यामधील पर्यावरणवादाच्या अपयशामधून पुढे परिसृष्टीवाद ही संकल्पना पुढे आली. मानवकेंद्री दृष्टिकोनाऐवजी परिसृष्टीवादाने समग्र व पर्यावरणकेंद्री दृष्टीकोनातून संपूर्ण जगाकडे पाहण्याची दृष्टि दिली. मानव आणि निसर्गामधील दरी नाहिशी करणे आणि मानवामध्ये निसर्गाप्रती असलेल्या जबाबदारी विषयी नैतिक जागरूकता निर्माण करणे हे परिसृष्टीवादाचे ध्येय आहे. परंतु परिसृष्टीवादामध्ये देखील दोन प्रवाह दिसतात उथळ परिसृष्टीवाद हा पर्यावरणवादाच्या जवळ जाणारा प्रवाह आहे कारण यामध्ये प्रगती किंवा औद्योगिकरणाला पूर्णतः विरोध केलेला नाही. दुसरा प्रवाह म्हणजे सखोल परिसृष्टीवाद. ही संकल्पना नॉर्वेच्या तत्त्वज्ञ आणि विचारवंत अर्ने नॅस याने सर्वप्रथम वापरली. सखोल परिसृष्टीवाद सृष्टीविषयीच्या आपल्या विचारांमध्ये आमूलाग्र व मूलगामी बदल करण्यावर भर देतो. या विचारसरणीमध्ये निसर्ग आणि निसर्गातील प्रत्येक गोष्टीचे मूल्य याला महत्त्व दिले आहे. येथे सशक्त शाश्वततेचा पुरस्कार केला असून विकासासाठी विकास याला विरोध केला आहे. आर्थिक फायद्यासाठी निसर्गाशी छेडछाड करण्यापेक्षा निसर्गाला आहे तसेच स्वीकारणे गरजेचे आहे. हा मूलगामी विचार येथे मांडला आहे. पर्यावरणवाद, परिसृष्टीवादासारख्या विचारधारा समजून घेताना आज पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जा स्रोतांवरील परिसंवादाचे आकलन असणेही गरजेचे आहे. आजच्या विकासाच्या व स्पर्धेच्या जगामध्ये प्रत्येक देश आपले आंतरराष्ट्रीय स्थान टिकविण्यासाठी झटत आहे आाणि या नादात प्रदुषण, जागतिक तापमान वाढ, नैसर्गिक असंतुलन व आपत्ती या संकटनांना निमंत्रण देत आहोत. परंतु हा निसर्गाचा समतोल राखायचा असेल तर अपारंपारिक किंवा अक्षय ऊर्जा स्रोतांचा वापर अधिकाधिक करणे हे आवश्यक आहे असे केले तरच अधिकाधिक निसर्गप्रेमी जगण्याविषयीची जाणीव निर्माण होईल.

## २.८ स्वयं अध्ययन प्रश्न

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. किंग एडवर्ड याने प्रदुषणास कारणीभूत होत असल्याचा कारणासाठी ............ च्या ज्वलनावर बंदी घातली.

(अ) झाडे (ब) समुद्र कोळसा (क) प्राणी अवशेष (ड) तेल

२. ............ याने आपले संपूर्ण आयुष्य योसमाईट प्रदेश वाचवण्यासाठी आपले आयुष्य खर्च केले.

(अ) थोरो (ब) जॉन रस्कीन

(क) जॉन मूर (ड) जी. बी. शॉ

३. जोहान्सबर्ग परिषदेला ............ असेही संबोधले जाते.

(अ) रिओ+१० (ब) रिओ+११

(क) रिओ+१२ (ड) रिओ+१३

४. नॅस याच्या मते ............ हे अहिंसा, प्रेम, कौतुक, नम्रता आणि आदर या सर्वांचे प्रतिनिधीत्व करते.

(अ) Ecosophy (ब) Eco Philosophy

(क) Ecologism (ड) Ecosophy T

५. ॲन्ड्र्यू हेवूड यांच्या मते उथळ परिसृष्टीवाद हा ............ आहे.

(अ) प्रबोधित मानववंशकेंद्रीवाद (ब) प्रबोधित पर्यावरणवाद

(क) सुरक्षित मानववंशकेंद्रिवाद (ड) सखोल पर्यावरणवाद

६. अन्न व शेती संघटनेप्रमाणे (FAQ) प्रतिवर्षी ............ एकर जंगले कमी होत आहेत.

(अ) १५ दशलक्ष (ब) २२ दशलक्ष

(क) १८ दशलक्ष (ड) १६ दशलक्ष

७. ............ ने शंभर टक्के स्वच्छ ऊर्जेचे लक्ष्य ठेवले आहे.

(अ) अमेरिका (ब) फ्रान्स (क) कॅनडा (ड) इंग्लंड

**उत्तरे :** १. ब २. क ३. अ ४. ड

५. अ ६. क ७. ड

**प्र.२ टीपा लिहा.**

१. अर्ने नॅस आणि सखोल परिसृष्टीवाद

२. पर्यावरणवादाचे स्वरूप

३. अपारंपारिक ऊर्जास्रोत

४. पर्यावरणवादाप्रती अमेरिकेचे प्रयत्न

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. पर्यावरणवाद व परिसृष्टीवाद यांमधील फरक स्पष्ट करा.

२. अर्ने नॅस यांनी मांडलेली परिसृष्टीवादाची आठ वैशिष्ट्ये सांगा.

३. पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जा स्रोतांचे स्वरूप स्पष्ट करा.

४. पर्यावरणवादाबाबत झालेली जागतिक प्रयत्न स्पष्ट करा.

५. थोरो या विचारवंताला एक पहिला पर्यावरणवादी म्हणता येईल का?

६. पर्यावरणवादाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा.**

१. केवळ पर्यावरणवाद हे अपयश असेल हे विधान स्पष्ट करा.

२. सखोल परिसृष्टीवादाच्या तत्त्वज्ञानाचे टिकात्मक परिक्षण करा.

३. पर्यावरणवाद आणि परिसृष्टीवाद यांची तपशीलात तुलना करा.

४. अपारंपारिक ऊर्जास्रोतांचा पर्याय निवडणे शक्य आहे का ? उदाहरणासहीत स्पष्ट करा.

## २.९ अधिक वाचनासाठी संदर्भ

1. Pepper David, *Modern Environmentalism,* Routledge, 2002.
2. Pepper David, Perkins John, et. al., *The Roots of Modern Environmentalism,* Croom Helm, 1984.
3. Barry John, *Green Political Theory,* in Political Ideologies ed. by Geoghegan V. & Wilford R., Routledge London, 2014.
4. Dobson Andrew, *Green Political Thought,* Routledge London New York, 1995.
5. Naess Arne, *The Selected Works of Arne Naess,* Springer, 2005.
6. Wissenburg M., *Ecologism,* in *Encyclopaedia of Life Support Systems (UNESCO).*

❖❖❖

## घटक – ३

# विकासाचे प्रश्न

**अनुक्रमणिका**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

  ३.३.१ राजकीय आधुनिकीकरण

  ३.३.२ राजकीय बदल

  ३.३.३ विकास आणि विकसनशीलता (अर्थविकास)

  ३.३.३ विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्ती, एक चर्चा व हरितक्रांतीचा आढावा

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

३.६ स्वंय-अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## ३.१ उद्दिष्टे :

### अ) राजकीय आधुनिकीकरण

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- आधुनिकता या शब्दाचा व्यापक अर्थ व स्वरूप याचे आकलन होईल.
- राजकीय आधुनिकीकरणाची आधारभूत मूल्ये व वैशिष्ट्ये समजतील.
- राजकीय आधुनिकीकरणाबाबत विविध विचारवंतांचे विचार समजतील.
- राजकीय आधुनिकीकरणाबरोबर राजकीय बदल, क्रांती व विकास या संकल्पनांचे आकलन होईल.

## ३.२ प्रास्ताविक :

व्यक्ती, समाज व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व मानवी चळवळी या विकासवादी, अनुभवाधिष्ठीत, गतिमान व परिवर्तनशील असतात, म्हणूनच प्राथमिक अवस्थेकडून समाज गुलामगिरीकडे, गुलामगिरीकडून सरंजामशाही आणि राजेशाहीकडे व पारंपरिक मध्ययुगीन तमोयुगाकडून समाज आधुनिकीकरणाकडे परावर्तीत झाला. यासाठी मध्ययुगीन कालखंडात मध्य युरोपात झालेले प्रबोधन महत्वाचे ठरले. औद्योगिक क्रांतीमुळे समाजाच्या स्थिर पारंपारिक रचनेला निर्णायक धक्के बसले. या क्रांतीमुळे उत्पादनाचा वेग वाढला. बाजारपेठांना व आर्थिक व्यवहारांना महत्व आले. तंत्रज्ञानाचा विकास झाला पण त्याचवेळी पारंपारिक व्यवसाय मागे पडून भांडवलदार व कामगारांचे दोन नवे वर्ग तयार झाले. या नव्या दोन वर्गांचा नव्याने अभ्यास होऊ लागला. त्यामुळे परंपरावादी राजेशाही, धर्मगुरू व धर्मपीठे, सरदार यांचे महत्व कमी होऊन समाजाची सूत्रे भांडवलदाराकडे तसेच समाजाकडे क्रमाक्रमाने गेली. १७ व्या व १८ व्या शतकात औद्योगिक बरोबरच वैचारिक प्रबोधनाने समाजासमोर नवे पर्याय, नविन मूल्ये व नविन व्यवस्था मांडल्या. यात लोकशाही, समाजवाद, उदारमतवाद, स्वातंत्र्य, समता, न्याय, व्यक्तीवाद, समन्वयवाद आणि कल्याणकारी राज्य यासारखे काही पर्याय तयार झाले. पारंपारिक, संकुचित व स्थिर मूल्यांना विरोध करीत आधुनिक विकासवादी समाजमूल्यांना प्राधान्य मिळाले. हा लोकशाही, सुधारणावादी, स्वातंत्र्यवादी व सहिष्णू विचार पुढे नेण्यात जे. एस. मील, टी, एच. ग्रीन, लास्की, बेन्थॅम या व्यक्तीस्वातंत्र्यवादी विचारवंतांबरोर कार्ल मार्क्स, मॅक्सबेबर, बेंटले लासवेल, मेरियम, टॉलकॉट पार्सन्स, रॉबर्ट डाल, अल्मंड, ईस्टन, ऑगस्त कॉम्त, ल्युसियन पाय कार्ल पॉपर या सारखे अनेक विचारवंत पुढे आले. समाजातील प्रश्नांचे विश्लेषण व चिकित्सा करून समाजाला अधिक आधुनिक व पुरोगामी बनविण्याचा या सर्वांचे योगदान मोठे होते.

## ३.३ विषय विवेचन :

पारंपरिक, कालबाह्य जीवन तत्वांचा त्याग करून त्याऐवजी नवतंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणप्रसार, राष्ट्रीय उत्पन्नाबरोबर दरडोई उत्पन्नात वाढ, भौगोलिक सामाजिक गतिशीलता, सहज सुसंवाद व प्रसार माध्यमाची आधुनिकता या बरोबर विकासवादी धोरणांसाठी रचनात्मक व्यवस्थेऐवजी अधिक लोकानुवर्ती कार्यपद्धतीवर आधुनिकीकरण भर देते. डेव्हिड अॅप्टरने १९६५ मध्ये लिहिलेल्या 'पॉलिटिक्स ऑफ मॉडर्नायझेशन' या ग्रंथात निव्वळ रचनात्मक पारंपारिक शासनपद्धती व त्यातील मूल्यांवर टीका केली आहे. यात पुढे मायरॉन विनर, अल्मंड इत्यादींना भर घालून शासनव्यवस्था अधिक समाजशील गतिमान आधुनिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी लवचिक पण कार्यक्षम करता येतील यावर विचार मांडले. यातूनच भारतात पंडित नेहरूंनी आधुनिकतावादाचा तर इंडोनेशियात सुकार्तोने सामाजिक न्यायावर आधारित नवविचार, व्यवस्था व आधुनिकतेचा स्वीकार केला. याच काळात इ. आफ्रिका, लॅटिन अमेरिका व मुस्लीम राष्ट्रांमध्येही आधुनिकरणाचे विचार गेले पण त्यांनी आधुनिककीकरणाच्या बाह्य स्वरूपाचा स्वीकार करून पारंपरिक मूल्ये व रचनात्मक शासनपद्धती तशाच ठेवल्या त्यामुळे वास्तविक आधुनिकता या

राष्ट्रात फारशी आली नाही. या दृष्टिने आधुनिकतावाद, सामाजिक बदल व विकास म्हणजे काय, याचा सखोल आढावा या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

### ३.३.१ राजकीय आधुनिकीकरण (Political Modernization)

'आधुनिकता' हा शब्द अधिक व्यापक व अनेक अर्थाने वापरला जातो. आधुनिकता म्हणजे नविन, समकालीन अथवा अर्वाचीन होय. आधुनिकता ही बाह्यरुप व रचनात्मकदृष्ट्या जशी मोजतात तशीच ती नवविचार व मूल्यांच्या शास्त्रीयतेच्या सत्यतेच्या तथा उपयोगीतेच्या संदर्भातही मोजतात. या सर्व परिवर्तनाचा अभ्यास जेंव्हा विभिन्न दृष्टिकोनातून केला जातो तेंव्हा त्याला आधुनिकतावाद असे म्हणतात. या प्रक्रियेत शिक्षण, तंत्रज्ञान व नवविचारांबरोबर विकासावर भर दिला जातो. आधुनिकीकरण ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया असून ती शेकडो वर्षे अव्याहत चालू आहे. समाज हा प्रयोगशील असल्याने तो सातत्याने जुन्या व्यवस्था सोडून नव्या व्यवस्था आणि जुने विचार सोडून नवे विचार स्वीकारत असतो. याचाच अर्थ आधुनिकीकरणाचा शिक्षणाबरोबर विज्ञानाशी घनिष्ठ संबंध असतो. सातत्याने समाज प्रागतिक होत असला तरी काही ऐतिहासिक टप्प्यामध्ये आधुनिकीकरणात लक्षात घेण्याएवढे मोठे बदल होत असतात म्हणून आधुनिकीकरणाचा सार्वत्रिक बदलाबरोबर राजकीय व सामाजिक क्रांतीशी जवळचा संबंध असतो. यात औद्योगिक क्रांती, १६८८ ची रक्तहिन क्रांती, १७७६ ची अमेरिकन क्रांती, १७८९ ची फ्रेंच क्रांती आणि १९१७ ची रशियन क्रांती मधून त्या त्या राष्ट्रात राजकीय व्यवस्था तर बदललीच पण त्या बरोबर स्वातंत्र्य, समता, न्याय, लोकशाही, समाजवाद आणि साम्यवाद यांन समग्र विकासाच्या संदर्भात अधिक महत्व प्राप्त झाले. या नव्या विचारांनी हुकूमशाही व पारंपारिक शासन व्यवस्थांना विरोध करून स्वातंत्र्य व समतेवर आधारीत सर्वसामान्यांच्या शासनाला प्रतिष्ठा मिळवून दिली. अर्थातच या क्रांत्यामुळे आधुनिकीकरणाचा संबंध हा उदारमतवादी व कल्याणकारी अशा चळवळींशी जोडता येतो. म्हणूनच आधुनिकीकरण ही एकांगी प्रक्रिया नसून ती समग्र विकास, आधुनिक विचार व व्यवस्थेशी संबंधीत गतिमान प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया शास्त्रीयता, बुद्धिप्रामाण्यता, अनुभवजन्यता, वास्तवता आणि सत्यतेला प्राधान्य देते.

### ३.३.२ आधुनिकतावादाचा अर्थ

आधुनिकतावाद ही अतिशय व्यापक व विकसनशील प्रक्रिया असून ती एका बाजुला जुन्या परंपरा, कर्मठ संकुचित विचार व स्थितीशिलता यांना विरोध करून नव्या स्वातंत्र्यवादी, लोकसत्ताक, स्वातंत्र्यवादी व विकासवादी विचारांना प्राधान्य देते आणि त्यासाठी जुन्या संस्थात्मक संरचना नष्ट करून विकासासाठी तथा नव्या विचारांच्या राबवणूकीसाठी नव्या संरचनेचा म्हणजेच शासनरचनेच्या प्रारुपाचा स्वीकार करते.

आधुनिकीकरण ही बुद्धिप्रामाण्यवादी विवेकी, संवेदनशील, सर्जनशील कृतीशील तथा विकासवादी व्यापक चळवळ आहे. ती गतिमान असून राजकीय व सामाजिक क्रांत्यातून व्यक्त होते. वेगवेगळे विचारवंत

आधुनिकतेचा अर्थ शोधताना या बहुआयामी संकल्पनेला न्याय देण्याचा प्रयत्न करतात. ल्युसियन पाय यांनी आधुनिकतेचा संबंध राजकीय विकासाशी जोडला. १९६५ मध्ये लिहिलेल्या 'राजकीय संस्कृती आणि राजकीय विकास' या ग्रंथात राजकीय संस्कृती व राजकीय विकासातील अनुबंध शोधण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. यासाठी तो एकूण तीन घटकांना महत्व देतो. एक लोकांचा सहभाग, दोन शासनाची सकारात्मक भूमिका, तीन राजनीतीचे व्यवस्थापन होय. राजकीय विकास किंवा आधुनिकीकरण हे या तीन घटकांच्या माध्यमातून होते. यासाठी व्यवस्थेमधील समता, क्षमता व सांस्कृतिक वैविध्याचा शोध घेऊन त्याचा परस्पर संबंध जोडता आला पाहिजे, असे पाय म्हणतो. कोलमन आधुनिकता व विकासाला 'विकासाचा समुच्चय' असे नाव देतो. केनेय ऑरैगन्कीने आधुनिकीकरणाला चार महत्वाचे आधार आवश्यक असल्याचे सांगितले यात राजकीय एकीकरण, आर्थिक विकासाला प्राधान्य देणारे औद्योगिकीकरण, राष्ट्रीय कल्याणकारी व्यवस्था आणि मुबलक वस्तु तथा सेवांची सोय व सुविधा यांना तो महत्व देतो. डेव्हिड अॅप्टरने १९६५ मध्ये लिहिलेल्या 'पॉलिटिक्स ऑफ मॉडर्नायझेशन' या ग्रंथात सरकारची मजबूत क्षमता आणि मूल्यव्यवस्थेच्या परस्पर संबंधाना आधुनिकीकरणात महत्व दिले. जॉर्ज रिटजरने आधुनिकीकरणाला 'बहुआयामी व्यवस्था' असे म्हटले. तर गिडन या समाजशास्त्रज्ञाने आधुनिकीकरणाला 'अनियंत्रीत विकास व्यवस्था' असे संबोधले. १९ व्या शतकात कार्ल मार्क्सने आर्थिक समानतेचा आग्रह धरताना शोषणमुक्त समाजाला पुरोगामी समाज असे नाव दिले. मॅक्स वेबरने उदारमतवादाच्या विवेकवादातून आधुनिकीकरणाची संकल्पना विशद केली. तर टॉलकॉट पार्सनने आधुनिकतेचा संबंध विविधतेशी जोडला. थोडक्यात आधुनिकता ही विविध पैलू मांडत विकास पावत जाणारी बुद्धिप्रामाण्यवादी व वस्तुनिष्ठ समाजशील प्रक्रिया असते. सॅम्युअल पी. हंटिंग्टन याने १९६८ मध्ये लिहिलेल्या त्याच्या 'पोलिटिकल ऑर्डर इन चेजिंग सोसायटीज' या ग्रंथात, लोकांच्या मनात राजकीय सहभागाच्या तीव्र ईच्छांना पूर्ण स्वरूप देण्याचा परस्पर प्रक्रियेला आधुनिकीकरण म्हटले आहे. त्याच्या मते लोकांना अभिव्यक्त होऊ देणे हे आधुनिकीकरणाचे दार्शनिक रुप असते.

### ३.३.४ आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये -

पिटर हॅमिल्टनने आधुनिकतावादाची पुढील प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

**१) विवेकवाद / बुद्धिप्रामाण्यता** - आधुनिकीकरण नेहमीच पारंपारिक, सनातन, कर्मठ प्रथा, परंपरांना विरोध करीत नव्या तार्किक, शास्त्रीय बुद्धिवादी जीवनमूल्यांना स्वीकार करते. कोणत्याही विचार व कृतीप्रवणेमधील कार्यकारणभाव तपासल्याशिवाय व त्याची सत्याच्या पार्श्वभूमीवर तपासणी केल्याशिवाय तिचा स्वीकार करू नये यावर आधुनिकीरण ठाम आहे. मॅक्स वेबरबरोबर बुद्धिप्रामाण्यवादी चळवळींना महत्व दिले.

**२) अनुभवजन्यता** - अनुभवजन्यता ही व्यवहारवादी प्रक्रिया असते. त्यात पोकळ व काल्पनिक विचारांना स्थान नसते. अनुभवजन्यता सैधांतिक रचनेपेक्षा प्रत्यक्ष पहाणी, अनुभव व त्यातील निरिक्षणांवर

आधारीत सत्यला अधिक प्राधान्य देते. अनुभववादी दृष्टिकोन अधिक वास्तववादी, शास्त्रीय, तार्किक व सुसंगत असतो. या प्रत्यक्षार्थवादाच्या आधारे समाजशास्त्रात अनिश्चित असणाऱ्या मानवी सत्याच्या अधिक जवळ जाता येते.

**३) शास्त्रीय सत्यता**– आधुनिकीकरणाचे दुसरे नाव म्हणजे शास्त्रीयता. विशेषतः २० व्या शतकात मानवी परस्पर संबंधाचा शोध घेण्याचे महत्वाचे काम राज्यशास्त्र करीत आहे. राजकीय वर्तन हे बहुधा अस्थिर, अनाकलनीय असते मात्र शास्त्रीय निकष आंतरशास्त्रीय संख्याशास्त्रीय सारखी वस्तुनिष्ठ गणितशास्त्रे यांच्या आधारे मानवी संबंधाची उकल काही प्रमाणात करता येते. या प्रक्रियेत समाजशास्त्राबरोबर मानसशास्त्र, भूराजनीती, अर्थशास्त्र, सख्यांशास्त्र, तर्कशास्त्र यांचा आधार घेतला जातो. आधुनिकीकरणाचा संबंध नेहमीच तंत्रज्ञानाची व नवविचारांशी जोडला जातो. त्यामुळे शास्त्रीय सत्यता तपासून सामाजिक सिद्धांत दुरुस्त करणे ही राजकीय आधुनिकीकरणाची जबाबदारी आहे.

**४) सार्वत्रिकता** – विज्ञानातील सत्य हे सार्वत्रिक असते. आधुनिकीकरण हे शास्त्रीय असल्याने त्यातील सत्य हे सार्वत्रिक आहे. आधुनिकीकरणात शास्त्रीय निकषांच्या आधारे काढलेले निष्कर्ष हे जगातील सर्व मानवी समूहांना लागू होतात. ही विज्ञानाची सार्वत्रिकता आधुनिकीकरणात असते. उदा. कार्ल मार्क्सने सांगितलेला वर्गसंघर्ष, सत्तेचे राजकारण इत्यादी.

**५) गतिशीलता** – राजकीय, सामाजिक आधुनिकीकरणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आधुनिकीकरण गतिमान असते. समाजात तयार होणारी नवनविन आव्हाने पेलण्यासाठी आधुनिकीकरण प्रक्रिया सक्षम असावी लागते. अशी सक्षमता तयार करण्यासाठी सातत्याने आधुनिकीकरणात नवनवे अत्याधुनिक, शास्त्रीय प्रयोग करावे लागतात. या प्रयोगशिलतेमधून आधुनिकीकरण एका बाजुला जुने सिद्धांत बाजुला टाकत नाविण्याचा व निरपेक्ष सत्याचा स्वीकार करीत असते. ही प्रयोगशिलता सतत सावधपणे, उत्साहात, तांत्रिक शास्त्राच्या आधारे केली जात असल्याने ही आधुनिकीकरणाची प्रक्रिया एकदा करून थांबता येत नाही. समाजाच्या वेगाने बदलणाऱ्या प्रश्नांबरोबर तिलाही गतिमान व समाजशील व्हावे लागते म्हणूनच प्रयोगशीलता, उपक्रमशीलता व शास्त्रीयता याबरोबर ती गतिमान प्रक्रिया आहे.

**६) व्यक्तिस्वातंत्र्यवादी**– आधुनिकता ही नेहमी मानवी सुखाचा विचार करते. किंबहुना आधुनिकीकरणाच्या एकंदर शास्त्रीय उलाढालीच्या मध्यवर्ती माणूस असतो. आधुनिकीकरण मनुष्यकेंद्री प्रयोगशील व कल्याणकारी प्रक्रिया आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात विशेषतः मध्य युरोपात मिल, बेन्थॅम, ग्रीन व लास्की यांनी व्यापक व्यक्तीस्वातंत्र्याचा व उदारमतवादाबरोबर लोकशाही समाजवादाचा विचार मांडला. राज्याने कमीतकमी राज्य करावे तसेच राज्याने व्यक्तीच्या मार्गातील अडथळे दूर करून व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य द्यावे यावर या विचारवंतांनी भर दिला. पारंपारिक राष्ट्रवादी विचारसरणीला छेद देऊन स्वातंत्र्य, समता,

न्याय व विकास यावर भर देणारे लोकसत्ताक व्यक्तीवादी विचार पुढे आले. आधुनिकीकरणाने व्यक्तीस्वातंत्र्य, उदारमतवाद, सहिष्णुता, सर्वांगीण प्रगती व लोकशाही मूल्यांचे महत्व सांगताना राज्य व शासनव्यवस्थेच्या मर्यादा स्पष्ट केल्या. लोक आता प्रबोधन, शिक्षण व तंत्रज्ञानामुळे जागृत तथा जबाबदार व कार्यक्षम असल्याने त्यांच्यावर विश्वास टाकून त्यांना त्यांच्या विकासासाठी जास्तीत जास्त संधी राज्याने उपलब्ध करून द्यावी असे व्यक्तीस्वातंत्र्यवादी विचारवंतांचे मत होते. त्यामुळे मध्ययुरोपात १९ व्या शतकात स्वातंत्र्यवादी विचारातून राजकीय आधुनिकीकरणाचा वेग वाढला.

७) **सहिष्णूता** – साहिष्णूता हे आधुनिकीकरणाचे जीवनमूल्य आहे. इतरांचे विचार समजावून घेऊन आधुनिक स्वातंत्र्यवादी व विकासवादी नविन विचारांना स्वीकार करून पारंपारिक, आग्रही, सनातन व विषमतावादी विचारांना स्वागत करण्याला सहिष्णूता म्हटले जाते. पात्र, कार्यक्षम व पुरोगामी विचारांचे स्वागत करताना स्वतःमधील जुने मागास विचार काढून टाकण्याच्या प्रवृत्तीला साहिष्णूता म्हणतात. साहिष्णूता ही उदारमतवादी, सहनशील व लोकशाही प्रक्रिया असून ती आधुनिकतेला व नव्या परिवर्तनाला खुल्या मनाने पाठिंबा देते. सर्व प्रकारच्या विकासवादी प्रबोधनाला पाठिंबा देण्याला असे लोक तयार असतात. साहिष्णूता लवचिक प्रक्रिया असून आधुनिकीकरणातील प्रयोगशीलतेचे ती समर्थन करते. आपल्या जातीधर्माचे, राजकीय व्यवस्थेचे व स्वतःचे तटस्थ मूल्यमापन करून शास्त्रीय नवतेचा व आधुनिकीकरणाचा साहिष्णुता स्वीकार करते. आपल्या मर्यादा व अपुरेपणा मान्य करताना ते गुणवत्तेला संधी व पाठिंबा देतात. म्हणूनच आधुनिकतेमध्ये साहिष्णूता असते.

८) **स्वातंत्र्य**– आधुनिकता म्हणजे स्वातंत्र्य मग ते विचारांचे स्वातंत्र्य असते तसेच कृती वा नवनिर्मितीचे स्वातंत्र्य असते. व्यापक स्वातंत्र्याशिवाय आधुनिकीकरणाला आवश्यक असणारे प्रयोग करता येत नाहीत. स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास जसे आधुनिकीकरण आवश्यक असते तसे आधुनिकीकरणाच्या निकोप वाढीसाठी त्यात स्वातंत्र्य आवश्यक असते. स्वातंत्र्य व आधुनिकता एकाच गतिमान प्रक्रियेचे परस्परपूरक घटक आहेत.

९) **भांडवलशाही**– आधुनिकता म्हटले की सार्वत्रीक विकास आला व विकास म्हटला की औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण, वेगवान तंत्रज्ञान, अतिरिक्त उत्पादन, बाजारपेठा, शहरीकरण, खाजगीकरण, स्पर्धा व मुक्त अर्थव्यवस्था यांचाही स्वीकार करावा लागतो. आधुनिकता ही उदारमतवादी व खुली विकासपद्धती असून तिची तशी सुरुवात इंग्लंडमध्ये अॅडम स्मिथच्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या (Laissez Faire) माध्यमातून आली. भांडवली व्यवस्थेशिवाय विकासाची दारे उघडत नाहीत. लोकांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता आधुनिकतेमध्ये असते व आधुनिकतेचा आधार भांडवलशाही विकासवादात असतो. मात्र आधुनिकतेला अधिक प्रगल्भ करताना भांडवलशाहीने समाजाचा वेगाने विकास केला असला तरी शोषणाचे व कामागारांच्या पिळवणूकीचे काही मूलभूत प्रश्न तयार केले आहेत असे परिवर्तन व क्रांतीचे समर्थन करणारे मार्क्सवादी म्हणतात. त्यामुळे भांडवली व्यवस्था खरोखरच आधुनिकतावादी आहे का ? यावर दोन्ही बाजुंनी विचारमंथन

चालू आहे. आधुनिकता हे सर्व सामाजिक प्रश्नांचे उत्तर नाही असे काहींना वाटते त्यामुळे आता उत्तर आधुनिकतावाद हा नवा पर्याय म्हणून पुढे येत आहे. यासंदर्भात बॅरिंग्टन मूर असे म्हणतो की, आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही सर्व ठिकाणी सारखी वा साचेबंद पद्धती नाही तर ती त्या त्या राष्ट्राच्या वर्गीय, सामाजिक रचना व एकंदर गरजा यांच्यावर आधारीत असते. १९६६ मध्ये लिहिलेल्या 'सोशल ओरिजिन्स ऑफ डिक्टेटरशिप अँड डेमॉक्रसी' या ग्रंथात मूर पुढे असे म्हणतो की, भांडवली क्रांतीमुळे इंग्लंड, फ्रान्स या देशात आधुनिकीकरण झाले, उच्चवर्गीय क्रांतीमुळे जर्मनी व जपानमध्ये आधुनिकीकरण झाले तर कृषी क्रांतीमुळे रशिया व चीन या महासत्ता बनल्या. मूरच्या मते, आधुनिकीरकणाच्या क्रांत्या या अभिजन वर्गाच्या प्रयत्नाने होत असल्याने या आधुनिकीकरणात सामान्य बहुजन समाजाचा फारसा सहभाग नसतो. यातून ते दुर्लक्षित राहिले तर प्रतिक्रांतीचा धोका असतो. यामुळे आधुनिकीकरणाच्या प्रक्रिया रेंगाळू शकतात.

थोडक्यात आधुनिकता ही विकासवादी प्रक्रिया असून त्यातील संभाव्य दोष काढता आले तर मानवी समतोल विकासात आधुनिकीरण नविन व्यवस्थांबरोबर नविन पुरोगामी विचारांना सातत्याने प्राधान्य देतात.

## ब) राजकीय बदल

### ३.४ उद्दिष्टे

**या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला**

१) राजकीय बदल म्हणजे काय, याची माहिती होईल.

२) राजकीय बदल व परिवर्तनाचे सिद्धांत अभ्यासता येतील.

३) राजकीय बदल, परिवर्तन, क्रांती व आधुनिकीरणातील फरकाचे मुद्दे समजतील.

### ३.५ प्रस्तावना

मानवी इतिहासाच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की, काळाच्या व समाजाच्या बदल आणि अपेक्षेनुसार मानवी समाजात परिवर्तन होत असते. हे सामजिक, राजकीय बदल व परिवर्तन मानवी इच्छेप्रमाणे घडतात की त्यांना स्वतःची नैसर्गिक अंतर्गत गती असते. याबद्दल वेगवेगळी मते दिली जातात. जे सामाजिक बदल व परिवर्तने आपोआप स्वयंप्रेरणेने होतात तेंव्हा त्यांच्यासमोर विकासाची निश्चित उद्दिष्ट्ये नसतात. अशा दिशाहिन परिवर्तनामुळे आधुनिकीकरण घडत नाही, असे काहींना वाटते. काहींच्या मते राजकीय बदल मानवी बौद्धिक प्रयत्नातून हेतूपुरस्कृत प्रक्रिया आहे. यात परिवर्तनानंतर कोणती नवी व्यवस्था असेल. तिची उद्दिष्ट्ये व पद्धती कोणत्या आणि त्यामागील वैचारिक प्रेरणा कोणत्या याचा योग्य पद्धतीने विचार केलेला असतो. त्यामुळे अशा परिवर्तनात आधुनिकीकरण व समग्र समतोल विकासाची जास्त शक्यता असते असे काहींना वाटते. राजकीय बदल, राजकीय परिवर्तन, क्रांती व आधुनिकीकरण या सर्व संकल्पना बऱ्याच अंशी सापेक्ष असून

आधुनिकीकरणाच्या संदर्भात एकाच समान अर्थाने त्या वापरल्या जातात. आधुनिकीकरणासाठी परिवर्तन आवश्यक असते आणि परिवर्तनासाठी आवश्यक राजकीय, सामाजिक, आर्थिक व सर्वच सांस्कृतिक बदल क्रांतीच्या माध्यमातून झटपट व्हावेत असे मानणारा साम्यवाद्यांसारखा एखादा प्रभावी गट विकासाच्या संदर्भात क्रांतीकारी परिवर्तनाचे विचार मांडतो तर उदारमतवादी लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्यांना परिवर्तनात मानवनिर्मित अतिरेकी घाई भडक कठोर क्रांती मान्य नसते. प्रत्येक समाजाला स्वतःची एक गती असते व त्याच गतीने आधुनिकीकरणाच्या प्रक्रिया व्हाव्यात असे त्यांना वाटते. रक्तरंजित क्रांतीमधून होणारे सामाजिक राजकीय बदल एकदम आधुनिकीकरण करणारे वाटत असले तरी लोकांना या नव्या बदलांची व नव्या व्यवस्थांची सवय नसते यासाठी लोकशाहीवादी असे म्हणतात की, सामाजिक परिवर्तन लोकांवर लादून त्यांना कृत्रीम पद्धतीने तात्पुरते आधुनिक बनवू नये. यापेक्षा समाजीकरणाच्या दृढ पद्धतींचा शिक्षणाद्वारे वापर करून सामाजिक परिवर्तनांना लोकांची उत्स्फर्त मान्यता व पाठिंबा मिळविला तर टिकावू आधुनिकता व विकास तयार करता येतो.

## ३.६ विषय विवेचन

आधुनिकीकरण व विकास हा त्या समकालीन राजकीय व्यवस्थेचा त्या विशिष्ट काळमर्यादेत अंतीम टप्पा असेल तर त्या अगोदर या गृहित विकास टप्प्यापर्यंत येण्यासाठी संक्रमणकाळात राजकीय व सामाजिक व्यवस्थेमध्ये व पारंपारिक तत्वज्ञान तथा मूल्यसंस्कृती विचार व आचरण पद्धतीमध्ये आवश्यक ते बदल केले जातात किंवा क्रांतीच्या माध्यमातून ते कमी वेळेत अचानक होतात. समाज हा गतिमान व प्रयोगशील असल्याने 'विकास' व 'आधुनिकता' ही सुद्धा तशी अस्थिर व भासमान समाजव्यवस्था असते. एका बाजूला नवनिर्मिती झालेल्या अपेक्षित विकास अवस्थेचे लोक स्वागत करून त्याला पाठिंबा देतात पण अल्पावधीत त्यांना हा स्वनिर्मित विकास अपुरा वाटू लागतो. त्यामुळे आधुनिकीकरण व विकासासाठी पुन्हा नव्याने तंत्रज्ञान, शास्त्रविज्ञान व एकंदर नाविण्याचा शोध घेतला जातो. अर्थातच सामाजिक परिवर्तन, बदल, आधुनिकीकरण, विकास व क्रांती या समाजाच्या अव्याहत प्रक्रिया असून परिवर्तनाला काही जण बदल तर वेगवान परिवर्तनाला काहीजण क्रांती असे नाव देतात.

### ३.६.१ परिवर्तन व क्रांती

क्रांती ही दृश्य प्रभावी व अधिक परिणामकारक असे वेगवान परिवर्तन असते. रशियन क्रांती, फ्रेंच क्रांती, भारतीय स्वातंत्र्याची क्रांती, अमेरिकन क्रांती ही सारी वेगवान परिवर्तने म्हणजेच क्रांत्या होत्या. क्रांती हा शब्द वरील उदाहरणांमुळे अधिक राजकीय परिवर्तनाकडे झुकलेला असून परिवर्तन हे बरेच सामाजिक स्वरुपाचे असते. मात्र असे राजकीय व सामाजिक वर्गिकरण नेहमीच खरे नसते कारण औद्योगिक क्रांती, वैज्ञानिक क्रांत्या व सांस्कृतिक अनेक क्रांत्यांनी सामाजिक क्षेत्रात अल्पावधीत मोठे बदल केले असून त्यांचा सामाजिक व राजकीय निर्णयप्रक्रिया, व्यवस्थापन व मूल्यनिर्मितीवर मोठे परिणाम झाले आहेत. याचाच अर्थ परिवर्तन व क्रांती हे सापेक्ष

व परस्परपूरक शब्द असून जसे क्रांतीतून परिवर्तन व विकास होतो तसेच परिवर्तनाचा वेग अचानक वाढला व सामाजिक असंतोषाला अधिक चालना मिळाली तर क्रांती होऊ शकते. यासाठी साधारणतः चार संभाव्य टप्पे सांगितले जातात–

१. राजकीय सत्ताधीश गट जर सत्तेचा दुरुपयोग करीत असेल तर किंवा सत्ता चालविण्यास असमर्थ असेल तर क्रांतीच्या दिशेने लोकांची मानसिकता तयार होते.

२. अशा असमर्थ, भ्रष्टाचारी व सत्तेचा गैरवापर करण्याऱ्या सत्ताधीशांना सत्तेतून दूर करण्यासाठी खात्रीशीर सनदशीर, लोकशाही मार्ग उपलब्ध नसतील तर पर्याय नसल्याने क्रांतीचा मार्ग स्वीकारावा लागतो.

३. सत्ताधीश गटांविरोधात विरोधी गट जर सत्तेसाठी अधिक आग्रही व आक्रमक झाला तर क्रांतीची शक्यता जास्त असते.

४. समाजातील सर्वच स्तर क्रांतीसाठी तयार असतील आणि सामाजिक संतोष तीव्र व सार्वत्रिक असेल तर तथा त्यासाठी नेतृत्व व योग्य वातावरण लाभले तर क्रांती होऊ शकते.

क्रांती ही सार्वत्रिक व शेवटी सर्व लोकांच्या सहभागातून होत असते. मात्र लष्करी क्रांत्या ह्या त्या अर्थाने विशिष्ट गटाच्या म्हणून आंशिक असतात. त्यांना बऱ्याच वेळा लोकांचा पाठिंबा नसतो पण लष्करप्रमुख शक्तीच्या आधारावर तो मिळवण्याचा प्रयत्न करतात. यामुळे अशा क्रांत्या अल्पजीवी ठरतात. वरवर पहाता क्रांत्या एकदम होत असत्या तरी क्रांत्यासुद्धा टप्प्या टप्प्यातूनच होत असतात. जसे सामाजिक असंतोषाचे आविष्करण, असंतोषाचे एकत्रीकरण व सार्वत्रिकरण, असंतोषाला मिळणारे पूरक तत्वज्ञान व प्रभावी आकर्षक नेतृत्व आणि त्याचवेळी सत्तारुढ नेता व गटाचे वेगाने होणारे अवमूल्यन व ऱ्हास, दुर्बलता क्रांतीला जन्म देते.

### ३.६.१ क्रांतीबाबत काही विचार : ॲरिस्टॉटलचे विचार

इ. सन पूर्व ४ थ्या शतकामध्ये ॲरिस्टॉटलने अतिशय सखोल पद्धतीने व गांभीर्याने क्रांतीबाबतचे आपले विचार मांडले आहेत. तो राज्यशास्त्राचा जनक का आहे? याच्या अनेक कारणांपैकी त्याने केलेली क्रांतीची शास्त्रशुद्ध मांडणी, हे एक समर्थनीय कारण म्हणावे लागेल. जे शासन स्थिर स्वरुपाचे शासन देण्यास असमर्थ असते आणि ज्या देशात सातत्याने उठाव होत असतात. अशा राज्यात क्रांती होते असे तो म्हणतो. ॲरिस्टॉटलने उठाव का होतात याची चिकित्सा केली आहे. तो पुढे असे म्हणतो की, 'सार्वत्रिक विषमता' हे असंतोषाचे व उठावाचे कारण असते. लोक नेहमी निसर्गतःच न्याय व समतेची अपेक्षा करीत असतात पण अशा अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत तर लोक शासनविरोधात उठाव करतात. त्या काळातील ग्रीक नगर राज्यातील एकंदर प्रथापरंपरांचा ॲरिस्टॉटलवर प्रभाव होता म्हणून त्याने सांगितलेली न्यायाची संकल्पना संकुचित स्वरुपाची वाटते. समान लोकांसमोर समान व्यवहार व असमान लोकांबरोबर असमान व्यवहाराला तो न्याय म्हणतो. असे असले तरी

नागरिकत्वाचा विचार करता लोक जेंव्हा एकत्र येतात, तेंव्हा राष्ट्रीय संपत्तीमध्ये समान वाटा मागतात. राज्याने असा वाटा न देता विषमतेला कळत नकळत पाठिंबा दिला तर व आर्थिक विषमतेकडे दुर्लक्ष केले तर असंतुष्ट शोषित गरीब जनता श्रीमंताच्या विरोधात व श्रीमंताच्या शोषण करण्याच्या पद्धतीकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासनविरोधात क्रांती करतात, असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

मात्र समाजातील सर्व परिवर्तने नेहमीच वाईट असतात असे नाही. असे ॲरिस्टॉटलला वाटते. त्याच्या मते संविधानाची सुरक्षितता हे राज्याचे कर्तव्य असते म्हणून विध्वंसक क्रांत्यामध्ये संविधान सुरक्षित राखणारे शासन मजबूत व कार्यक्षम असते. हे संविधान टिकावे यासाठी ॲरिस्टॉटलने 'संमिश्र संविधानाचा' पर्याय समोर मांडला होता. त्याच्या मते लोकशाही व अल्पजनशाही मिळून संविधानात्मक शासनव्यवस्था तयार केली तर ती समतोल असू शकेल. तो तशा अर्थाने क्रांत्यांना विरोध करताना व परंपरेला महत्व देताना दिसतो.

### ३.६.३ एडमंड बर्कचे क्रांतीबाबतचे विचार

एडमंड बर्क हा १८ व्या शतकातला इंग्लंडमधील एक प्रमुख विचारवंत होता. त्याने फ्रेंच राज्यक्रांती व इंग्लंडच्या राज्यक्रांतीची तुलना केली. त्याच्या मते फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला आधुनिकीकरणाकडे व लोकशाहीकडे जाण्यासाठी स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्य दिली असली तरी या क्रांतीने फ्रान्समधील शासनव्यवस्थेबरोबर सामाजिक नागरी संस्था व संघटनांचे मोठे नुकसान झाले असे नुकसान समाजाचा विकास कसा करणार? त्यामुळे फ्रेंच राज्यक्रांती जगाला परिवर्तनशील विकासवादी वाटत असली तरी तिने फ्रान्समध्ये अस्थिरता तयार केली. याउलट इंग्लंडच्या राज्यक्रांतीने भ्रष्ट सत्ताधारी राजाला बदलले पण आपल्या समाजशील नागरी संस्थांना मात्र पाठिंबा दिला. क्रांतीमध्ये परिवर्तन करणाऱ्या चळवळींना असे सामाजिक तारतम्य असावे लागते. तसे नसेल तर समग्र क्रांतीच्या नावाखाली विकासाऐवजी स्वतःचे नुकसान होण्याची शक्यता जास्त असते, असे बर्क यांना वाटते. एडमंड बर्कने क्रांतीतून होणाऱ्या संभाव्य राजकीय व सामाजिक परिवर्तनाचा आणि त्यातील परिणामांचा सखोल विचार केला होता.

### ३.६.४ टॉकविलचे क्रांतीबाबतचे विचार

हा १९ व्या शतकातील फ्रेंच विचारवंत होता. त्याने १८५६ मध्ये 'द ओल्ड रेजीम अँड द फ्रेंच रेव्ह्युलेशन' हा ग्रंथ लिहिला. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे राज्याचा विस्तार झाला, असे तो म्हणतो. या क्रांतीने जुनी सरंजामशाही संपुष्टात आली त्यांचे कायदे संपले. मात्र या क्रांतीनंतर फ्रान्समध्ये सत्तेचे केंद्रीकरण झाले. पण ही अवस्था तात्पुरती होती. अभिजन वर्गाच्या या अल्पकालीन एकीकरणानंतर मात्र सत्तेचे फ्रान्समध्ये विकेंद्रीकरण झाले.

### ३.६.५ हेगेल आणि कार्ल मार्क्सचे परिवर्तन व क्रांतीबद्दलचे विचार –

हेगेल व मार्क्स हे दोन्ही परिवर्तनवादी विचारवंत होते. समाज सातत्याने पुढे जात असतो कारण मानवी इतिहास हा परिवर्तनाचा व संघर्षाचा आहे असे हे दोघेही मानतात. हेगेल व मार्क्स हे जर्मन विचारवंत होते मात्र मार्क्सने पुढे आपले आयुष्य इंग्लंडमध्ये खर्च केल्याने त्याला काहीजण ब्रिटिश विचारवंत म्हणतात. मार्क्सने एंगेल्स समवेत ऐतिहासिक भौतिकवादातून क्रांतीचे तत्वज्ञान मांडले तर हेगेलने सामाजिक परिवर्तनाला विचार कारणीभूत असतात हे सांगताना अधिभौतिक चित्वादी व आदर्शवादाचा स्वीकार केला.

हेगेल हा १८ व्या शतकातील चैतन्यवादी व परिवर्तनवादी विचारवंत होता. समाजातील परिवर्तने ही विचारांमुळे होतात असे तो मानतो. या संपूर्ण विश्वाच्या मूळाशी मानवी मूल्ये व विचार असतात व त्यातील बुद्धिप्रामाण्यवादी वैचारिक संघर्षावर परिवर्तने होतात असे तो म्हणतो. मानवी जीवन हे संघर्षमय असून हा संघर्ष द्वंद्वात्मक विकासवाद आहे असे हेगेलला वाटते. विकासाचे व परिवर्तनाचे तंत्र व शास्त्र सांगताना तो म्हणतो की, प्रत्येक व्यक्तीमध्ये सुरुवातीला एक विशिष्ट विचार येतो, तो म्हणजे 'वाद' (Thesis) होय. असा पहिला विचार हा बऱ्याचवेळा उथळ व अपुरा असतो. त्या विचाराला समाजाशी व समकालीन इतर विचारांशी तपासून घ्यावे लागते. म्हणजे प्रत्येक विचाराला इतर विचारांशी संघर्ष करावा लागतो. यातून जो दुसरा अधिक प्रभावी विचार पुढे येतो त्याला हेगेलने 'प्रतिवाद' (Anti Thesis) असे म्हटले आहे. वादातून प्रतिवादाकडे होणारे परिवर्तन अधिक प्रगत असले तरी निर्णायक विकास अवस्थेकडे जाण्यासाठी त्यातही अपुरेपणा असू शकतो असे हेगेल म्हणतो. या प्रतिवादातील विचाराला समकालीन इतर विचार व समाजाशी तपासून घ्यावे लागते. या वैचारिक संघर्षाला 'समन्वयवाद' (Syn Thesis) असे हेगेलने म्हटले होते. ही वाद, प्रतिवाद व समन्वयाची म्हणजेच परिवर्तनाची प्रक्रिया सतत चालू असते कारण पुढे समन्वयवादी विचारही वाद बनून त्याला इतर विचारांशी संघर्ष करावा लागतो. हेगेलने त्याच्या द्वंदात्मक विकासवादाच्या व समग्र सामाजिक परिवर्तनाच्या मूळाशी असणाऱ्या विचारांच्या ठिणग्यांना म्हणजे वैचारिक चैतन्याला परिवर्तनाचा आधार मानले. याला हेगेलचा आदर्शवाद असेही म्हणतात. कार्ल मार्क्सने हेगेलचा परिवर्तनाचा द्वंदात्मक विकासवाद मान्य केला होता. मात्र मानसाच्या मनात जे विचार येतात म्हणजे वाद, प्रतिवाद व समन्वय हे तसेच का येतात? अशी शंका तो व्यक्त करतो. मार्क्सच्या मते सर्व विचारांच्या मूळाशी असणारी कारणे ही भौतिक स्वरूपाची असतात. भौतिक म्हणजे वस्तु, पैसा, भांडवल इत्यादी. भौतिक वस्तु दृश्य व समजणाऱ्या असतात व त्यामध्ये बदल म्हणजे वाढ किंवा घट झाली की, समाजात परिवर्तन होते, म्हणजेच वस्तुंच्या, उत्पादनाच्या फेरबदलांचा विचारांशी संबंध असतो. असे मार्क्स म्हणतो. आपला परिवर्तनाचा भौतिकवादी सिद्धांत पुराव्यासह स्पष्ट करण्यासाठी मार्क्सने 'ऐतिहासिक भौतिकवाद' हा मानवी परिवर्तनाचा इतिहास सांगणारा दुसरा एक सिद्धांत मांडला मानवी इतिहासात अगदी प्राथमिक अवस्थेपासून समकालीन समाजात सतत दोन वर्ग होते, असे मार्क्स म्हणतो. हे दोन वर्ग केवळ उत्पादन साधने, वस्तु व भौतिक साधनांच्या आधारे तयार झाले, असे त्यास वाटते. याचे कारण देताना तो म्हणतो की,

समाजातील काही लोकांना वस्तु, उत्पादन साधने म्हणजेच संपत्ती पैसा याचा संचय करता येतो कारण ते इतरांपेक्षा सबल व बलवान असतात तर ज्यांना हे जमत नाही ते सारे दुर्बल व गरीब असतात. मार्क्स म्हणतो इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यात झालेले परिवर्तन हे केवळ सबल व दुर्बलांच्या भिन्न विचार, वस्तु व हितसंबंधामुळे झाले आहेत. इतिहासाच्या या वेगवेगळ्या टप्प्यात सबल दुर्बल हे परस्परविरुद्ध दोन वर्ग मालक व गुलाम, सरंजामदार व सामान्य सेवक, भांडवलदार व कामगार अशा वेगवेगळ्या नावांनी पुढे आले असले तरी त्यांच्यातील संघर्ष हा भौतिकवादी वर्गसंघर्ष आहे. मार्क्स असे म्हणतो की, इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यात साधनसंपत्ती असणारा वर्ग हा साधनसंपत्ती नसणाऱ्या वर्गाचे शोषण करीत असतो. या वर्गसंघर्षातून इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यात परिवर्तन होत असते व जगातील सर्व परिवर्तनाच्या मूळाशी उत्पादन साधने, वस्तु, भांडवल, म्हणजेच पैसा असतो, असे मार्क्स म्हणतो.

परिवर्तनाच्या शेवटच्या टप्प्यात भांडवलदार व श्रमिक कामगारातील संघर्ष अधिक निर्णायक व तसा शेवटचा असल्याने या संघर्षाला मार्क्स साम्यवादी क्रांती असे नाव देतो. या क्रांतीची चिकित्सा करताना मार्क्स म्हणतो, या वर्गसंघर्षात भांडवलदार कामगारांचे जास्त शोषण करतो. याला मार्क्स 'अतिरिक्त मूल्य सिद्धांत' असे नाव देतो. क्रांतीच्या कारणांचा शोध घेताना अतिरिक्त मूल्यसिद्धांत अधिक शास्त्रीय व व्यावहारिक आहे असे दिसते. मार्क्स असे म्हणतो की, भांडवलप्रधान ऐतिहासिक भौतिकवादी टप्प्यात भांडवलदाराकडील भांडवल, तंत्रज्ञान व इतर व्यवस्थापन तथा कामगाराचे श्रम यामुळे कारखान्यात वस्तुमालाची निर्मिती होते; म्हणजेच कोणत्याही उत्पादन भांडवलदाराचे भांडवल व कामगाराचे श्रम हे समान दर्जाचे असतात. परंतु उत्पादननिर्मितीसाठी लागणाऱ्या मूल्याएवढ्या किमतीला कोणतीही वस्तू बाजारपेठेत विकली जात नाही. त्यात नफ्याचा विचार असतो मात्र भांडवलदार नफ्यातला निम्मा वाटा कामगाराला देत नाही. वास्तविक पहाता वस्तुनिर्मितीमध्ये दोघांचा समान अर्धा अर्धा वाटा असेल तर मग नफ्यात का नाही? असा मार्क्सचा प्रश्न आहे. भांडवलदार उत्पादीत वस्तुंचा साठा करून तो आणखी जास्त किमतीला विकतो व जास्त नफा मिळवतो. मार्क्स असे म्हणतो की, या जादा, अतिरिक्त नफ्यामुळे भांडवलदार अधिक श्रीमंत होत जातो मात्र कामगाराला त्याच्या रोजगाराशिवाय काहीही मिळत नाही. शिवाय दिवसेंदिवस कामगारांची संख्या वाढल्याने आपसातील स्पर्धेत त्यांचा रोजगार ते स्वतःच कमी करून नाविलाजाने शोषणाला हातभार लावतात. या अतिरिक्त मूल्यसिद्धांतानुसार कामगारांचे अधिक शोषण होते. मार्क्स असे म्हणतो की, आता कामगार शहाणे झालेत. शिक्षणामुळे त्यांच्यात स्वहक्काच्या नव्या जाणिवा तयार झाल्या आहेत. त्यांच्या संघटना तयार झाल्यात व त्यांच्यात नेतृत्वही तयार होत आहे. त्यामुळे या शेवटच्या निर्णायक लढ्यात भांडवलदारांचा पराभव होईल व कामगारांचा विजय होईल. सर्वसामान्य श्रमिक सत्ताधीश बनेल असे भाकीत मार्क्सने सांगितले. या साम्यवादी नव्या परिवर्तनवादी क्रांतीनंतरच्या व्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वितरन केले जाईल. या साम्यवादी आधुनिक

व्यवस्थेत समतेचा आधुनिक विचार असेल तसेच ही व्यवस्था वर्गविरहित असल्याने कोणी कोणाचे शोषण करणार नाही त्यामुळे समाज हा अधिक मुक्त, समाधानी असेल असे मार्क्स म्हणतो.

### ३.६.६ माओ–त्से–तुंगचा नवसाम्यवादी परिवर्तनाचा सिद्धांत

मार्क्सने परिवर्तन व क्रांतीची जी अधिक शास्त्रीय मांडणी केली त्याप्रमाणे जगात साम्यवादी क्रांत्या झाल्या नाहीत म्हणून नवसाम्यवाद्यांनी मार्क्सवादाच्या मर्यादा लक्षात घेऊन नवसाम्यवादाची मांडणी केली. यात माओने मार्क्सच्या आर्थिक पाया असणाऱ्या क्रांतीबद्दल काही शंका व्यक्त केल्या. माओच्या मते, समाजात एकूण तीन प्रकारच्या क्रांत्या असतात. यात आर्थिक क्रांती, राजकीय क्रांती व सांस्कृतिक क्रांती आर्थिक क्रांती ही लोकांच्या आर्थिक गरजा पूर्ण केल्यानंतर थांबू शकते किंवा मार्क्सने गृहित धरलेले भांडवलदार व कामगार या दोन वर्गात आर्थिक आधारावर मध्यमवर्ग तयार होऊन वर्गसंघर्षाची तीव्रता कमी होते. वर्ग संघर्षच नाही तर मग क्रांती व परिवर्तन कसे होणार? असे माओ म्हणतो. आर्थिक क्रांती बरोबर राजकीय क्रांतीच्या मर्यादा त्याने स्पष्ट केल्या माओ म्हणतो. राजकीय क्रांतीत सत्ताबदल झाला की त्या क्रांतीचे महत्व थांबते. परिवर्तन, बदल, क्रांती व आधुनिकीकरण ही सातत्यपूर्ण पुढे पुढे जाणारी विकासवादी प्रक्रिया असावी लागते. माओच्या मते अशी प्रभावी शक्ती केवळ सांस्कृतिक क्रांतीमध्ये असते. याला माओ 'कायम क्रांती' असे नाव देतो. माओच्या मते क्रांतीमध्ये सर्व लोकांचा सहभाग असावा लागतो. सांस्कृतिक क्रांतीमध्ये सर्व लोकांचा सहभाग असतो कारण संस्कृतीमध्ये धर्म, भाषा, कला, क्रीडा, साहित्य सण, समारंभ या सर्वांचा संबंध असतो आणि प्रत्येक माणूस या ना त्या कारणाने वरीलपैकी कोणत्या तरी एकातरी घटकाशी संबंध असतो. त्यामुळे सांस्कृतिक क्रांती ही सतत तर चालू राहातेच पण ती सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाते. माओने सांगितलेली सांस्कृतिक क्रांती ही साम्यवादीच नव्हे तर एकंदर सर्वच क्रांत्या व परिवर्तन चळवळींवर भाष्य करताना त्यातील मर्यादा स्पष्ट करते. माओच्या समकालीन इतर उत्तर साम्यवाद्यांनी साम्यवादाच्या मर्यादा सांगत समतेच्या सिद्धांताबरोबर व्यापक स्वातंत्र्याचा व स्वायत्ततेचा विचार मांडण्यास सुरुवात केली आहे.

## ३.७ विकास आणि विकसनशीलता (अर्धविकास)

परिवर्तन, सामाजिक बदल, क्रांती आणि आधुनिकीकरणाचा संबंध एकंदर विकासाशी असतो. माणूस व समाज हा सातत्याने विकासाची म्हणजेच अधिक सुखी जीवनाची अपेक्षा करीत असतो. या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तो परिवर्तन, क्रांती व आधुनिकीकरणाचे प्रयोग सातत्याने करीत असतो. त्यामुळेच विकसनशीलता व विकास या मानवी सर्जनशीलतेच्या, बुद्धिप्रामाण्याच्या व उद्योगशीलतेच्या गतिमान प्रक्रिया व अवस्था आहेत. अनादी अनंत कालापासून माणूस विकासाचा शोध घेत पुढे पुढे आलेला दिसतो. या प्रक्रियेत अर्थातच उपलब्ध साधने, गरजा, प्रयत्न व विकासाच्या संभावीत व्याख्या आपणास बदललेल्या दिसतील.

सामाजिक शास्त्रांमध्ये विकासाची संकल्पना ही मुख्यतः दुसऱ्या महायुद्धानंतर, तिसऱ्या जगातील राष्ट्रांना मार्गदर्शन करीत, त्यांच्या विकासाचे मूल्यमापन करण्यासाठी अधिक प्रकर्षाने पुढे आली. म्हणुनच आधुनिक राज्यशास्त्रात विकासाचा अभ्यास दुसऱ्या महायुद्धानंतर म्हणजे १९४५ नंतर केला जातो.

या अगोदर १९ व्या व २० व्या शतकात अनेक समाजशास्त्रज्ञांनी विकासाचे सिद्धांत मांडलेले होते. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ, ऑगस्त कॉम्त याने असे म्हटले होते की, विज्ञान, व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे समाजाचा लष्करी समाजापासून उद्योगप्रधान उन्नत समाजापर्यंत विकास झाला. ब्रिटिश विचारवंत सर हेन्री मेन असे म्हणतो की, समाजाच्या विकासाबरोबरच सामाजिक संबंध स्थिर स्थितीपासून करार पद्धतीच्या स्वरुपाकडे विकसीत होत जातात. जर्मन विचारवंत फर्डीनंड टॉनीज या समाजशास्त्रज्ञाने विकासाचे प्रारुप समजावून सांगताना मानवी समाजाचे संघटन मागास व अप्रगत अशा बद्ध समाजाकडून संघ समाजाकडे विकसीत होत आहे. याचा अर्थ समाज हा पूर्वीही संघटीत होता पण आता तो शिक्षण व तंत्रज्ञानामुळे नागरी स्वरुपात आकारबद्ध संघटीत झाला आहे. फ्रेंच विचारवंत एमील दुर्खीम मानवी विकासाचे मूल्यमापन करताना ते यांत्रिकतेकडून जैविकतेकडे जाते, असे म्हटले. तर जर्मन विचारवंत मॅक्स वेबर अधिकत्तेची पारंपारिक वैधानिक, तार्कीक, बौद्धिक व चमत्कृतीजन्य प्रारुपे सांगतो. समाजाचा विकास हा अधिसत्तेच्या संदर्भात प्रथा परंपरावादाकडून विवेकी व तर्कशुद्ध अधिसत्तेकडे होतो असे तो म्हणतो. वरील सर्व विवेचनावरून असे स्पष्ट होते की, विकास हा निम्न स्तराकडून वरीष्ठ स्तराकडे संक्रमीत होत असतो. अगदी अलीकडे म्हणजे १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या मिचलमॅन याच्या 'Out form Uderdevelopment- Prospects for the Third world' या ग्रथांत असे म्हटले आहे की, ''विकास म्हणजे सामाजिक उद्दिष्ठपूर्तीसाठी नैसर्गिक आणि मानवी संसाधनांच्या क्षमतामध्ये वृद्धी करणे आणि अल्पविकास म्हणजे अशा प्रकारचे गतिरोध जे सामाजिक संरचनेच्या परिवर्तनाला अडथळे व मर्यादा आणतात.''

### ३.७.१ दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेले 'विकास' संकल्पनेवरील संशोधन

दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगामध्ये क्रांतीकारी बदल झाले. या युद्धाने वित्त व मनुष्यहानी झाली पण त्याचबरोबर जगातील सर्व राष्ट्रे आपापल्या विकास, आधुनिकता व शांतता, स्थिरता याबाबत अंतर्मुख झाले. युद्धाऐवजी वास्तववादी विकासाचे नवनवे विचार पुढे येऊ लागले. यातून आधुनिक राजकीय विश्लेषण, सूक्ष्म अर्थशास्त्र यासारखे नवे विषय पुढे आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर तौलनिक दृष्ट्या राजकीय व्यवस्थांचा अभ्यास सुरु झाला. कल्याणकारी नव्या लोकशाही समाजवादाच्या संकल्पनांना महत्व आले तसेच राष्ट्र व राज्य याऐवजी माणूस व समाजकेंद्रीत विकासाला महत्व आले. व्यक्ती स्वातंत्र्यवादी विचारांना अधिक महत्व आले. इंग्लंड, अमेरिका, रशियासारख्या प्रगत राष्ट्रांऐवजी लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका व आशिया खंडातील नवोदित मागास राष्ट्रांच्या विकासावर विचारमंथन होऊ लागले. यातून खरा वास्तववादी विकास कोणता यावर अनेक विचारवंतांनी विचार मांडले. तसेच नवीन व्यवस्था व विचार पुढे आले.

जेम्स कोलमनने 'नायजोरिया बॅकराऊंड टू नॅशनॅलिझम' (१९५९) लिओनार्ड बिंडरने 'रिलीजन अँड पॉलिटिक्स इन पाकिस्तान' (१९६१), हर्बर्ट फेथ याने 'द डिक्लाइन ऑफ कॉन्स्ट्युट्यूशनल डेमॉक्रसी इन इंडोनेशिया' (१९६२), ल्युसियन पाय याने 'पॉलिटिक्स, पर्सनॅलिटी अँड नेशन बिल्डिंग'(१९६२), मायरॉन विनरने 'द पॉलिटिक्स ऑफ सिक्रॅसिटी पब्लिक प्रेशर अँड पोलिटिकल रिसपॉन्स इन इंडिया' (१९६२), डेव्हिड ॲप्टरने 'घाना इन ट्रान्झेशन' (१९६३) यासारख्या अनेक ग्रंथांनी विकासाचा आढावा घेत तिसऱ्या जगातील राष्ट्रांसमोर विकासाचे नवे पर्याय मांडण्याचा प्रयत्न केला. ग्रॅबियल अल्मंड व जेम्स कोलमनने लिहिलेल्या 'द पॉलिटिक्स ऑफ डेव्हलपिंग एरियाज' या १९६० मधील ग्रंथाने विकसनशील राष्ट्रांच्या विकासाच्या मर्यादा व त्यातील राजनीतीवर मूलभूत भाष्य केले. याच समकाळात कार्ल डवाईशने 'सोशल मोबलायझेशन अँड पोलिटिकल डेव्हलपमेंट' यासारख्या लेखातून विकासाबाबतचे आपले चिंतन जगासमोर ठेवले. यातून विकासाबाबत सर्वसमोवशक काही मार्गदर्शक तत्वे मांडली गेली.

### ३.७.२ विकासाची मूलभूत निर्देशक तत्वे

**१) समाजाचे लौकीकीकरण करणे**– कोणताही विकास करण्यासाठी समाजाचे वास्तविक ऐहिकीकरण म्हणजेच लौकीकीकरण करणे आवश्यक असते. या प्रक्रियेत व्यक्ती व समाजाला अंधश्रद्धा, अज्ञान, पारंपारिक संकुचित विचार, धर्मांधता, स्थितीशिलता व अतिरेकी पारलौकिक गोष्टी, कर्मकांड यातून दूर करावयाचे असते. शिक्षण प्रसार, विज्ञान व नविन आधुनिक पुरोगामी विचारातून व्यक्तीला तिच्यातील सर्जनशिलता, प्रखर ऊर्जा व नवनिर्मितीच्या सकारात्मक शक्तीला नवे भान द्यावयाचे काम लौकीकरणात करावे लागते. असा आत्मविश्वास हा विकासाला पूरक समाजसंस्कृती व वातावरण तयार करतो. हा समाज आत्मभावनाने जागृत होऊन नव्या व्यवस्था व विचारांचा स्वीकार करण्यास तयार होतो.

**२) शिक्षणप्रसार** – विकासभिमुख समाज तयार करण्यासाठी समाजात शिक्षणप्रसार होणे गरजेचे असते. यासाठी शिक्षणाचे सार्वत्रीकरण व सखोलीकरण करावे लागते. पारंपरिक संकुचित शिक्षणाऐवजी अधिक पुरोगामी, चिकित्सक, शास्त्रीय तथा बुद्धिवादी विवेकी शिक्षण विकासासाठी आवश्यक असते. सक्षम, सुसंस्कारीत, समाजशील व विवेकी तथा जबाबदार आणि कृतीशील नागरिक तयार करणे ही शिक्षणाची जबाबदारी असते. बुद्धि, मन व शरीराचा समतोल विकास करणारे बुद्धिप्रामाण्यवादी कलावादी व शारीरिक शिक्षणाची विकासासाठी आवश्यकता असते. सहिष्णुता, समाजशीलता, उदारमतवादी राष्ट्रवाद यासारखे गुण तयार करणे हे शिक्षणाचे काम असल्याने समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन स्त्रीपुरुष तथा सर्व मागास व शोषित लोकांना जागृत करून विकासामध्ये सामील करण्याची जबाबदारी शिक्षणाची आहे.

**३) शहरीकरण**– नागरी सेवांचे एकत्रीकरण म्हणजे शहरीकरण शहरामध्ये लोकांच्या सर्व भौतिक, मानसिक, शारीरिक, बौद्धिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व प्रशासकीय गरजा पूर्ण होतात. शहर हे गतिमान असते.

उत्तम रस्ते, नवे तंत्रज्ञान, आधुनिक शिक्षणाची सोय, आरोग्य सेवा, कारखानदारी व बाजारपेठा यामुळे खेड्यापेक्षा शहरात आधुनिकीकरणाची व विकासाची अधिक शक्यता असते.

४) **औद्योगिक विकास, उद्योग व व्यापार, बाजारपेठांचा विकास**– बऱ्याच वेळा औद्योगिक विकासाला पूर्ण विकास मानण्याची प्रथा आहे. यातून औद्योगिक विकास व्यापार, उद्योग, तंत्रज्ञान, उत्पादन व बाजारपेठाचा विकासाच्या संदर्भात अधिक प्राधान्याने विचार केला जातो. आर्थिक प्रगतीशी संबंधीत शेती, व्यवसाय, कारखानदारी व विविध प्रकारच्या सेवासुविधा यावर विकासाचे भावितव्य अवलंबून असते. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करून दरडोई व राष्ट्रीय उत्पन्न वाढण्याबरोबर सतत विकासाला प्राधान्य देणारी राष्ट्रे प्रगत असल्याचे आपण मानतो. मोठे कारखाने, तंत्रज्ञान, शेतीविकास, नवनविन संशोधन, अवकाश शास्त्र व विज्ञानात प्रगती, दळणवळणाच्या सर्व वेगवान सोई, शिक्षणप्रसार, आरोग्य, मजबूत संरक्षण व्यवस्था, मोठ्या प्रमाणात मिळणारे परकीय चलन या सर्व वाणिज्य व आर्थिक दृढीकरणावर विकास अवलंबून असतो.

५) **सामाजिक विकास–** सामाजिक विकासामध्ये व्यक्तीचा विकास, समाजाचा सर्वांगीण सांस्कृतिक विकास व राजकीय आधुनिक तत्वज्ञान व व्यवस्थांचा अभ्यास केला जातो. २० व्या शतकात व्यक्तीकेंद्री, स्वातंत्र्यवादी व उदारमतवादी लोकशाही व्यवस्थांना विकसीत व्यवस्था व विचार मानले जाते. त्याअनुशंगाने व्यक्तीच्या समतोल व सर्वांगीण विकासासाठी त्यांना कायद्याचे संरक्षण याबरोबर त्यांना व्यापक मूलभूत स्वातंत्र्ये द्यावी लागतात. विकासाची समान संधी द्यावे लागते. या सर्व सामाजिक विकासात सार्वभौम कायद्याचे अधिराज्य, प्रभावी स्थिर सर्वोच्च राज्यघटना, सामाजिक न्याय आणि लोककल्याणकारी लोकसत्ताक शासन असावे लागते. या शासनाच्या धोरणांना व्यावहारिक रुप व आकार देण्यास निरपेक्ष, निर्भिड व पारदर्शी कार्यक्षण प्रशासन सामाजिक विकासात महत्वाची भूमिका बजावते. सामजिक विकासासाठी समाजशील तत्वनिष्ठ राजकीय पक्ष, खुल्या निर्भिड निवडणूका, लोकांचा उत्स्फुर्त कृतीशील सहभाग, उदार उच्च राजकीय विचार व त्यांचे समाजीकरण करणारे प्रभावी लोकशिक्षणाच्या संस्था, लोकसत्ताक धर्मनिरपेक्ष निस्पृह प्रसार माध्यमे व समन्वयवादी लोकशाही राष्ट्रवाद अशा अनेक घटकांवर सामाजिक विकास अवलंबून असतो. सामाजिक विकास समाजाच्या बौद्धिक, मानसिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समान विकासावर उभा असतो आणि अशा विकासवादी समाजाला आधुनिक, पुरोगामी, अनुभववादी समाज म्हटले जाते.

### ३.७.३ रोस्टोचा आर्थिक विकासाचा सिद्धांत–

वाल्ट व्हिटमन रोस्टो हा अमेरिकन राजकीय विचारवंत व अर्थतज्ञ होता. तो मुक्त अर्थव्यवस्था तथा भांडवलप्रधान अर्थव्यवस्थेचा खंदा पुरस्कर्ता होता. १९६० मध्ये प्रसिद्ध केलेल्या ' The Stages of Economic Growth. A Non-Communist Manifesto' या ग्रंथात त्याने त्याचा आर्थिक विकासाचा सिद्धांत मांडला आहे. यावेळी त्याने मार्क्सवादी विकास सिद्धांताला विरोध केला. आर्थिक विकासाचा

ऐतिहासिक आढावा घेताना तो मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाला विरोध करतो म्हणूनच या सिद्धांताला तो 'नॉनकम्युनिस्ट मॅनिफेस्टो' असे नाव देतो. यासाठी त्याने विमान उड्डाणाचे प्रतिमान समोर ठेवले होते.

- **विकासाच्या अवस्था**

**अ) पारंपारिक समाज व्यवस्था**– ज्या कालखंडात आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान यांची कोणतीही प्रगती झालेली नव्हती. लोक शेतीवर अवलंबून होते. समाज स्थितीशील होता. लोकांच्या गरजा कमी असल्याने नाविण्याचा शोध घेण्याची प्रयोगशिलता व तशी उत्साही बुद्धी लोकांमध्ये तयार झालेली नव्हती. लोक पारलौकिक सुखात आणि त्या अनुशंगाने दैववादी, धार्मिक व पुराणमतवादी होते. नवे शास्त्रीय निरपेक्ष सत्य त्यांना मान्य नव्हते तसेच नव्या विचाराप्रमाणे स्वतःला दुरुस्त करण्याची त्यांची तयारी नव्हती. रोस्टो याला 'न्यूटनपूर्व अवस्था' असे नाव देतो. सार्वत्रिक मागासलेपण, निरक्षरता, गतिहिनता, दैववाद याबरोबरच हा समाज विषमतेवर व शोषणावर उभा होता.

**ब) उड्डाणपूर्व अवस्था**– पूर्णतः शेतीवर आधारीत असणारा दैववादी, धर्मवादी मागास निरक्षर समाज हा काही सामाजिक आवर्तनामुळे परावर्तीत होऊ लागला. शेतीऐवजी शेतीला पूरक व इतर व्यवसाय, कारखानदारी, तंत्रज्ञान व यांत्रिकीकरण यामुळे नागरी समाज तयार होऊ लागल. लोकसंख्या वाढली. लोकांच्या गरजा वाढल्या. स्पर्धा वाढू लागली. शिक्षणामुळे आत्मभान आले. आपला अपुरेपणा आपल्या विकासाला घातक असल्याचे लोकांच्या लक्षात आले. दैववादावर पूर्णतः अवलंबून असणारा पापपुण्य व नशिबाला महत्व देणारा समाज स्वकर्तृत्वाचा विचार करून कर्तृत्ववान बनू लागला. शिक्षणाबरोबर प्रगतीच्या नव्या वाटा शोधू लागला. सामाजिक प्रबोधनामुळे शहरे, रस्ते, नागरी सेवा शिक्षण, आरोग्य याकडे लोक लक्ष देऊ लागले. ही विकासाची पूर्व तयारी होती.

**क) उड्डाण अवस्था**– ही अवस्था विकासाला अनुकूल असते. या काळात समाजात अमूलाग्र परिवर्तने झालेली असतात. शिक्षणाचे, तंत्रज्ञानाचे सार्वत्रीकरण, राजकीय सामाजिक क्रांत्या वाढते नागरिकरण शहरीकरण, प्रशासनात झालेली वाढ, लोकांच्या वाढत्या हक्क कर्तव्याच्या प्रगल्भ जाणिवा, आंतरराष्ट्रीय घडामोडींचा प्रभाव, दळणवळण व सहज संपर्क यामुळे समाज ही नविन आव्हाने पचवण्यास तयार झाला तसेच आधुनिकीकरणातील नव्या व्यवस्था, नवे विचार मान्य करण्याची मानसिकता तयार झाली. रोस्टो असे म्हणतो की, या नव्या उड्डाण अवस्थेसाठी दोन अटी पूर्ण कराव्या लागतात यात–

१) उत्पादक गुंतवणूकीच्या दरात राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ ते १० टक्के वाढ व्हावी.

२) अर्थव्यवस्थेत एकापेक्षा अधिक प्रधान क्षेत्रांचा विकास व्हावा.

**ड) परिपक्वतेकडे वाटचाल**– रोस्टो असे म्हणतो की उड्डाण अवस्थेनंतर साधारणतः साठ वर्षानंतर ही पुढची प्रगत अवस्था तयार होते. यात आधुनिक नवतंत्रज्ञान हे महत्वाची भूमिका बजावते. देशाच्या गरजा देशांतर्गत पूर्ण होतात कारण सर्व प्रकारच्या भौतिक व वैचारिक, तांत्रिक पातळीवर देश स्वयंपूर्ण बनतो. उत्पादन वाढ होते. आदानप्रदान वाढते. दरडोई उत्पन्नाबरोबर राष्ट्रीय उत्पन्न वाढून देश स्वंयपूर्ण होतो. परकीय चलन मिळते कारण निर्यात वाढते. दारिद्र्याचे प्रमाण कमी होऊन लोकांचे एकंदर राहाणीमान सुधारते. समाज आधुनिकतेकडे व वेगवान प्रगतीकडे वाटचाल करतो.

**इ) उच्च बहुजन उपभोगाचे युग**– रोस्टोच्या मते, विकासाची ही अवस्था बरीच परिपूर्ण स्वरुपाची असते. लोक दैनंदिन गरजा व सेवांच्या पलीकडे जाऊन अधिक चैनीच्या वस्तुकडे झुकलेले असतात. त्याच्या मते, सध्या जगात अमेरिका, इंग्लंड व मध्ययुरोपातील अनेक राष्ट्रे या उपभोगाच्या युगाकडे वळलेली आहे. ही अवस्था अतीसमृद्धी, अतिरिक्त उत्पादन सर्व गरजा पूर्ण करणारी समृद्ध बाजारकेंद्रे, नव तंत्रज्ञान व तांत्रिक सोईसुविधा, प्रचंड गतिमानता आणि दरडोई अतिरिक्त उत्पादनांप्रमाणे कल्याणकारी राजकीय व्यवस्था, आधुनिक शिक्षण, आरोग्य, पाणी, ऊर्जा सकस आहार, उच्च अभिरुची निर्माण करणारे साहित्य कलाविश्व या सर्वांची यथेच्छ रेलचेल या अवस्थेमध्ये असते. अशा राष्ट्रांना पूर्ण विकसीत राजकीय व्यवस्था म्हणतात. ज्या प्रत्येक क्षेत्रामध्ये परिपूर्ण व काळाच्या पुढे गेलेल्या असतात. रोस्टोने अमेरिका व रशिया या समकालीन पण भिन्न राजकीय तत्वज्ञान व भिन्न विकास कल्पना असणाऱ्या देशांचा अभ्यास करून खुली भांडवलप्रधान व्यवस्था हीच अधिक विकासाभिमुख असते असे म्हटले आहे.

### ३.७.४ रचनावादाकडून कार्यवादाकडे विकासाची वाटचाल–

१९६० नंतर सामाजिक विकासाचा कार्यक्षमतेच्या संदर्भात विचार करताना राजकीय व्यवस्थेची 'इच्छाशक्ती' व 'देण्याची क्षमता' म्हणजे प्रदान कार्याला महत्व आले. हा नविन विचार पुढे नेण्यात अल्मंड, हटिंग्टन, जोसेफ नाय, पॉवेल यांनी पुढाकार घेतला. या सर्वांना असे वाटते की, समाजाच्या विकासासाठी राजकीय व्यवस्थेकडे प्रश्न सोडविण्याची क्षमता असावी लागते. याबरोबर कामाच्या सोईसाठी व्यवस्थेचे उपव्यवस्थेमध्ये व संस्थात्मकीकरणात रुपांतर करावे लागते. तसेच सामाजिक ताणतणाव सहन करण्याची क्षमता त्या राजकीय व्यवस्थेकडे असावी लागते. या सर्वांनी व्यवस्थेच्या रचनेपेक्षा सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या क्षमतेला उच्चतम शक्तीला महत्व दिले कारण सामाजिक प्रश्न सोडविण्याला विकासाभिमुख प्रक्रिया मानले जाते.

यावर भाष्य करताना रिंग्जने चार्सवल्थ बरोबर लिहिलेल्या Contemporary Political Analysis या संपादीत ग्रंथात असे म्हटले आहे की, रचना कार्यवादामध्ये राजकीय संस्थाकरण ही संस्कृतीपेक्षा तांत्रिक गोष्ट असते. व तांत्रिक घटकांचा संबंध या अर्थाने विकासाशी असतो.

### ३.७.५ विकासाचे मार्क्सवादी विश्लेषण–

मार्क्सने विकासाचे प्रारुप मांडताना राष्ट्रीय उत्पन्नाच्या समान क्षमताधिष्ठीत वितरणाला म्हणजे आर्थिक समतोल विकासाला विकास म्हटले आहे. शोषणमुक्त वर्गविरहीत समाज व कामगार कष्टकऱ्यांचे, शेतकऱ्यांचे राज्य म्हणजे आदर्श राज्य असे तो म्हणतो. मार्क्सच्या मते असे राज्य हे राज्य नसून राज्यविरहित राज्य म्हणजे समतेवर आधारित समाजव्यवस्था असते. मार्क्सच्या विकासाचा सिद्धांत हा आर्थिक पायावर उभा असला तरी तो भांडवलप्रधानता, खाजगीकरण व भांडवलशाहीचे समर्थन करणारे राज्य यांना विरोध करतो. मार्क्सच्या विकास प्रक्रियेत श्रमिकाच्या श्रमाला अधिक प्राधान्य आहे.

मार्क्सने हेगेलचा द्वंदात्मक विकासवाद स्वीकारला होता पण हेगेलच्या विकासवादात दुरुस्ती करताना मार्क्स द्वंदात्मक विकासवादाच्या मूळाशी असणाऱ्या भौतिक वस्तुंना परिवर्तनाचे मुख्य कारण मानतो. त्याच्या मते मनुष्य हा संघर्षातून स्वतःचा विकास करतो व त्यासाठी मानवी इतिहासात भौतिक वस्तु व उत्पादने ही बदललेली असतात. याचा आढावा घेताना मार्क्स म्हणतो. प्राथमिक अवस्थेत झालेला विकास कंदमुळे व शिकारीपर्यंत मर्यादित होता. गुलामगिरीत जो विकास झाला त्यात शेती असणारे व शेती नसणारे वर्ग होते. जसे प्राथमिक अवस्थेत कंदमुळे शिकार व त्यासाठीची हत्यारे यांचा साठा करणारे सबल होते तर ज्यांच्याकडे हा साठा नव्हता ते लोक दुर्बल होते. सबल व दुर्बलांच्या हितसंबंधात व विकासाच्या विषम दृष्टिकोनामुळे त्यांच्यात संघर्ष होऊन गुलामगिरी ही प्रगत अवस्था तयार झाली व कंदमुळे शिकार या रानटी अवस्थेऐवजी शेतीप्रधान वर्गवारी झाली. शेती असणारे मालक व शेती नसणारे श्रमिक कुणबी बनले. या दोहोच्या संघर्षातून पुढची विकासअवस्था तयार झाली. त्याला मार्क्स संरजामशाही म्हणतो. या काळात राजाकडे असणारे लष्करी सामर्थ्य सैन्य, किल्ले व संरक्षणाची क्षमता याला विकास म्हटले गेले. या ऐतिहासिक टप्प्यात श्रमिक कुणबी राजाकडे, सरंजामदाराकडे सामान्य शिपाई म्हणून किंवा त्याच्या शेतात मजूर म्हणून काम करीत होता. या प्रत्येक टप्प्यात वर्गसंघर्ष अटळ होता. मार्क्स असे म्हणतो की, विकासाच्या पुढच्या टप्प्यात जगात प्रबोधन झाले. कारखानदारी, यांत्रिकीकरण व औद्योगिक क्रांतीमुळे जगाच्या विकासाच्या संकल्पना बदलल्या विकास म्हणजे सैनिकी सामर्थ्य ही व्याख्या मागे पडली व त्याऐवजी अतिरिक्त वेगवान उत्पादन, भांडवल, कारखाने, तंत्रज्ञान, शहरीकरण या संकल्पनांना विकास म्हटले जाऊ लागले. मार्क्स असे म्हणतो की इतिहासाच्या या सर्व वाटचारीत विकास झाला ही गोष्ट खरी असली तरी या विकासात श्रमिक, कष्टकरी, शेतकरी या दुर्बल वर्गाचा कोणताच विकास झाला नाही.

मार्क्सच्या मते समाजाचा विकास हा समतोल व वर्गविरहित असावा लागतो आणि अशी शक्यता भांडवलप्रधान व्यवस्थेच्या अंतीम टप्प्यानंतर येत असते. कारण या अंतीम संघर्षाच्या टप्प्यात अतिरिक्त मूल्यव्यवस्थेने अतिरेकी शोषला गेलेला कामगार एकत्र येऊन भांडवलदाराविरोधात समान उत्पादन साधने व समान आर्थिक विकासासाठी संघर्ष करतो. या टोकाच्या संघर्षात मार्क्सने असे गृहित धरले आहे की, कामगारांचा या लढ्यात विजय होऊन समाजवादी व्यवस्था येईल असे भाकीत त्याने केले. समाजवादी नवी समतोल व्यवस्थेत कोणीही भांडवलदार नसेल व कोणीही कामगार नसेल. सर्वांचा आर्थिक, सामाजिक दर्जा समान राहील

व प्रत्येकाला राष्ट्रीय उत्पन्नाचा समान वाटा व प्रतिष्ठा मिळेल असे मार्क्स म्हणतो. हा नवा समाज भयमुक्त खुला व शोषणविरहित असल्याने साम्यवादी, समाजवादी व्यवस्थेला वास्तववादी विकास अवस्था असे मार्क्स नाव देतो.

मात्र नवमार्क्सवादी विचारवंत माओ, ग्रामसी, लुकाच, मार्क्युस यांनी विकासाच्या मार्क्सवादी प्रारुपावर टीका करून साम्यवादी समाजरचनेतील एकाधिकारशाही, व्यक्तीस्वातंत्र्याकडे व लोकशाहीकडे केलेले दुर्लक्ष विकासाला मारक आहे असे नवमार्क्सवादी म्हणतात. पक्षनिर्मिती, स्वायत्तता निवडणूका व भांडवलदारांचे सामाजिक योगदानही विकासात महत्वाचे असते असे त्यांना वाटते. नवमार्क्सवाद्यांचा मार्क्सवादाकडे बघण्याच्या व्यापक दृष्टिकोन विकासभिमुख स्वरुपाचा आहे. रशियाप्रमाणे, चीन, झेकोस्लाव्हिया, बल्गेरिया, उत्तर कोरिया इत्यादी अनेक मार्क्सवादी राष्ट्रात मार्क्सवादाचे भिन्न प्रयोग होत आहेत. तसेच लोकशाही राष्ट्रेही समाजवादाचा पुरस्कार करीत विकासाच्या नव्या संकल्पना तयार करीत आहेत.

### ३.७.६ अर्धविकास तथा विकसनशिलतेचे सिद्धांत व चिकित्सा

सर्वच राष्ट्रांनी विकास करावा असे कितीही म्हटले तरी असे विचार फारतर आदर्शवादी असतात. ते व्यवहारात येण्याची शक्यता असल्याने जगात विकसीत बडी राष्ट्रे व विकसनशील मागास राष्ट्रे अशी वर्गवारी नेहमीच होते. हा अविकास म्हणजेच परावलंबन होय. साधारणतः दुसऱ्या महायुद्धानंतर लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका व आशिया खंडात वसाहतवादातून स्वतंत्र झालेली छोटी, तिसऱ्या जगातील राष्ट्रे विकसनशील तथा मागास मानली जातात. या मागासलेपणाला पाश्चात्य बडी राष्ट्रे व त्यांचे डावपेच जबाबदार आहेत. असे म्हटले जाते. आंद्रे गुंदर फ्रँक, वॉलरस्टोन, सॅटोस, समीर अमीन, इझो फॅलेटो, प्रणव वर्धन व रजनी कोठारी यांनी यासंदर्भात आपापले विचार मांडले आहेत.

- **मागासलेपणाचा अर्थ**– ज्या राष्ट्रात कोणत्याही दैनंदिन मूलभूत सोईसुविधा जसे रस्ते पाणी, आरोग्य, शिक्षण, वीज, नागरी समाज, तंत्रज्ञान, प्रसार माध्यमे, रोजगार नाही अशा समाजाला अविकसीत समाज व राष्ट्र म्हटले जाते. बऱ्याच वेळा अशा राष्ट्रांकडे मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, कच्चा माल व प्राथमिक साधने असतात पण त्याचा दुय्यम, आधुनिक, तांत्रिक, वस्तुंमध्ये रुपांतर करण्याची तंत्रज्ञानात्मक शक्ती अशा राष्ट्रांकडे नसते. अशा मागास राष्ट्रांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर विकसीत राष्ट्रे आणखी विकसीत होतात. उदा. इंग्लंड, अमेरिका व मध्य युरोपातील राष्ट्रे इत्यादी.

- **मागासलेपणाची अविकासाची कारणे**– विकास ही संकल्पना पुढे पुढे जाताना काही राष्ट्रे मग मागास का राहातात याची काही कारणे खालीलप्रमाणे.

**१) विषम व्यापार**– आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकन खंडात असणारी मागास राष्ट्रे पश्चिमात्य, बड्या राष्ट्रांना कच्चा माल, कच्चे लोखंड, खनिज तेल व स्वस्त दरात जंगल संपत्ती पाठवते पण त्या मोबदल्यात

त्यांना जास्त दराने महागड्या जीवनावश्यक वस्तू खरेदी कराव्या लागत असल्याने त्यांचा या व्यापारात तोटाच होतो.

२) **जागतिक व्यापार संघटनेवर बड्या राष्ट्रांचे प्रभुत्व**– डंकेल प्रस्तावानंतर (GATT) बहुतेक राष्ट्रे या व्यापार संघटनेत सहभागी झाली. पण बड्या राष्ट्रांनी आपल्या सोईनुसार आपली व्यापारी धोरणे तयार केली. जसे बड्या राष्ट्रांनी मध्ययुरोपातील ओपेक (Oil Producing and Export Countries) संघटनेवर नेहमीच प्रभुत्व ठेवले. मागास राष्ट्रांना मदत देण्याचा देखावा करीत आपला लोकशाही अथवा साम्यवादी गट बलवान करण्याचा प्रयत्न केला व या छोट्या राष्ट्रांना आपल्या बाजारपेठा बनविले. यामुळे छोट्या मागास राष्ट्रांचा विकास झाला नाही उलट या मागास राष्ट्रात दारिद्र्य, बेरोजगारी, शैक्षणिक तांत्रिक मागासलेपण, दहशतवाद व कट्टर धर्मांधता वाढत गेली.

३) **बहुराष्ट्रीय कंपन्यांचा नववसाहतवाद**– मागसलेल्या राष्ट्रांच्या मागासलेपणाला मोठ्या प्रमाणात बहुराष्ट्रीय कंपन्या जबाबदार आहेत. १९९१ नंतर जगात खाजगीकरण, जागतिकीरण व मुक्त अर्थव्यवस्थेला विकास प्रक्रियेत महत्वाचे स्थान प्राप्त झाले. अतिरिक्त उत्पादन व झटपट व्यापारातून वेगवान निर्बंधरहित बाजारपेठा तयार झाल्या. पूर्वी बडी राष्ट्रे छोट्या राष्ट्रांमध्ये वसाहती स्थापन करुन व्यापार व नंतर राज्यकारभार करीत. आता मात्र अशी वसाहती स्थापन करण्याची गरज नाही. कारण बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या विविध शाखाद्वारे छोट्या राष्ट्राची बाजारपेठ ताब्यात घेतात. या आर्थिक नाड्या एकदा बड्या राष्ट्रांच्या ताब्यात आल्या की प्रत्यक्ष छोट्या राष्ट्रात न जाता बडी राष्ट्रे आणखी बडी होतात तर मागास राष्ट्रे मागासच राहातात. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादन, किंमती, वेग व जाहिरातीशी छोटी राष्ट्रे तोंड देऊ शकत नाहीत. मागासलेपणाचे हे एक कारण सांगता येईल.

४) **राजकीय संघर्ष व गटराजकारण**– बडी राष्ट्रे छोट्या मागास राष्ट्रांना किरकोळ सहकार्य करतात पण त्यांचा पूर्ण विकास मात्र होऊ देत नाही. मागास राष्ट्रांचा ते हुकमी बाजारपेठ म्हणून वापर करतात. राष्ट्रसंघामध्ये सातत्याने बडी राष्ट्रे छोट्या राष्ट्रांच्या अर्थकारणात, राजकारणात हस्तक्षेप करतात. जी मागास राष्ट्रे आपले ऐकतील त्यांना आंतरराष्ट्रीय कर्ज व मदत मिळते अन्यथा मागास राष्ट्रे दहशतवादी आहेत या नावाखाली म्हणजे मानवी हक्कांचा भंग झाल्याचे कारण सांगत मागास राष्ट्रांवर बहिष्कार टाकून त्यांची नाकाबंदी केली जाते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अशा अनेक खेळ्या अमेरिका व रशियाने केल्या. यातून या ब्र्या राष्ट्रांचे काहीच नुकसान झाले नाही पण मागास राष्ट्रे आणखी मागास व परावलंबी बनली.

### ३.७.७ अविकसीत राष्ट्रांचे परावलंबन–

विकसीत व विकसनशील राष्ट्रातील विकासासाठीचा संघर्ष सतत चालू असतो. यात विकसीत राष्ट्रांना केंद्र तर मागास विकसनशील राष्ट्रांना परीघाबाहेरील राष्ट्रे म्हटले जाते. केंद्रस्थानी असणारी मध्यवर्ती श्रीमंत राष्ट्रे

परीघाबाहेरील राष्ट्रांना कायम विकासापासून दूर ठेवतात. मागास राष्ट्रांचे मागासलेपण व त्यांचे परावलंबन यात श्रीमंत राष्ट्रांचा आणखी विकास गृहित असतो. मागास राष्ट्रांकडून नैसर्गिक साधनसंपत्ती स्वस्त दरात घेणे व त्यातून तयार होणारा माल याच मागास राष्ट्रात जास्त दरात विकण्याचे व्यापारी तंत्र श्रीमंत राष्ट्रे वापरतात. त्यामुळे मागास परिघाबाहेरची राष्ट्रे कधीच आंतरराष्ट्रीय स्तरावर आधुनिकीकरण व विकास या प्रक्रियेशी जोडली जात नाही. ती कायम उपेक्षीत राहतात. त्यांचा बाजारपेठा म्हणून वापर होतो. पण जर एखादे मागास राष्ट्र या अन्यायाविरोधात उभे राहाण्याचा प्रयत्न करीत असेल तर श्रीमंत राष्ट्रे त्यांचे बंड मोडून काढण्यास त्याच्यावर बहिष्कार टाकतात. त्याचा कर्जपुरवठा बंद होतो. त्याच्याविरोधात लष्करी कारवाई होते. अशा राष्ट्राने मानवी हक्कांचा भंग करून दहशतवादाला खतपाणी घातल्याचे जाहीर करून अशा दुर्बल राष्ट्राचे व त्याच्या बंडखोर नेत्याचे खच्चीकरण केले जाते.

१९५० मध्ये सर्वात प्रथम रॉल प्रेबीच याने परावलंबनाचा सिद्धांत मांडून राष्ट्रांच्या मागासलेपणाची कारणे सांगितली. यानंतर ए. जी. फ्रँक व समिर अमीन व वॉलरस्टोन यांनी यासंदर्भात आपले विचार प्रभावीपणे मांडले.

### ३.७.८ १) समीर अमीनचे परावलंबनाबाबतचे विचार-

समीर अमीन हा इजिप्तमधील मार्क्सवादी विचारवंत होता. १९५७ मध्ये त्याने 'The Origins of Underdevelopment Capitalist Accumulation on a world scale' हा ग्रंथ लिहिला. याशिवाय साम्राज्यवाद आणि विषम विकास यावर त्याने परखड विचार मांडले. त्याच्या मते कोणत्याही राष्ट्राची प्रगती व विकास हा प्रमुख पाच कारणांवर उभा असतो. यात.

१) लष्करी सत्तेबरोबर तंत्रज्ञानाचा विकास

२) जागतिक अर्थव्यवस्था नियंत्रीत करणारी आर्थिक मक्तेदारी

३) नैसर्गिक साधनसंपत्तीची परिपूर्णतः व मक्तेदारी

४) आंतरराष्ट्रीय दळणवळण व प्रसारमाध्यमांची मक्तेदारी

५) संहारक शस्त्रास्त्रांवरील मक्तेदारी

याउलट समीर अमीन असे म्हणतो की, परिघाबाहेर जी मागास राष्ट्रे असतात त्यांची वैशिष्ट्ये हिच त्यांच्या मागासलेपणाला कारण असतात. यात

१) अशा देशात उदारमतवादी लोकशाही मूल्ये व जाणीवा तयार झालेल्या नसतात.

२) प्रसारमाध्यमे निरंकुश पद्धतीने माहिती देण्याचे चुकीचे, एकतंत्री काम करतात.

३) भांडवलदार व तत्सम हुकूमशहांचे या व्यवस्थांवर नियंत्रण असते.

४) नागरी समाजाला अशा शासनाच्या बाजुने नविलाज म्हणून उभे राहावे लागते.

५) अशा देशात शासकीय धोरणे सामान्य बहुजनांच्या कल्याणाची नसतात.

६) राज्यकर्ता वर्ग व समाज यात मोठे अंतर असते व सुसंवाद नसतो.

७) अशा राष्ट्रांच्या बाजारपेठेत परकीय माल विक्रीसाठी असतो. ज्याचा या मागास राष्ट्रांना काहीच फायदा होत नाही.

८) मागास राष्ट्रांत आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रचंड विषमता असते.

९) सामाजिक न्याय, तंत्रज्ञान, विज्ञानवादी दृष्टिकोन, आधुनिकता, शिक्षण यापासून ही राष्ट्रे दूर असतात.

१०) मागास राष्ट्रात पारंपारिक संकुचित विचार, धार्मिक जातीय वांशिक तणाव, यादवी व मूलतत्ववादी कठोर हिंसक विचार असतात. सततच्या दंगली व दहशतवादामुळे हा समाज भयग्रस्त असतो. तो स्वतःची प्रगती कशी करणार?

११) मागास राष्ट्रात प्रशासन भ्रष्ट असते. त्यांच्यात नोकरशाही, दप्तरदिरंगाई गतिहिनता यासारखे दोष असतात.

१२) मागास राष्ट्रात कामगार, शेतकारी, सामान्य सेवक यांच्या संघटना वा तशा लोकशाही, परिवर्तनवादी पुरोगामी चळवळी नसतात. या सर्वांचा परिणाम हा त्यांच्या मागासलेपणाला कारणीभूत असतो. असा निष्कर्ष समीर अमीनने काढला आहे.

**२) आंद्रे गुंदर फ्रँकचे परावलंबनाबातचे विचार-**

फ्रँकने लॅटिन अमेरिकेतील काही मागास राष्ट्रांचा अभ्यास करुन दक्षिण आफ्रिका व आशिया खंडातील मागास राष्ट्रांच्या मागासलेपणाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. फ्रँक हा जर्मन, अमेरिकन अर्थतज्ञ, इतिहास संशोधक व समाजशास्त्री होता.

त्याने जगातील राष्ट्रांची प्रमुख दोन गटात विभागणी केली आहे. पश्चिमी बडी श्रीमंत राष्ट्रे जगाच्या म्हणजे वर्तुळाच्या मध्यवर्ती असतात तर लॅटिन, अमेरिका, द. आफ्रिका व आशिया खंडातील राष्ट्रे की ज्यांना आपण तिसरे जग वा विकसनशील राष्ट्रे म्हणतो ती या वर्तुळाच्या बाह्य परिघावर असतात. फ्रँक असे म्हणतो की, ही राष्ट्रे जोपर्यंत परिघावर फिरत असतात किंवा केंद्रातील श्रीमंत राष्ट्रे त्यांना आत येऊ देत नाही. त्यांना वास्तविक अशा विकास कार्यक्रमात सहभागी करुन घेत नाही तोपर्यंत मागास राष्ट्रांचे हे परावलंबन व एकलेपण त्यांच्या मागासलेपणास कारणीभूत ठरते.

या केंद्र व परीघ प्रकारात केंद्रात असणारी राष्ट्रे परीघावरील मागास राष्ट्रांचे सतत शोषण करीत असतात. ही छोटी राष्ट्रे जेवढी दुर्बल व मागास राहातील तेवढा केंद्रातील राष्ट्रांचा फायदा व राष्ट्रीय हित मोठे असते. या

परावलंबनाला फँकने मार्क्सवादी विचारांची जोड दिली आहे. श्रीमंत राष्ट्रे ही भांडवलदार म्हणून तर विकसनशील मागास राष्ट्रे ही कामगाराप्रमाणे काम करताना दिसतात. भांडवलदार जसे कामगारांचे शोषण करतो तसेच श्रीमंत राष्ट्रे मागास राष्ट्रांचे शोषण करतात. जसे मागास राष्ट्रांचा कच्च माल, नैसर्गिक संपत्ती, जंगल संपत्ती कमी दरात घेऊन मागास राष्ट्रांचा बाजारपेठेत त्यातून तयार झालेला माल जादा किमतीला विकणे. मागास राष्ट्रात वांशिक, धार्मिक संघर्ष घडवून त्यांना मदत करण्याच्या नावाखाली त्यांच्या राजकारणात अर्थकारणात हस्तक्षेप करणे हे सर्व मार्ग शोषणावर आधारीत असल्याचे फ्रँक म्हणतो. यातून मागास राष्ट्रांना जर स्वतःचा विकास करावयाचा असेल तर त्यांना साम्यवादी क्रांती करून समाजवादी समाजरचना स्वीकारावी असा सल्ला तो देतो.

### ३) इम्यानुल वॅलेरस्टोनचा विश्व व्यवस्था सिद्धांत

इम्यानुल वॅलेरस्टोन हा समाजशास्त्राचा मोठा अभ्यासक होता. 'The Modern World System' या तीन खंडात प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात त्याने भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा सूक्ष्म अभ्यास करुन मागास राष्ट्रांचे मागासलेपण व प्रगत राष्ट्रांचे प्रगतपण याची कारणमीमांसा केली आहे. कार्ल मार्क्सचे परिवर्तनाचे विचार व समतेवर आधारीत विकास संकल्पना, फ्रेंच विचारवंत व इतिहासकार फर्नाड ब्रुडेल याची समकालीन इतिहासावरील सखोल मीमांसा, वसाहतवादानंतर दक्षिण आफ्रिका खंडातील राष्ट्रांचे झालेले आर्थिक पतन याचा खोल परिणाम वॅलेरस्टोनवर होता. अभ्यासाच्या सोईसाठी दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखालील लोकशाही जग, रशियाच्या नेतृत्वाखालील साम्यवादी जग व साम्राज्यवादातून स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचे तिसरे जग ही संकल्पना त्याला मान्य नव्हती. त्याच्या मते संपूर्ण जग हेच मूळात परस्परावलंबी आणि यातील प्रत्येक राष्ट्र आर्थिक कारणांमुळे परस्परात अडकलेले आहे. त्यामुळे संपूर्ण जग एकच असून त्याला तो 'जागतिक अर्थव्यवस्था' असे नाव देतो. एकदा जागतिक व्यवस्था मानले की या अभ्यासातून पुढील गोष्टी स्पष्ट होतात यात.

१) आर्थिक विकासात भौगोलिक विषमतेची नैसर्गिक कारणे शोधता येतात.

२) जगातील विविध राष्ट्रांच्या विकासाचा आढावा घेता येतो.

३) जगातील विकसीत व विकसनशील राष्ट्रांच्या एकंदर विकासाचा ऐतिहासिक आढावा घेणे.

४) जागतिक भांडवली विकासाचे मूल्यमापन करणे.

५) १६ व्या शतकात जगात झालेली श्रमविभागणी व केंद्र आणि बाह्य वर्तुळ यात झालेली विभागणी राष्ट्राच्या विकासावर भाष्य करू शकते.

६) वॅलेरस्टोनच्या मते १६ व्या शतकात मध्ययुरोपात राजेशाही व सरंजामशाहीचा अंत झाला व त्याजागी औद्योगिकीकरण व प्रबोधनामुळे भांडवलशाही तयार झाली. या भांडवलशाहीने बऱ्याच वेळा लोकशाहीला जवळ करीत १९ व्या शतकात संपूर्ण जगात स्वतःचे जाळे तयार केले.

७) वॅलेरस्टोनच्या मते या काळात भांडवलशाहीलाच विकासाची अंतीम अवस्था असे नाव मिळाल्याने त्यातील अंगभूत दोषांकडे बऱ्याच देशांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे विकासाची भासमान प्रतिके तयार झाली.

वॅलेरस्टोनने विकासाचा सिद्धांत स्पष्ट करण्यासाठी जगातील राष्ट्रांची तीन प्रकारात विभागणी केली जात–

१) केंद्र प्रदेश (Core)

२) मध्यप्रदेश (Semi- Periphery)

३) बाह्य प्रदेश (Periphery)

वॅलेरस्टोनच्या मते केंद्र प्रदेशात भांडवलदार, उच्च मालाची निर्मिती करणारी, तंत्रज्ञान विज्ञान, औद्योगिकीकरण, दळणवळण व संपर्क साधने तथा आधुनिक राहाणीमान असणारी श्रीमंत राष्ट्रे असतात. तर तिसऱ्या प्रकारची म्हणजे बाह्य प्रदेशात असणारी राष्ट्रे सर्व प्रकाराच्या विकास कार्यक्रमांपासून सतत दूर असतात. मोठ्या केंद्रस्थानी असणाऱ्या राष्ट्रांना कच्चा माल पाठवणे. जंगलसंपत्ती, वनसंपत्ती, खनिज संपत्ती व स्वस्त मजूर देण्याचे काम ही मागास म्हणजे बाह्य प्रदेशातील राष्ट्रे करतात. अशा राष्ट्रात शिक्षण, समाजीकरण, विज्ञान, तंत्रज्ञान व पुरोगामी कोणतेही विचार तयार होत नाही. बड्या राष्ट्रांच्या त्या महागड्या बाजारपेठा म्हणून स्वतःचे शोषण करुन घेतात. नंबर दोनची म्हणजे मध्यप्रदेशात असणारी राष्ट्रे नेहमी दुहेरी भूमिका करतात. केंद्र प्रदेशाच्या दृष्टिने ती मागास असतात पण बाह्य प्रदेशातील राष्ट्रांच्या दृष्टिने ती विकसीत असतात. ती पूर्ण मागास वा पूर्ण विकसीत नसतात. वॅलेरस्टोनच्या मते या प्रकारात चीन, ब्राझील, मेक्सिको व पूर्वीची युरोपियन राष्ट्रे यांचा समावेश होतो.

भांडवलशाहीचा पुरस्कार व विषम विनियमामुळे मागास राष्ट्रे कायम मागास राहिली आहेत. यातून त्यांची मुक्तता करून विकास प्रक्रियेत सामील करून घेण्यास समाजवादी क्रांती हाच उपाय आहे असे आंद्रे गुंदर फ्रँकप्रमाणे वॅलेरस्टोनही म्हणतो.

थोडक्यात विकास ही एक सततची प्रक्रिया असून कालपरत्वे काही राष्ट्रे योग्य त्या नियोजनबद्ध परिवर्तनातून आपला विकास करू शकतात आणि बाह्य वर्तुळातून मध्यप्रदेश व मध्यप्रदेशातून केंद्रापर्यंत धडक मारु शकतात.

## ३.७.९ विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचे शाश्वत मार्ग एक चर्चा आणि हरित क्रांतीचे मूल्यमापन

विकासाच्या वाटेने जाताना नक्की विकास म्हणजे काय? व त्याचा अतिरेक झाला तर विकासाची ध्येये कशी भरकटतात आणि मानवजातीला कोणते धोके पहावे लागतात याची जाणीव नैसर्गिक साधनसंपत्ती व पर्यावरणाचा समतोल यातून होऊ शकतो. पर्यावरणवाद ही सुसंघटित विचारप्रणाली नसून कृत्रीम व अवाजवी विकासाची एक वास्तववादी नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. जी श्रीमंत राष्ट्रांच्या अवास्तव विकासाला विरोध करते व नियंत्रीत विकासाला प्राधान्य देते.

विशेषतः १९६० नंतर पर्यावरणाचा अधिक गांभीर्याने विचार होऊ लागला. माणूस व विकास या दोहोंच्या मध्ये निसर्ग, पर्यावरण, पशू पक्षी व वातावरण याचे स्थान कोणते? यावर विचार मांडले जावू लागले. विकासाच्या पाठीमागे धावताना औद्योगिकीकरण, शहरीकरण, कारखानदारी वाढते प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडून मानवजातच अडचणीत येऊ लागली. तेंव्हा अनेक देशातून विकासाचा खरा अर्थ काय? पर्यावरणाचा समतोल म्हणजे काय? जंगल वन संपत्ती, निसर्ग वन्य पशू पक्षी यांचे अर्थपूर्ण जीवन यावर विचार मांडले जाऊ लागले. या विचारमंथनातून १९७० मध्ये पहिल्यांदा 'अर्थ डे' साजरा झाला. पर्यावरणाच्या रक्षणासाठी कायदे तयार होऊ लागले. विकासाच्या व्याख्या बदलून त्याला निसर्ग व पर्यावरणाचे संदर्भ मिळू लागले. पर्यावरणाचा अभ्यास होऊ लागला आणि १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे 'युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन द ह्युमन एनव्हायरमेंट'आयोजित करण्यात आली.

१९६० ते १९७० या काळात तयार झालेल्या या आंतरशास्त्रीय विषयात नवनवे सिद्धांत पुस्तक रुपात पुढे आले. माणूस हा देखिल निसर्गाचाच एक भाग असल्याने पर्यावरण हा जिव्हाळ्याचा विषय बनू लागला. राचेल कार्सन याने 'सायलेंट स्प्रिंग', मरे बुकचिन याने 'अवर सिंथेटिक एनव्हायरमेंट', चार्ल्स राईश याचे 'द ग्रीनींग ऑफ अमेरिका' या काही ग्रंथानी निसर्ग व पर्यावरणाचा विषय पुढे मांडताना विकासाच्या अतिरेकावर कठोर टीका केल्या. पर्यावरणाचा प्रश्न म्हणजे केवळ जास्तीत जास्त लोकांच्या व देशाच्या विकासातील सहभागी प्रश्न नसून तो संपूर्ण पृथ्वीच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे याकडे या विचारवंतांनी जगाचे लक्ष वेधले. १९७९ मध्ये जर्मनीत 'जर्मन हरित पक्ष' तयार झाला. या पक्षाने 'लिमिटस टू ग्रोथ' नावाचा अहवाल सादर करून बड्या राष्ट्रांच्या विकास प्रक्रियांना वास्तविक प्रश्नांचे भान दिले. पुढे १९८७ मध्ये अमेरिकेने तयार केलेल्या अहवालात पर्यावरणाचा प्रश्न गंभीर असल्याचे मान्य केले.

भौतिक, तांत्रिक प्रगती, आर्थिक क्षमतेत वाढ व अतिरिक्त वेगवान उत्पादन या विकासाच्या मूलभूत घटकांना विरोध करताना पर्यावरणवाद्यांनी काही गंभीर प्रश्नांकडे सर्वांचे लक्ष वेधले. यात मानवाची होणारी भावनिक हानी परात्मभाव, आर्थिक विषमता, जीवघेणी स्पर्धा, मूळनिवासी आदिवासी समाज व अभिजात

संस्कृतीचा ऱ्हास, स्मार्ट शहरांच्या नावाखाली बकाल, दरिद्री गर्दीची शहरे व त्यांची होणारी प्रचंड वाढ व मानसाचे झालेले यांत्रिकीकरण इत्यादी हे सारे प्रश्न विकासाच्या स्पर्धेला अंतर्मुख करणारे होते. यात विल्यम लिस, जॉन रोडमन, मरे बुकचिन, थिओडोर रोझॅक, रुडाल्फ बहारो, ख्रिस्तोफर स्थेन, डेवाल, जॉर्ज सेसियन्स यांनी भर घातली. यामुळे मानवी मुक्तीचा नवा विचार पुढे आला.

निसर्ग, मानवी गरजा, निसर्गावर मानवाचे आक्रमण, आधुनिक तंत्रज्ञानाचा जादा वापर, चंगळवादी संस्कृती या सर्वांचा विकासाच्या संदर्भात आढावा घेण्यात आला. या नव्या विकासवादी संस्कृतीमुळे मानवी सर्जनशीलता, सामाजिक एकसंधता, पारंपारिक पण उदात्त जीवनमूल्ये, मानवता, सहिष्णूता व सामजिक सभ्यता नष्ट होत असल्याचे जगाने उशिरा का होईना मान्य करण्यास सुरुवात केली. यातून विकासाच्या संदर्भात प्रमुख दोन दृष्टिकोन तयार झाले यात-

१) मानवकेंद्री दृष्टिकोन व

२) पर्यावरणकेंद्री दृष्टिकोन

मानवकेंद्री दृष्टिकोन मानसाला अधिक महत्व देऊन पर्यावरणाला त्याचे पूरक कोठार म्हटले आहे तर पर्यावरण केंद्री दृष्टिकोनात निसर्गाच्या संदर्भात मानवी कल्याणाचा व विकासाचा विचार मांडला आहे. कारण त्यांच्या मते या पर्यावरणात मानसाचे स्थान निश्चित केल्यानंतरच मग सामाजिक व राजकीय संस्था आपली बांधणी करु शकतात. पर्यावरणकेंद्री दृष्टिकोन पर्यावरणातील परस्पर तयार झालेल्या निसर्गाच्या सहजसुंदर साखळी व अनुबंधाला महत्व देतो. तात्पुरत्या फायद्यासाठी व निसर्ग अफाट आहे म्हणून त्याचा अनैसर्गिक वापर करण्यातून दीर्घ असे जटील प्रश्न तयार होऊ शकतात. याचे भान सर्वांनी ठेवले तर तो खरा विकास आहे असे पर्यावरणकेंद्री मानतात. पर्यावरणवाद्यांनी कधीही मानसाला दुय्यम मानलेले नाही पण मानवी विकासाची संकल्पना सुट्टी व एकाकी नसून ती निसर्गाच्या परिसंस्थेशी निगडीत आहे. एवढेच नव्हे तर ती निसर्गाच्या नैसर्गिक परिसंस्था व साखळीचा एक भाग आहे. पर्यावरणवादी असे म्हणतात की, ''वनस्पती, प्राणी, निसर्ग व पर्यावरणातील सर्व चराचर सृष्टी एकमेकांशी जैव पद्धतीने बांधलेली असून सर्व घटक एकमेकावर कळत नकळत अवलंबून असतात. नैसर्गिक पद्धतीने या सर्व घटकात आदानप्रदान चालू असते. जसे वनस्पती व जंगलापासून मिळणारा प्राणवायु, नद्यांपासून मिळणारे पाणी व जलचर परस्पर अन्नसाखळी व समतोल आणि त्यातून मिळणारे मानवी व सर्वांचे सुखी जीवन.पर्यावरणकेंद्री असे मानतात की, मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाला हानी पोहोचते. त्यामुळे मानवनिर्मिती असणारा विकासच नव्हे तर संपूर्ण जीवनसृष्टी अडचणीत येऊ शकते. यासाठी सखोल परिसंस्था दृष्टिकोन असे म्हणतो की, मानव व निसर्ग या दोन संकल्पना एकमेकाविरुद्ध नसून त्या एकजीव, पूर्ण व परस्परावलंबी संकल्पना आहेत.'' निसर्गाची मोडतोड करुन विकास करताच येत नाही व केलाच तर तो भासमान, फसवा असतो व त्याचे दूरगामी घातक परिणाम सगळ्यांना भोगावे लागतात. जसे मोठ्या धरणांमुळे

भूकंप, अती औद्योगिकरणामुळे प्रदूषण व प्रदूषणाने तयार होणारे जीवघेणे आजार, पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने पडणारे अवकाळी पाऊस आणि निसर्गाच्या ऋतूंमध्ये झालेले आकस्मिक बदल मानवी जीवनाला, शेतीला घातक आहेत. निसर्ग ही एक प्रचंड ऊर्जा असून तिचा नैसर्गिक सुलभ पद्धतीने उपयोग करुन घेतला पाहिजे. अशा संपत्ती ओरबाडून घेणे पुढच्या पिढ्यांना धोकादायक आहे.

मार्क्सने सुद्धा भांडवलप्रधान अर्थव्यवस्थेवर व अनैसर्गिक विकासावर टीका करताना पर्यावरणाचा शास्त्रीय विचार मांडला होता. माणूस आपल्या कधीही न संपणाऱ्या गरजा व सुखाच्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी बुद्धिच्या आधारावर निसर्गाचे मूळ नियम बाजूला ठेऊन आपले प्रभुत्व तिथे गाजवण्याचा प्रयत्न करतो. मी या सर्वाचा मालक आहे व निसर्ग माझ्या मुठीत असून, निसर्ग म्हणजे केवळ कच्चा माल अशी त्याची भावना असते. स्वतःच्या तात्पुरत्या फायद्यासाठी तो निसर्गाचे व्यवस्थापन मोडून टाकतो. म्हणून निसर्ग व मानवी परिसंस्था यात सुसंगती असावी असे मार्क्स म्हणतो. यातनू प्रेरित होऊन मरे बुकचिन याने सामाजिक परिसंस्थात्मक दृष्टिकोन निसर्गाने संतुलन, वैविध्य, उत्स्फुर्तता, स्वातंत्र्य व समग्रता यावर आधारित असल्याचे म्हटले. यातून मार्क्सवाद्यांनी विकासाच्या संदर्भात महत्वाचे विचार मांडले. जे परिसंस्थात्मक समाजवाद्यांनी नाकारले त्यांच्या मते–

१) भांडवलशाही व साम्यवादामध्ये निसर्गाचे शोषण होत राहाते कारण साम्यवादी समाजरचनेत भांडवलदार गेला तरी कामगार वर्ग उत्पादन करताना निसर्गाला कच्चा माल असेच मानतो.

२) परिसंस्थात्मक समाजवाद्यांच्या मते कामगार वर्ग हा सुद्धा पुरोगामी परिवर्तन करण्याची शक्यता फारच कमी आहे. कारण यांत्रिकीकरणामुळे कामगारांची संख्या घटत आहे. त्यांचे वर्गिय अस्तित्व सैल होत आहे. शिवाय कामगार हे उत्पादन केंद्री बनल्याने त्यांचे नवनिर्माण, नवव्यवस्थापन व त्यांना वर्गिय आकार देणे हे सध्या पर्यावरणवादी व डाव्या चळवळींचे प्रमुख ध्येय्य आहे.

३) पर्यावरणीय  समतोल राखताना त्यातील समस्या सोडविण्यासाठी वर्गिय लढ्याच्या पलीकडे जावून विचार करणे गरजेचे आहे. भांडवल विरुद्ध श्रम या वादापेक्षा संपूर्ण मानव व निसर्ग यांच्या समस्या गंभीर असल्याचे पर्यावरणवादी मानतात.

यासाठी विकसीत व अर्धविकसीत म्हणजे मागास राष्ट्रांनी आपली पारंपरिक मानसिकता बदलणे गरजेचे आहे. जसे विकसीत राष्ट्रांनी आपला जादा विकासाचा आग्रह, स्पर्धा व नैसर्गिक संपत्तीवरील अघोरी आक्रमण थांबवले पाहिजे तसेच अर्धविकसीत मागास राष्ट्रांनी आपण कायम मागासच आहोत व कच्चा माल पुरवणे हे आपले काम आहे हे जाणिवपूर्वक विसरावे. सध्या प्रमाणित व समतोल प्रगतीमध्येच खरा प्रमाणित व समतोल प्रगतीमध्येच खरा विकास आहे. शिक्षण, आरोग्य, सुसंस्कार, स्वातंत्र्य, ऊर्जा, पाणी, दैनंदिन गरजा, सकस आहार, घर व वहातूक या विकसीत व मागास राष्ट्राच्या समान गरजा आहेत व त्या मिळवणे म्हणजे विकास असे पर्यावरणवादी मानतात.

### ३.७.१० हरित क्रांती– एक मूल्यमापन

१८ व्या १९ व्या शतकात भौतिक विकास, औद्योगिकीकरण तंत्रज्ञान व प्रबळ आर्थिक उत्पादन क्षमतेपुरती मर्यादित असणारी विकासाची संकल्पना आता व्यापक, सर्वस्पर्शी व आंतरशास्त्रीय बनली असून वरील सर्व भौतिक विकासाचा माणूस व निसर्गाच्या संदर्भात समतोल विचार होऊ लागला. विकासाचा पर्यावरणावर होणारा परिणाम व त्यामध्ये मानवाचे हित व भविष्य याचा विचार हरित क्रांतीच्या मूळाशी आहे. या महत्वाच्या हरित राजकीय सिद्धांताची प्रमुख तत्वे खालीलप्रमाणे.

१) मानव हा निसर्गाचा अविभाज्य घटक आहे. तो निसर्गाचा कर्ता करविता नाही. निसर्ग म्हणजे केवळ नद्यानाले, डोंगर, जंगल वनसंपत्ती व वन्य जीव असे नसून या पर्यावरणात मानवही अभिप्रेत आहे. म्हणूनच क्षणैक सुखासाठी मानसाने निसर्गाच्या नैसर्गिक व्यवस्थापनाची मोडतोड करु नये. त्यांचा हा हस्तक्षेप विकासालाच नव्हे तर मानवी अस्तित्वालाच धोका आहे.

२) प्रगतीच्या सतत विकास पावणाऱ्या पण चुकीच्या संकल्पनांमुळे विशेषतः श्रीमंत विकसीत राष्ट्रे मोठमोठे विकास कार्यक्रम राबवत आहेत. जसे नद्यांची दिशा बदलणे. समुद्रात भर टाकून शहरांचा विकास करणे. मोठमोठ्या अणुभट्ट्या व विषारी वायू बाहेर टाकणारे प्रकल्प सुरू करणे. प्लॅस्टिकचा अतिरेकी वापर अशा अनेक तथाकथित विकास धोरणांमुळे पर्यावरण व वातावरणाची प्रचंड हानी होत आहे. हवेतील ओझोनचा थर वितळ होत असून प्राणवायुची कमतरता तर कार्बन व कार्बन मोनाक्साईड सारख्या प्रदूषित वायुंमुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे. या विध्वंसक विकास कार्यक्रमाला वेळीच पायबंद घालणे आवश्यक आहे.

३) निसर्गाला आव्हान देऊन मुठीत पकडण्याचा मानवी प्रयत्न घातक आहे. उलट निसर्ग मानवाच्या कल्याणासाठी शुद्ध हवा, पाणी, जंगलवन संपत्ती, खनिजसंपत्ती निसर्ग सौंदर्य हे सारे वैश्विक भांडार घेऊन उभा आहे. त्याच्याशी मैत्री करुन पर्यावरणाचा समतोल टिकविण्यातच खरा विकास व आनंद आहे. असे करण्यासाठी जगातील सर्व राष्ट्रांनी पुढाकार घेऊन आपल्या राजकीय, सामाजिक व्यवस्थांची नव्याने पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडविणाऱ्या व्यक्ती, संस्था व उत्पादन केंद्रावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे. भारतात औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कारखान्यांचे प्रदूषित रसायनमिश्रीत पाणी नद्यांमध्ये सोडले जाते. यातून पिण्याच्या पाणीप्रश्नाबरोबर शेती, जलचर जीव त्यांची अन्नसाखळी दुखावली जात आहे. अतिरेकी रसायने असणाऱ्या खतांमुळे शेती नापीक बनत आहे. स्मार्ट सिटीच्या नावाखाली शहरांची बेसुमार वाढ होत आहे. रस्ते रुंदीकरण व मोठमोठ्या प्रकल्पासाठी वृक्षतोड होत आहे. प्लॅस्टिकच्या अतिरेकी वापराने शहरातील नदीनाले गटारे तुंबून पावसाळ्यात मुंबईसारखी शहरे पाण्यात बुडत आहेत. पर्यटन स्थळ तर आता तरुणांची गोंधळ व सेल्फी केंद्रे बनली

आहेत. नववर्षाच्या पार्ट्या, कचऱ्यांचे ढिग, आवाजांचा गोंधळ, वहातुकीच्या साधनात झालेली प्रचंड गर्दी, शहरी बकालपणा आणि सार्वत्रिक अस्वस्थता यावर कठोर कायद्यांची गरज आहे. सामाजिक प्रश्न वेळीच सोडवले नाही तर मानुसच या सुंदर विश्वाचा शेवट करील.

४) हरित क्रांती असे मानते की, सर्व चराचर सृष्टी, मनुष्य पशूपक्षी, जीवजंतू व भौतिक वस्तू या परस्परावलंबी आहेत. यात नैसर्गिक मूळ ऊर्जा मध्यवर्ती असून सर्व नैसर्गिक प्रक्रियांना स्वतःची अंगभूत पद्धती, गती व व्यवस्था आहे. या मूळ नैसर्गिक सहजसुलभ पद्धती व वाटचालीवर मानवी हित, सुख व भविष्य हे अवलंबून असते. त्यामुळे निसर्गाच्या या प्रचंड शक्तीला धक्का न लावता आपले हित व खरा विकास हा निसर्गाच्या व महान सृष्टीच्या सर्जनशील नवनिर्मितीमध्ये आहे. असे हरित क्रांतीचे मत आहे. त्याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे.

५) विज्ञान, तंत्रज्ञान व आधुनिकता ही मानवी जीवनात महत्वाची असते. हरित पर्यावरणवादी विज्ञान तथा शास्त्रीय संशोधनाचे स्वागत करतात. पण त्याचवेळी शास्त्र व तंत्रज्ञान हे कायम स्वरुपी निसर्ग व मानवी जीवनावर परिणाम करणारे घटक असल्याने त्यातील दूरगामी धोके लक्षात घेऊन त्यांचा संयमित व विचारपूर्वक वापर करावा असे पर्यावरणवादी म्हणतात. विज्ञान व त्यातून तयार होणारी शास्त्रीय निर्मिती दुधारी असल्याचे भान पर्यावरणवादी देतात.

६) २० व्या शतकात खाजगीकरण, जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेमुळे अनेक प्रकारच्या वस्तुंनी बाजारपेठा खचाखच भरल्या आहेत. प्रचंड निर्मिती क्षमता, गुणवत्तेचे सौम्य निकष, चंगळवादी लोकसंस्कृती, नफा व कमी श्रमात श्रीमंत होण्याची नवी स्पर्धा, नियंत्रणविरहित बाजारपेठा, तांत्रिक वस्तूंची प्रचंड गर्दी, व्यापारी संघटनांचे राजकारण व राजकीय पक्ष, नेते व शासनाची उदासिनता यातून दर्जाहिन बाजारपेठा अधिकाधिक शोषणावर उभ्या आहेत. पर्यावरणावर याचा परिणाम होत असल्याने सर्वच देशांनी आपल्या अर्थव्यवस्थेची निट बांधणी करणे गरजेचे आहे. त्यांना मुक्त व्यवहार करण्याची दिलेली संधी हरित क्रांतीला मारक आहे.

७) विकासाचा पहिला महत्वाचा अर्थ म्हणजे लोकांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणे. पाणी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, रस्ते या गरजा पूर्ण करताना नैसर्गिक संपत्ती व साठ्याचा कोशल्याने, काटकसरीने व गरजेपुरताच वापर करणे आवश्यक आहे. कारण अशी संपत्ती कशीही ओरबडून वापरली तर ही निसर्गसंपदा एक दिवस संपणार आहे. हे सामाजिक भान विकसीत करण्याचा प्रयत्न हरित क्रांती करते.

यासाठी हरित क्रांतीकारकांनी काही ठोस उपाय सांगितले आहेत. यात–

अ) मानवाने निसर्गाच्या व्यवस्थापनात शक्यतो हस्तक्षेप करु नये.

ब) पर्यावरण बिघडवणाऱ्या उत्पादनावर बंदी हवी.

क) हवा, पाणी, जंगल व जीवनसृष्टीला हानी पोहोचणाऱ्यावर कठोर कारवाई व्हावी.

ड) पर्यावरणाला पोषक विकास कार्यक्रम आखावेत.

इ) प्रदूषण करणारी वहाने, रासायनिक खते, कीटकनाशके यांचा वापर टाळावा.

ई) कोळसा खनिजतेल, वीज याऐवजी अपारंपारिक सौरऊर्जा, पवन ऊर्जा याचा वापर करावा.

प) अतिरेकी आधुनिकीकरण व कचरा निर्माण करणाऱ्या गोष्टीऐवजी साध्या संतुलीत जीवनशैलीचा स्वीकार करावा. वृक्षरोपन व वन्यजीव संरक्षणासारखे कार्यक्रम राबवावेत इत्यादी.

फ) लोकांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव जागृती करावी ती काळाची गरज आहे.

## ३.६ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

**प्रश्न १ : एका वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) आधुनिकीकरणाची दोन वैशिष्ट्ये सांगा.

ब) राजकीय परिवर्तनाचे प्रमुख दोन सिद्धांत कोणते?

क) माओच्या नवमार्क्सवादी सिद्धांतात कोणती क्रांती सांगितली?

ड) आर्थिक विकासाचा सिद्धांत कोणी मांडला?

इ) नववसाहतवाद म्हणजे काय?

ई) परावलंबनाचे सिद्धांत कोणी मांडले?

प) हरित क्रांती म्हणजे काय?

फ) पर्यावरणाच्या समतोलाची गरज काय?

र) अर्धविकसीत राष्ट्रांचे प्रश्न कोणते आहेत?

न) अतीरेकी विकासाने कोणते प्रश्न तयार केले?

**उत्तरे :**

अ) शास्त्रीयता, अनुभवजन्यता, विवेकवाद ही आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये आहेत.

ब) हेगेलचा आदर्शवादी व मार्क्सचा भौतिकवादी

क) सांस्कृतिक क्रांती/ कायम क्रांती माओने सांगितली

ड) रोस्टोचा आर्थिक विकास सिद्धांत

इ) बहुराष्ट्रीय कंपन्याद्वारे अर्धविकसीत राष्ट्रात व्यापार व राजकारण करणे

ई) परावलंबनाचे सिद्धांत ए. जी. फ्रँक, समीर अमीन व वॉलरस्टोनने मांडले

प) हरित क्रांती म्हणजे पर्यावरणाचे महत्व सांगणारी क्रांती

फ) पर्यावरण समतोल नसेल तर जीवसृष्टीच धोक्यात येईल

र) दारिद्र, दहशतवाद, बेरोजगारी, शिक्षण व आरोग्याचे प्रश्न

न) अतिरेकी विकासाने मानसाचे सुख समाधान नष्ट झाले

## ३.४ सारांश

समकालीन विकासाचे प्रश्न हा अतिशय महत्वाचा विषय असून यामध्ये राजकीय आधुनिकीकरण ही मध्यवर्ती संकल्पना आहे. प्रत्येक राष्ट्र आपला सातत्याने विकास करण्याचा प्रयत्न करते पण हा विकास व आधुनिकीकरण म्हणजे काय? याचा सखोल विचार करीत नाही. भौतिक तांत्रिक प्रगती व भरपूर उत्पादन क्षमता याला साधारणतः विकास मानले जाते. असा विकास खरा विकास आहे का? त्यासाठी राजकीय व्यवस्था स्वतःमध्ये कोणती व कशी परिवर्तने करवून घेतात? सर्वच राष्ट्रे विकसीत का नाहीत व त्यांच्या मर्यादा कोणत्या? याचा विचार आपण या प्रकरणात केला. विकास, स्पर्धा, भौतिकता, तंत्रज्ञान, अतिरिक्त उत्पादने या सर्वाचा आता निसर्ग व पर्यावरणाच्या संदर्भात विचार होऊ लागला आहे. कारण विकासाच्या नावाखाली मानवाने निसर्गावर आक्रण्ण केले आहे. त्यामुळे सध्या हरित क्रांती सांगणारे आधुनिकीकरणाला विज्ञानाला पाठिंबा देताना संतुलित विकास व पर्यावरणाच्या संरक्षणासह संयमीत विकास मान्य करतात.

## ३.५ पारिभाषिक शब्द

● **आधुनिकीकरण** : विशिष्ट सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी गतिमान व सर्वस्पर्शी सातत्याने चालू असलेली प्रक्रिया.

● **विकास** : समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात इच्छित किंवा अपेक्षित दिशेने परिवर्तन घडून येणे.

● **हरित क्रांती** : कृषी क्षेत्रात संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून अन्नधान्य उत्पादन वाढवून कृषीक्षेत्रात विकसित होण्याच्या धोरणाला हरित क्रांती म्हणतात.

## ३.६ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

**प्रश्न : योग्य पर्याय निवडा.**

१. फ्रेंच राज्यक्रांती .......... वर्षी झाली.

(अ) १९४७ (ब) १६८८ (क) १७८९ (ड) १९१७

२. ‘द ओल्ड रेजीम अँड द फ्रेंच रेव्ह्युलेशन’ हा ग्रंथ ....... यांनी लिहिला.

(अ) कार्ल मार्क्स (ब) एडमंड बर्क (क) ॲरिस्टॉटल (ड) टॉकविल

३. रोस्टो यांनी ........... विकासाचा सिद्धांत मांडला.

(अ) राजकीय (ब) सामाजिक (क) आर्थिक (ड) यापैकी नाही

४. इम्यानुअल वॅलेरस्टोन हा .......... चा अभ्यासक होता.

(अ) समाजशास्त्र (ब) इतिहास (क) राज्यशास्त्र (ड) अर्थशास्त्र

५. ‘अर्थ डे’ हा पहिल्यांदा ........... मध्ये साजरा झाला.

(अ) १९६० (ब) १९७० (क) २००० (ड) २०१०

**उत्तरे :** १. (क) १७८९ २. (ड) टॉकविल ३. (क) आर्थिक
४. (अ) समाजशास्त्र ५. (ब) १९७०

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

**प्रश्न : दीर्घोत्तरी प्रश्न**

१) आधुनिकीकरण म्हणजे काय? सविस्तर आढावा घ्या.

२) राजकीय परिवर्तन व विकास दृष्टिकोनावर भर टाकणाऱ्या हेगेल व मार्क्सच्या सिद्धांताचे मूल्यमापन करा.

३) आंतरराष्ट्रीय स्तरावरील परावलंबनाचे सिद्धांत व विकासावर निबंध लिहा.

४) विकसनशील व मागास राष्ट्रांच्या अर्धविकासाची कारणे सांगून त्यावरील उपाय सांगा.

५) हरित क्रांती म्हणजे काय? पर्यावरण व विकास यातील अनुबंध स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

१) Modern Political Theory - A Critical Survey – - S. P. Varma
Vikas Pub. House Pvt Ltd New Delhi (Ed. 1975)

२) राजनीतिशास्त्र परिचय – ओ. पी. गाबा– अनुवाद. प्रा. तुकाराम जाधव के. सागर पब्लीकेशन २०११

❑❑❑

## घटक – ४

# जागतिकीकरण आणि उदारीकरण

## ( Contempory Political Issues )

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ जागतिकीकरणाचे स्वरूप

४.२.२ जागतिकीकरण व उदारीकरणाचा राज्यावर परिणाम

४.२.२.१ जागतिकीकरण व उदारीकरणाचे राज्यावरील अनुकूल परिणाम

४.२.२.२ जागतिकीकरण व उदारीकरणाचे राज्यावरील दुष्परिणाम

४.३ जागतिकीकरण विरोधी नवे प्रवाह

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द

४.६ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

### ४.० उद्दिष्टे

- जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाचा अभ्यास करणे.
- जागतिकीकरणाच्या मुलभूत घटकांचा अभ्यास करणे.
- जागतिकीकरणाचा राज्यावरील परिणामांचा अभ्यास करणे.
- जागतिकीकरण व उदारीकरणाचे विविध पैलू, प्रवाह समजून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

२०व्या शतकाच्या शेवटच्या दशकामधील एक महत्त्वपूर्ण घडामोड म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभाव जगातील बहुतेक सर्वच राष्ट्रावर पडलेला आहे. १९८५ नंतर जगातील सर्व देशामध्ये उदारीकरण व जागतिकीकरण या नवीन संकल्पना उदयास आल्या. मात्र यापूर्वीच दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघ, गॅट, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) जागतिक बँक (IBRD किंवा World Bank) इत्यादी जागतिक संघटना स्थापन करण्यात आल्या होत्या. यांचा उद्देश जगातील सर्व देशानी कोणत्याही अडथळ्याशिवाय परस्पर देवाणघेवाण किंवा व्यवहार करावेत. यामधूनच जागतिकीकरणाला चालना मिळत गेली. जागतिकीकरणापासून आज कोणताही देश दूर राहू शकत नाही. जागतिकीकरणाचा प्रभाव जसा सर्व राष्ट्रांवर होत आहे तसेच सर्वसामान्य जनतेच्या जीवनावर सुद्धा होत आहे.

मुक्त अर्थव्यवस्था, भांडवलशाहीचा विस्तारीत अंमल, दळणवळण, संगणकयुग आणि विज्ञान तंत्रज्ञान या प्रमुख खांबावर जागतिकीकरण पाया उभा आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आणि अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल होत आहेत. भारतामध्ये १९९१ पासून जागतिककरण स्वीकारून गॅट करारावर व सही केली.

### जागतिकीकरणाची संकल्पना : अर्थ

जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूची किंवा घडामोडीची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया होय. जागतिकीकरण या संज्ञेचा उपयोग बहुतेक आर्थिक जागतिकीकरणाच्या संदर्भात केला जातो. त्यात व्यापार, थेट विदेशी गुंतवणूक, भांडवल प्रवाह, प्रवास आणि विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी खुले केले जाते.

आज जागतिकीकरण ही संकल्पना प्रामुख्याने आर्थिक व्यवहाराच्या किंवा मुक्त अर्थव्यवस्थेच्या संदर्भाने वापरली जाते.

'देशाची अर्थव्यवस्था खुली करून ती जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडण्याचा प्रयत्न करणे म्हणजे जागतिकीकरण होय.' आता एखाद्या देशाची अर्थव्यवस्था ही फक्त त्या देशापुरतीच मर्यादित राहिलेली नाही तर विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगातील सर्वच राष्ट्रे इतकी जवळ आलेली आहेत की एका देशाच्या अर्थव्यवस्थेचा इतर राष्ट्रावर परिणाम होत असतो. जागतिकीकरणामुळे सर्व जगाची अर्थव्यवस्था एकच बनली आहे असे आपणास म्हणता येईल.

## ४.२ विषय विवेचन

### जागतिकीकरणाच्या व्याख्या

जागतिकीकरणाच्या व्याख्या खालील प्रमुख विचारवंतांनी केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत :

१. जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रा-राष्ट्रांच्या राजकीय सीमा ओलांडून विस्तारीत झालेली आर्थिक क्रिया होय. अशी दीपक नय्यर यांनी व्याख्या केली आहे.

२. चार्लस् हिल यांचे मते, ''जागतिकीकरण म्हणजे अधिक एकात्मता आणि परस्परावलंबन या दिशेने जागतिक अर्थव्यवस्थेत झालेला बदल होय.''

३. बायलीस आणि स्मिथ यांचे मते, ''जगाच्या विविध भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध असणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.''

३. **जागतिक बँकेची व्याख्या** : ''उपभोग्य वस्तूंसह सर्व वस्तूंवरील आयात निर्बंध हळूहळू रद्द करणे, आयात करामध्ये कपात करणे आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे खाजगीकरण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.''

४. **जागतिक बँक** : ''उपभोग्य वस्तूंसह सर्वच वस्तूंवरील आयात निर्बंध हळूहळू रद्द करणे, आयात करामध्ये कपात करणे आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.''

५. **ब्रँको मिलानोव्हिक** : ''जागतिकीकरण म्हणजे वस्तू, भांडवल, तंत्रज्ञान, कल्पना आणि व्यक्तींची मुक्त देवाण-घेवाण होय. पण यातून जर व्यक्ती वगळला तर ते अर्धवट आणि शाश्वत नसलेला जागतिकीकरण होईल.''

६. **स्टिगलिड्स** : ''जागतिकीकरण म्हणजे जगातील व्यक्ती आणि देशांचे दळणवळण, संपर्क, वस्तू, सेवा, भांडवल आणि ज्ञान यांच्या देवाणघेवाणीतील कृत्रिम अडथळे दूर करून एकीकरण करणे होय.''

७. **जगदीश भगवती** : ''व्यापार FDI (निगम आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमार्फत) अल्पमुदतीचे भांडवल, कामगार आणि तंत्रज्ञान यामार्फत राष्ट्रीय अर्थव्यवस्थांचे जागतिक अर्थव्यवस्थेत एकीकरण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.''

वरील सर्व व्याख्यांचा आढावा घेतल्यानंतर जागतिकीकरण म्हणजे एखाद्या देशाची अर्थव्यवस्था जगाच्या अर्थव्यवस्थेशी संलग्न करणे किंवा एकरूप करणे होय. ही एक व्यापक आर्थिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये जागतिक अर्थव्यवस्थेचे एकात्मिकरण केले जाते. देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेला जोडून त्यानुसार आपल्या अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल केले जातात.

**जागतिकीकरणाचे प्रमुख घटक :**

**१. वस्तु व सेवांचा मुक्त प्रवाह** (Free flow of Goods and Service) : आंतरराष्ट्रीय, जागतिक व्यापारातील अडथळे कमी करून वस्तू व सेवांचा राष्ट्राच्या सीमेपलीकडे मुक्त प्रवाह साध्य करणे.

**२. भांडवलाचा मुक्त प्रवाह** (Free flow of Capital) : राष्ट्रांच्या सीमा ओलांडून उत्पादक भांडवलाचा आणि वित्तीय भांडवलाचा मुक्त प्रवाह होण्यासाठी राज्या-राज्यात वातावरण तयार करणे.

३. **तंत्रज्ञानाचा मुक्त प्रवाह** (Free flow of Technology) : राष्ट्राराष्ट्रांतर्गत तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीसाठी तसेच मुक्त प्रवाहासाठी वातावरण तयार करणे.

४. **श्रमाचा मुक्त प्रवाह** (Free flow of Labour) : जगातील विविध देशांदरम्यान श्रमांच्या किंवा कामगारांच्या तसेच कौशल्यांच्या मुक्त प्रवाहासाठी वातावरण तयार करणे.

अशा प्रकारे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेसाठी हे चार घटक अतिशय महत्त्वाचे आहेत. या चार घटकाद्वारे जगात जागतिकीकरणाची प्रक्रिया चालू आहे.

### ४.२.१ जागतिकीकरणाचे स्वरूप

जगातील इतर राष्ट्रांप्रमाणे भारतामध्येही शासकीय उत्पन्न व खर्च यांचा मेळ घालता आला नसल्यामुळे अर्थसंकल्पात सतत तूट येत होती. ती भरून काढण्यासाठी चलनवाढ करणे भारताला भाग पडले. परंतु चलनवाढीमुळे किंमती वाढल्या, त्यामुळे निर्यात कमी झाली मात्र आयात वाढली त्यातून परदेशी व्यापारामधील तूट भरून काढण्यासाठी परकीय बँका आणि नाणे निधी या आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थेकडून कर्ज काढणे भाग पडले हे जसे भारतात घडले तसे जगातील सर्वच विकसनशील व अविकसित देशामध्ये घडले आणि न कळत जागतिकीकरणाला सुरुवात झाले आणि त्यामुळे जागतिकीकरणाचे स्वरूप १९९१ पर्यंत कशाप्रकारचे होते आणि १९९१ नंतर कशाप्रकारचे होते याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

### १९९१ पूर्वी जागतिकीकरणाचे स्वरूप

१९९१ पूर्वी जगातील अनेक देशांनी जागतिकीकरण अप्रत्यक्षपणे स्वीकारायला सुरुवात केली होती. जगातील प्रगत राष्ट्राप्रमाणे प्रगतशील व अप्रगत अशा सर्व राष्ट्रांनी आपल्या अर्थसंकल्पातील सतत होत असलेली तूट भरून काढण्यासाठी चलन वाढ करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यामुळे निर्यात कमी झाली व आयात वाढत गेली. त्यामधून परदेशी व्यापारात आलेली तूट भरून काढण्यासाठी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी (World Bank and International Monitary Fund) यांच्याकडून कर्ज काढणे भाग पडले.

भारतानेसुद्धा १९८० मध्ये आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून ५०० कोटी डॉलर्सचे कर्ज घेतले. मात्र आंतरराष्ट्रीय नाणे निधीने या मदतीच्या बदल्यात ''शासकीय सार्वजनिक उद्योगधंद्याचे क्षेत्र कमी करून खाजगी भांडवलाला अधिक वाव द्यावा आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना द्यावी.'' अशी अपेक्षा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केली. त्यामुळे भारताने किंमतीवरील शासनाचे नियंत्रण कमी केले, आयातीवरील निर्बंधही कमी केले आणि सार्वजनिक किंवा सरकारी उद्योगधंद्याचे क्षेत्र कमी केले त्याचे अनुदान कपात केले आणि त्यातील गुंतवणूक कमी करून त्यांचे खाजगीकरण केले आणि निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन देवून व आर्थिक मदत केली.

१९८५ मध्ये भारत सरकारने जागतिक बँकेच्या दबावाखाली उत्पन्न व संपत्ती यावरील कराचे प्रमाण कमी केले. तसेच मक्तेदारी नियंत्रण कायदा लागू होण्यासाठी खाजगी उद्योगधंद्यांची भांडवलाची किमान मर्यादा

वाढवली. परकीय उद्योजकाच्या भांडवलाच्या आयातीवरील निर्बंध काढण्यात आले. वस्तूवर मूल्यवर्धीत कर बसविला. भारताने परकीय चलनाची गंगाजळी वाढविण्यासाठी आणि परकीय व्यापारातील तूट भरून काढण्यासाठी जागतिक बँकेकडून आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज मागितले. अशा प्रकारे १९९१ च्या अगोदर भारतामध्ये सुरुवातीच्या टप्प्यात जागतिकीकरणाचे स्वरूप होते.

**१९९१ नंतरचे जागतिकीकरणाचे स्वरूप**

भारताने १९९१ मध्ये आपल्या अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी जागतिक बँकेकडे आणि नाणेनिधीकंडे आर्थिक मदत मागितली. त्यावेळी जागतिक बँकेने जागतिकीकरण करण्याची, सार्वजनिक उद्योगधंद्यांचे खाजगीकरण करण्याची आणि आपली अर्थव्यवस्था परकीय भांडवलदारांना खुली करण्याची अट टाकली. त्यामुळे भारताने कच्चा माल आणि श्रम यांच्या किमती कमी करून उत्पादन खर्चात कपात करणे, त्यावरील शासकीय कर कमी करून परकीय बाजारपेठेसाठी वस्तूंना मुक्त करण्याचे प्रयत्न सुरू केले.

भारताने जागतिक बँकेने सुचविलेल्या सुधारणा मान्य कराव्यात यासाठी जागतिक बँकेचे तज्ञ भारतावर दबाब आणण्याचे प्रयत्न करीत होते. भारताने काही प्रमाणात समाजवादी अर्थव्यवस्थाही स्वीकारलेली असल्यामुळे काही मूलभूत उद्योगधंदे सरकारी मालकीचे होते. त्यामुळे जागतिकीकरणाच्या रेट्यात उद्योगधंद्यांची पुनर्रचना करून सर्वच उद्योगधंदे खाजगी मालकीची करताना या जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या धोरणाला संपूर्ण भारतभर कामगार संघटनांनी विरोध केला, आंदोलने केली. नंतर महाराष्ट्रात संपूर्ण महाराष्ट्रभर शेतकरी कामगार पक्षाने डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण (खाऊजा) या धोरणाविरुद्ध आंदोलने, मोर्चे निघाले. डॉ. एन. डी. पाटील यांनी 'एन्रॉन हटाव, सेझ हटाव, शेतकरी बचाव Special Economic Zone विरोधात हजारोंच्या संख्येने आंदोलने केली आणि सरकारने SEZ च्या नावाखाली खाजगी उद्योगपतींना स्वस्त दराने संपादन केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत केल्या. तसेच सध्या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला सुद्धा विरोध झालेला आहे. त्यामुळे संपूर्ण भारतभर कामगार, शेतकरी, छोटे व्यापारी, दलित इतर अनेक संघटनाचा जागतिकीकरणाला विरोध असल्यामुळे भारत सरकार कात्रीत सापडले होते.

एप्रिल १९९१ मध्ये कर्ज देणाऱ्या राष्ट्रांची बैठक जागतिक बँकेने घेतली. जोपर्यंत जागतिक बँकेने सुचविलेली जागतिकीकरणाची धोरणे भारत स्वीकारीत नाही तोपर्यंत भारताला कर्ज देऊ नका असे ठणकावून सांगितले. त्यामुळे भारताची विश्वासार्हता कमी झाल्याचे जाहीर झाले. त्यामुळे परदेशात असलेल्या भारतीयांनी घाबरून आपल्या ठेवी भारतीय बँकेतून काढल्या आणि परकीय बँकेत ठेवल्या. त्यामुळे भारताने आपल्या रिझर्व्ह बँकेकडील ६७ टन सोने विकून परकीय चलन मिळविले. परंतु ते पुरेसे झाले नाही. त्यामुळे शेवटी भारताने जागतिक बँकेला शरण जावून सर्व अटी मान्य केल्या आणि जागतिकीकरण स्वीकारले. भारताच्या या धोरणाला डाव्या पक्षाने, कामगार संघटनाने, शेतकरी कामगार पक्षाने व दलित संघटनाने फार कडवा विरोध केला. शेवटी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताला ३ लक्ष ३३ कोटी डॉलर्सचे कर्ज दिले आणि डॉलर्सच्या तुलनेत भारतीय

रुपयाचे २०% नी अवमूल्यन करावे असे लादले आणि वित्तीय व औद्योगिक क्षेत्रांच्या मूलभूत घडणीमध्ये बदल करण्यासाठी जी धोरणे (Structural Adjustement Programme) सुचविण्यात आली. त्यांची अंमलबजावणी जुलै १९९१ पासून मंजूर करण्यात आली.

जागतिक बँकेने भारतावर जागतिकीकरण स्वीकारण्यासाठी खालील शिफारशी केल्या. ह्या शिफारशी मान्य केल्याशिवाय भारताला कोणतीही आर्थिक मदत मिळणार नव्हती. त्या शिफारशी व अटी खालीलप्रमाणे होत्या.

१. आतापर्यंत शासकीय, सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेल्या बँका व म्युच्युअल फंड या क्षेत्रात खाजगी भांडवलाला परवानगी देणे.

२. प्रत्येक बँकेला आपल्याकडील एकूण भांडवलापैकी ४०% भाग सरकारी कर्ज रोख्यात घालावा लागतो ती मर्यादा कमी करणे म्हणजे खाजगी उद्योगांना या बँकेकडून अधिक कर्ज मिळेल.

३. शेतीसारख्या काही उद्योगाला कर्ज देताना व्याजाचा दर कमी असावा अशी अट होती, ती काढून टाकावी त्यामुळे बँकांना अधिकाधिक फायदा होईल व उद्योगांना अधिक भांडवल उपलब्ध होईल.

४. रोखे व गुंतवणुकीची इतर साधने यावरील कर कमी करून उद्योगांना अधिक उपलब्ध करून द्यावे.

५. गुंतवणूकदारांचे हित जोपासणे व भांडवल बाजाराचा विकास साधण्यासाठी त्यांच्यावरील देखभालीसाठी नवे नियम तयार करणे.

ह्या सर्व अटी व शिफारशी जागतिक बँकेने केल्या त्या भारत सरकारने सर्व स्वीकारल्या.

**भारतामध्ये जागतिक बँकेच्या शिफारशीनंतर जागतिकीकरणाचे स्वरूप**

जागतिक बँकेच्या शिफारशी मान्य करून भारत सरकारने आपल्या औद्योगिक धोरणामध्ये व अर्थव्यवस्थेमध्ये खालीलप्रमाणे बदल करून जागतिकीकरण स्वीकारले ते खालीलप्रमाणे :

१. शासनाकडून परवाना (License) घेण्याची पद्धत रद्द करण्यात आली आणि कोणत्याही उद्योजकांना कोणत्याही उद्योगधंद्यात प्रवेश करण्याची सर्वांना पूर्णपणे मोकळीक देण्यात आली.

२. एखाद्या उद्योगधंद्यातील मालमत्ता/मक्तेदारी एकाच उद्योगपतीच्या हाती एकवटू नये यासाठी मक्तेदारी नियंत्रण कायदा अस्तित्वात होता तो कायदा रद्द करण्यात आला.

३. परदेशी चलनविषयक कायद्यात बदल करून कोणत्याही कंपनीमध्ये ४९% पर्यंत गुंतवणूक करण्यास आणि कंपनीचे उत्पादन निर्यातीसाठी असल्यास त्या कंपनीमध्ये १००% गुंतवणूक करण्यास परदेशी भांडवलदारांना परवानगी मिळेल असे जाहीर केले.

४. शासकीय किंवा सार्वजनिक उद्योगधंद्यासाठी भांडवल गुंतवणुकीसाठी देशाच्या अंदाजपत्रकातून तरतूद करून मदत केली जात होती. ती बंद करण्यात आली. सरकारी किंवा सार्वजनिक उद्योगधंदे, कारखाने असतील त्यापैकी काही विकण्यात यावे आणि तोट्यात असणारे उद्योगधंदे बंद करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला.

५. आयात कर पूर्णपणे कमी करून आयातवाढीला प्रोत्साहन व परवानगी मिळाली.

६. भाववाढ टाळण्यासाठी पैशाच्या पुरवठ्यावर निर्बंध घालण्यात आले.

७. प्रत्यक्ष करामध्ये करमुक्तीच्या उत्पादनाच्या मर्यादेत वाढ करून करांचे दर कमी करण्यात आले. संपत्तीवरील कर रद्द झाला आणि भांडवलावरील नफ्यावर असणाऱ्या करात मोठी कपात करण्यात आली.

८. शासकीय अनुदाने कमी करण्यात आली. त्यामुळे इंधन, वाहतूक अशा सोयी स्वस्त दरात पुरविणे शासनाला अवघड होऊ लागले.

९. नजीकच्या काळात परकीय चलनाच्या बाजारात रुपयाची खरेदी-विक्री नियंत्रणापासून मुक्त करण्यात येईल व फक्त आयातीवरील कर ठेवून इतर सर्व निर्बंध काढून टाकण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले. अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण करण्यात येऊन परकीय भांडवलाला भारतामध्ये मुक्त प्रवेश मिळेल असेही भारताने जाहीर केले.

अशाप्रकारे जागतिकीकरणचे १९९१ पूर्वीचे स्वरूप, १९९१ नंतरचे स्वरूप आपल्याला सांगता येईल. थोडक्यात जागतिकीकरणाचे आर्थिक व राजकीय स्वरूप याला म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण जागतिकीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेची पुनर्रचना किंवा अर्थव्यवस्था खुली करणे, अर्थव्यवस्थेवरील भारत सरकारचे नियंत्रण कमी करणे, अर्थव्यवस्थेवरील भारत सरकारने नियंत्रण कमी करणे, सरकारी अनुदाने बंद करणे, सार्वजनिक उद्योगधंदे खाजगी भांडवलदारांना विकून आपले भांडवल काढून घेणे, सरकारी तोट्यातील उद्योगधंदे बंद करणे, सार्वजनिक उद्योगक्षेत्र कमी करून खाजगी भांडवलदारांना उद्योगधंदे खुले करणे, परकीय गुंतवणूकदारांना-गुंतणुकीसाठी प्रोत्साहन देणे, सवलती देणे, सरकारच्या वस्तूच्या किमतीवर निर्बंध उठविणे. खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू करणे. ही आर्थिक धोरणाच्या पुनर्रचनेचा भाग म्हणजे जागतिकीकरण असेही म्हणता येईल तर भारताला बाह्य परकीय मदतीसाठी उदारीकरण व खाजगीकरण स्वीकारल्याशिवाय कोणतीही आर्थिक व इतर व्यापारीक सहकार्य केले जाणार नाही असे आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँकेने ठणकावून सांगितले आणि भारत सरकारने राजकीय धोरणाच्या माध्यमातून अंतर्गत अनेक सुधारणा केल्या सामाजिक कल्याणाच्या योजनेला कात्री लावल्या. शेतीक्षेत्रात शेतकरी विरोधी धोरणे राबविली. कामगार विरोधी धोरणे राबविली अशाप्रकारे जागतिकीकरणाचे स्वरूप सांगता येईल.

### ४.२.२ जागतिकीकरण व उदारीकरणाचा राज्यावर परिणाम
(Impact of Globalisation and liberalization on State)

अलीकडच्या काळात म्हणजे १९९१ नंतर संपूर्ण जगभर जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या तीन बाबीवर चर्चा सुरू आहे. विकसित, विकसनशील व अविकसित देश एकत्र येत आहेत. नवीन अर्थव्यवस्थेशी आपल्या अर्थव्यवस्थेसोबत सांगड घालीत आहेत. यामुळे त्यांनी एक नव्या अभूतपूर्व गतिमान जागतिक बाजारी अर्थव्यवस्थेला जन्म दिला आहे. ही अर्थव्यवस्था जगाला समृद्धीच्या नवीन सहस्रकात घेऊन जाईल अशी अपेक्षा केली जात आहे. ''२१व्या शतकातील अर्थव्यवस्था'' या विषयावर अंक अमेरिकेतील

'बिझीनेस वीक' या नियतकालिकाने प्रकाशित केला. यात संपादकाने म्हटले आहे, ''क्रांतिकारी तंत्रज्ञान आणि जागतिकीरणाच्या वेगामुळे उत्पादनामध्ये भरीव वाढ होईल, यातून कमी चलनवाढ आणि मर्यादित रोजगाराबरोबरच वेगाने विकास होईल हा चमत्कार अनेक दशके अस्तित्वात राहील आणि यामुळे जगात अविश्वसनीय प्रगती होईल. तिसऱ्या जगामध्ये म्हणजे विकसनशील देशांनी १९८० च्या दशकामध्ये आपल्या अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाला सुरुवात केली. भारताचे अर्थमंत्री यशवंत सिन्हा म्हणाले की, जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण स्वीकारल्यामुळे अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल केला त्यामुळे एका दशकामध्ये भारत एक महासत्ता होऊ पहात आहे. त्यानंतर भारताचे तत्कालीन पंतप्रधान अमेरिका भेटीवर गेल्यानंतर तेथील काँग्रेससमोर म्हणाले, 'गेल्या दहा वर्षांपासून म्हणजे जागतिकीकरण, उदारीकरण धोरण स्वीकारल्यापासून आम्ही ६.५% दराने दरवर्षी प्रगती करीत आहोत. भारताच्या पुढील वाटचालीबद्दल ते म्हणाले, आगामी दशकामध्ये आम्ही ह्यापेक्षा जास्त प्रगती करू शकतो. आम्ही दरडोई उत्पन्न दुप्पट करू ह्यासाठी ९% विकासदर आवश्यक असला तरी भारत ते पूर्ण करेलच. ते भारताने केलेल्या आर्थिक सुधारणेमुळे शक्य होईल. यात शंका नाही. अमेरिकेचे अध्यक्ष क्लिंटन यांनीही भारताने जागतिकीकरण व उदारीकरणानंतर केलेल्या प्रगतीचे कौतुक केले. भारत भविष्यकाळात जागतिक शक्ती बनेल असेही ते म्हणाले.

जागतिकीकरण म्हणजे वेगळ्या प्रकारचे पुनर्वसाहतीकरण होय. साम्राज्यवादी शक्तीने (राष्ट्राने) तिसऱ्या जगातील नवोदित स्वतंत्र झालेल्या विकसनशील व गरीब राष्ट्रांना पुन्हा आर्थिक गुलामगिरीत ढकलणे यालाच जागतिकीकरण म्हणतात किंवा नववसाहतवादी असेही म्हणतात. जागतिकीकरणाच्या उदारीकरणाच्या नावाखाली पश्चिमेकडील पाश्चात्य विकसित राष्ट्रे मुक्त बाजारव्यवस्था आणि मुक्त व्यापाराच्या नावाखाली त्यांच्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणि बँका तिसऱ्या जगातील विकसनशील राष्ट्रांची आर्थिक लूट करण्यासाठी अर्थव्यवस्थेत प्रवेश व हस्तक्षेप करीत आहेत. विकसनशील राष्ट्रे स्वच्छेने किंवा जागतिक बँकेच्या मदतीच्या आमीषापोटी उदारीकरण व जागतिककरण स्वीकारत आहेत, आपल्या अर्थव्यवस्थेचा ताबा विकसित राष्ट्राकडे देत आहेत. साम्राज्यवादी राष्ट्रे विकसनशील देशाची आर्थिक लूट करून त्यातील काही हिस्सा तेथील राज्यकर्त्यांना खुश करण्यासाठी देत आहेत.

### ४.२.२.१ जागतिकीकरण व उदारीकरणाचा राज्यावर अनुकूल परिणाम

जागतिकीकरण व उदारीकरण गरीब विकसनशील देशांनी स्वीकारल्यामुळे त्या-त्या देशात चांगल्या परिणामांपेक्षा वाईट परिणाम जास्त झाले आहेत. यांचा परिणाम त्या देशातील गरीब, वंचित, दलित, मुस्लीम, शेतकरी, कामगार, छोटे व्यापारी, छोटे कारागीर, स्त्रिया, लहान मुले, वृद्ध, नोकरदार यांच्यावरही फार मोठा परिणाम झालेला आहे. जागतिकीकरणामुळे देशातील सामान्य उंचावलेले जीवनमान खूप खालावले. विकासदरही कमी झाला. भूकबळीची, कुपोषणाची संख्या वाढतच गेली. विविध परकीय बहुराष्ट्रीय कंपन्या आल्यामुळे स्थानिक कंपन्या, कारखाने बंद पडलेले दिसून येतात. सरकारला मोठे कमिशन मिळत असल्यामुळे मोठमोठ्या परकीय कंपन्यांचे जाळे पसरत आहे. SEZ सेझच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी सरकारने डोळे झाकून द्यायला सुरुवात केली. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यातील गुंतवणूक भांडवल काढून

खाजगी भांडवलदारांचे भांडवल गुंतविण्याची संधी देऊन सार्वजनिक, सरकारी उद्योगधंद्याचे खाजगीकरण केले.

जागतिकीकरण व उदारीकरणाचे राज्यावरील परिणामाचा विचार केल्यास भारताच्या आधीच तिसऱ्या जगातील इतर देशांनी जागतिकीकरणाचा स्वीकार केला होता. त्यामुळे भारतासहीत तिसऱ्या जगातील राज्यावर कोणते परिणाम झालेले आहेत, कोणकोणत्या क्षेत्रावर काय परिणाम झाले आहेत, प्रतिकूल की अनुकूल परिणाम झाले याविषयी सविस्तर अभ्यास करणे अतिशय आवश्यक आहे. जागतिकीकरण उदारीकरणाचे राज्यावर खालीलप्रमाणे परिणाम झालेले आहेत.

**१. निर्यातीमध्ये वाढ झाली** : भारतासहीत तिसऱ्या जगातील देशाचा औद्योगिक विकास कमकुवत असल्यामुळे त्यांच्या निर्यातीमध्ये अन्न-धान्य, इंधन, खनिजे व इतर कच्च्या मालाचा समावेश होता. १९९७ मध्ये मध्यपूर्व देश आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका (मॅक्सिको सोडून) मधील व्यापारामधील २/३ पेक्षा जास्त वाटा प्रथमिक उत्पादनांचा तर ९१ विकसनशील देशाच्या सर्वेक्षणानुसार ६७ देशांच्या नियातीमध्ये ५०% पेक्षा जास्त वाटा होता. त्यामध्ये प्राथमिक उत्पादनाचा वाटाही (प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ धरून) होता. भारताची देखील हीच परिस्थिती आहे. भारताने प्रामुख्याने प्राथमिक उत्पादने (चहा, कोळंबी, कापूस, खनिजे, चामडे, अन्नधान्य इ. तसेच कपडे हस्तउद्योगातील वस्तू, चामड्याच्या वस्तू व पैलू पाडलेले हिरे यांचाच निर्यातीमध्ये समावेश आहे. जागतिक बँकेने या सर्व देशांना (कर्जबाजारी) ठराविक वस्तूंच्या निर्यात वाढीचा सल्ला दिला. त्यामुळे सर्व विकसनशील देशांनी प्राथमिक उत्पादनाच्या वस्तूच्या निर्यातीवर भर दिला आणि जागतिकीकरणामुळे निर्यातीला संधी मिळाली आणि निर्यातीमध्ये वाढ झाली. त्यामुळे परकीय चलन देशांना मिळाले, आपल्या वस्तू जगाच्या बाजारपेठेत विकण्यास संधी मिळाली.

**२. परकीय गुंतवणूकीला आमंत्रण** : FDI

जागतिकीकरण व उदारीकरणानंतर आंतरराष्ट्रीय अर्थतज्ञ व आर्थिक विचारवंताच्या मतानुसार भारताने कर्जबाजारीतून सुटण्यासाठी आपल्या देशाची अर्थव्यवस्था खुली करून (FDI) परकीय गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले पाहिजेत. त्यामुळे उत्पादनात विविधता येईल. निर्यातीची व्याप्ती वाढेल, ज्यामध्ये औद्योगिक उत्पादनाचाही समावेश असेल. भारताने ही भूमिका २४ जुलै १९९१ च्या औद्योगिक धोरणविषयक भूमिका निवेदनामध्ये घेतली होती. भारतामध्ये जवळजवळ आजपर्यंत अनेक मोठमोठ्या उद्योगधंद्यात परकीय गुंतवणूक FDI झालेली आहे. आज तर भारतीय रेल, विमान सेवा सहीत सर्व (सर्व्हिस सेक्टर सेवा क्षेत्रातही परकीय गुंतवणूक केली जात आहे. त्यामुळे त्यांचे भारतावर चांगले परिणाम भविष्यात दिसून येतील अशी अपेक्षा करूया.

**३. शेती क्षेत्रावर परिणाम** : जागतिकीकरणाचा शेतीक्षेत्रावर सुद्धा परिणाम झाला असून शेती क्षेत्रातील उत्पादित अन्नधान्य, भाजीपाला, आंबा, केळी, सफरचंद, डाळींब, द्राक्षे, संत्री इत्यादी सहीत भारतातील फळे औषधी वनस्पती इत्यादीचे पेटंट मिळाले आणि आपल्या शेतीतील माल प्रक्रिया करून निर्यात करून उत्पन्न मिळाले. तसेच तांदूळ, ज्वारी, बाजरी, नाचणी, डाळी व जनावरांचे मांस-मासे इत्यादीही निर्यात झाल्यामुळे

भारताची अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत झाली. शेतातील किंवा शेती जोड धंद्यातील तसेच जगातील वेगवेगळ्या विकसित देशातील शेतीमध्ये उत्पादीत मालाची, प्रक्रियेची माहिती भारतीय शेतकऱ्यांना मिळाली. त्यामुळे अत्याधुनिक शेती शेतकरी करू लागले. यंत्रसामुग्रीही आली व भारतामध्ये यांत्रिक शेती करण्यास सुरुवात झाली.

**४. कामगारावर परिणाम** : जागतिकीकरणामुळे कामगारांना परदेशी कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी मिळाली. आपले उद्योगधंदे व्यवसायाचे जागतिकीकरण झाले. जागतिकीकरणामुळे कंपन्यांना प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक प्रशिक्षण मिळाले. आजही IAS, IPS, IFS व इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी परदेशातील कंपन्यांमध्ये, परदेशातील प्रशासकीय विभागामध्ये अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करून आपल्या भारतातील कंपन्यांमध्ये किंवा प्रशासनामध्ये खूप चांगल्या प्रकारे कार्य करीत आहेत. प्रशासकीय सुधारणा होत आहेत.

याशिवाय विविध देशांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. अशा प्रकारे जागतिकीकरणाचे चांगले परिणाम झालेले आहेत. मात्र आज जागतिकीकरण व खाजगीकरण, उदारीकरणाचे राज्यावर, आपल्या देशावर जास्त दुष्परिणामच झालेले आहेत.

### ४.२.२.२ जागतिकीकरण व उदारीकरणाचे राज्यावरील दुष्परिणाम

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील वेगवेगळ्या देशातील चलनाचे दर स्थिर रहावेत, ज्यांना आवश्यकता असेल त्यांना आर्थिक पुनऊभारणी व विकास यासाठी कर्ज मिळावे या दृष्टीने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेची स्थापना १९४४ साली करण्यात आली. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियम ठरविण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना' स्थापन करण्यात यावी अशी अनेक विकसनशील देशाची मागणी होती. मात्र विकसित राष्ट्रांनी ती अमान्य केली. मात्र आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेऐवजी प्रशुल्क व व्यापार याबाबत GATT करार करण्याचा विकसित राष्ट्राने आग्रह धरला. आर्थर डंकेल यांनी General Agrement on Trade and Tariff (GATT) करार तयार केला.

भारताने खुल्या अर्थव्यवस्थेच्या धोरणानुसार GATT करारावर सही केली.

**१. शेती क्षेत्रावरील परिणाम**

सार्वजनिक गुंतवणुकीतील कपात जागतिकीकरण व उदारीकरणानंतर शेती क्षेत्रात जास्त केलेली आहे भारतामध्ये आर्थिक सुधारणा चालू झाल्यापासून प्रत्येक अर्थसंकल्पामध्ये शेती, जलसिंचन, शेती जोडधंदे, ग्रामीण विकास, रासायनिक खते व बियाणे यांच्यावरील अनुदाने या सर्व बाबींवरील GDP च्या प्रमाणातील एकूण खर्चात (योजनांतर्गत आणि योजनाबाह्य खर्चात) सातत्याने घट होत आहे. १९८९-९० मध्ये १.९९% वरून १९९६-९७ मध्ये १.४५% वर घसरले तर १९९७-९८ च्या अर्थसंकल्पामध्ये हे प्रमाण १.२९% इतके कमी झाले होते. जगभरात शेती क्षेत्रातील गुंतवणुकीवरील परताव्याचा दर हा उद्योगातील गुंतवणुकीपेक्षा खूपच कमी आहे. याउलट शेती उत्पादकता खूपच जास्त असणाऱ्या प्रगत देशामध्येसुद्धा सरकार शेतीक्षेत्रात हजारो कोटी डॉलर्सची गुंतवणूक करीत असल्यानेच शेती, शेतीक्षेत्र व शेतीव्यवसाय टिकून आहे.

भारतासारख्या देशात अर्थव्यवस्थेमध्ये शेतकऱ्यांनी जलसिंचन, धान्यसाठा आणि वाहतुकीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी हे आता जागतिकीकरणानंतर अतिशय वेडेपणाचे म्हणावे लागेल. एवढेच नव्हे तर शेतीचा कस दिवसेंदिवस कमी होत आहे. शेतीतील उत्पन्न कमी-कमी होत आहे. शेतीसाठी जलसिंचनाची सुविधा अपुरी आह. पावसाचे प्रमाण कमी होत असल्यामुळे शेतीची, जमिनीची धूप होत आहे. अवेळी पाऊस पडत आहे. रासायनिक खताच्या, सुधारीत बी-बियाणे यांच्या वाढत्या किमती, दुष्काळी परिस्थिती त्यामुळे शेतकऱ्यांना न परवडणारी शेती यामुळेच शेतकरी कर्जबाजारी होत आहे. तसेच शेतमालाचे पडते दर, परदेशी मालाची आयात त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करण्याची वेळ त्यांच्यावर येत आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांना सबसिडी अनुदाने बंद केले. जागतिकीकरणामुळे सर्व सवलती बंद केल्यामुळे शेती क्षेत्रावर खूप मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेले आहेत.

'जागतिक बँकेने १९९१ च्या 'भारत देशाची आर्थिक निवेदन पत्रिकेत म्हटले आहे की, खतावरील अनुदाने पूर्णपणे बंद करावीत, यात पुढे म्हटले आहे की, पहिली दोन वर्षे शेती खताच्या किमतीत वार्षिक ३०% दरवाढ करण्यात यावी, आणि चौथ्या वर्षापर्यंत ही वाढ २०% वर आणावी आणि भारतातील अकार्यक्षम खतनिर्मिती कारखाने बंद करावेत.'' यामुळे प्रचंड प्रमाणात खताचे दर वाढले. हा शेती क्षेत्रावर परिणाम झालेला आहे. त्यामुळे शेतीक्षेत्र आज संकटात आले आहे. याला जागतिकीकरण जबाबदार आहे.

**सामाजिक कल्याणाच्या योजनेवरील परिणाम**

जागतिकीकरणानंतर राजकोषीय तूट कमी करण्याच्या नावाखाली सरकारी खर्चात, सार्वजनिक कामातील खर्चात मोठ्या प्रमाणात कपात होत असलेला एक विभाग म्हणजे गरिबांना अन्न, शिक्षण, अरोग्य, वीज आणि पाणी यासारख्या गरजेच्या गोष्टी स्वस्त आणि परडणाऱ्या किंमतीत मिळाव्यात यासाठी सरकारकडून देण्यात येणारी अनुदाने. जागतिकीकरणानंतर भांडवलदार, भांडवली राज्यकर्ते सर्व जगातील सर्व देशात आपल्याला नफा मिळाला पाहिजे यासाठी ''गरिबांना देण्यात येणाऱ्या सवलती बंद करा, त्यांची अनुदाने बंद करा, त्यांच्यावर कर वाढवा आणि श्रीमंतांना, उद्योगपती, भांडवलदार, कारखानदारांना सवलती द्या, त्यांना अनुदाने द्या, त्यांचे कर्ज माफ करा, त्यांच्याकडून घेतलेल्या कर्जावर त्यांना जास्त व्याज द्या, अशाप्रकारचे धोरण राबवित आहेत. त्यामुळे भारतातील दलित, वंचित, बहुजन, भटके, आदिवासी, छोटे शेतकरी, छोटे व्यापारी यांच्यावर जागतिकीकरणाचा परिणाम मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. सरकारने या सामान्य गरीब लोकांसाठी कोणतीही अनुदाने देऊ नयेत. सार्वजनिक योजनेतील खर्चात काटकसर करून अनुदानात कपात करावी असे जागतिक बँकेने सांगितलेले आहे. त्याशिवाय कोणत्याही देशाला कर्ज मिळणार नाही. त्यामुळे जागतिकीकरणाचा परिणाम या गरीब अनुसूचित जाती, अनसूचित जमाती, भटक्या जाती व जमाती व वंचित समुदाय यांच्यासाठी असलेल्या विकास योजनेसाठी असलेल्या अनुदानावर झालेला आहे.

आज भारत सरकार जनतेसाठी, मागासवर्गीयांसाठी किंवा अल्पसंख्यांक समुदायासाठी अनुदानावर खूप कमी खर्च करीत आहे. आज २० कोटी लोकांना शुद्ध पिण्याचे पाणी, २५ कोटी लोकांना आरोग्य सुविधाही मिळत नाहीत. ४० कोटी लोक निरक्षर आहेत, ७० कोटी लोकांपर्यंत मूलभूत स्वच्छतेची व्यवस्था पोहोचलेली

नाही ही धक्कादायक आकडेवारी जागतिक बँकेने दिलेली आहे. सरकार गरीब, मागासवर्गीय लोकांसाठी असलेल्या सर्व क्षेत्रामध्ये अजूनही कपात करीत आहे हे आजही राज्याच्या व भारताच्या अर्थसंकल्पातील समाजकल्याणासाठी असलेल्या अनुदानाचा व तरतुदीचा अभ्यास केल्यास समजेल.

**शिक्षणक्षेत्रातील अनुदान कपात**

भारतामध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच प्रस्थापित, भांडवलदार व जमीनदार लोक राज्यकर्ते बनले. त्यामुळे ते सत्ताधारी स्वार्थी, आत्मकेंद्री, दूरदर्शी नसलेले होते. त्यांनी नेहमी राजकारणात मोठमोठी आश्वासने दिली, विकासाचे स्वप्न दाखविले, समाजवादाच्या गप्पा मारल्या. परंतु प्रत्यक्षात त्यांनी अनु. जाती-जमाती, भटक्या जाती-जमाती व इतर मागास जाती व अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी प्रामाणिकपणे आजपर्यंत प्रयत्न केलेला नाही. म्हणजेच जागतिकीकरणापूर्वीही या सर्व लोकांच्या कल्याणासाठी, त्यांच्या शिक्षणासाठी अनुदान खर्च कमीच होता. त्यामुळे १९९१ नंतर आर्थिक सुधारणा केल्यानंतर जागतिक बँकेच्या शिफारशीनुसार सार्वजनिक व कल्याणकारी योजनेवरील खर्चात आणखी कपात केली. त्यामुळे भारतासहीत विकसनशील राष्ट्रातील सार्वजनिक सेवा ढासळली. मात्र सरकार या लोकांसाठी, जनतेसाठी शिक्षणावरील खर्चात वाढ करायला तयार नाही. तर उलट शिक्षणावरील खर्चात मोठ्या प्रमाणात कपात केली आहे.

भारत हे शैक्षणिक क्षेत्रातही मागास राष्ट्र आहे. भारतात निरक्षरतेचे प्रमाण आजही जगात सर्वात जास्त आहे. आजही दलित, आदिवासी, भटक्या जाती-जमातीमधील ६ ते १० वर्षे वयाचे १/३ बालके शिक्षणापासून वंचित आहेत, शालाबाह्य आहेत. शाळांमध्ये गरिबीमुळे मागासलेल्या जाती-जमातीच्या लहान मुलांचे गळतीचे प्रमाण जास्त आहे.

भारत सरकारच्या मानव संसाधन मंत्रालयानुसार 'प्राथमिक शाळेत पहिलीत प्रवेश घेणाऱ्या १०० मुलांपैकी ४२ मुले आठवीपर्यंत जातात. आज उच्च शिक्षणापर्यंत २% मुलेच पोहोचतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (National Policy of Education) सरकारने GDP च्या किमान ६% खर्च शिक्षणावर केला पाहिजे. परंतु १९९२ मध्ये ३.६% तर १९९६-९७ मध्ये ३.४% तर आजही ३% च्या वर खर्च सरकार करीत नाही. आज तर सरकारने शाळा, कॉलेज, वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यावसायिक कॉलेज मागेल त्या धनवान श्रीमंतांना, उद्योगपतींना, राज्यकर्त्यांना विनाअनुदानावर देण्यास सुरुवात केली तर २००० नंतर कायमस्वरुपी विनाअनुदानीत तत्त्वावर शिक्षण संस्था वाटण्यात आल्या आहेत. आणि यापुढेही आता खाजगी, अर्थसहाय्यीत (Self Financial) शाळा, कॉलेज, खाजगी विद्यापीठ, इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचे कट कारस्थान केले जात आहे. त्यामुळे आपोआपच या सर्व शाळेत, कॉलेजमध्ये, विद्यापीठात हजारो, लाखो रुपये फी आकारली जात आहे. त्यामुळे दलित, गरीब, अल्पसंख्यांक व भटक्या जाती-जमातीच्या मुलांना शिक्षण घेणे अवघड झालेले आहे. आज जागतिकीकरणामुळे सरकारने विनाअनुदान तत्त्व स्वीकारल्याने शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे, शिक्षण देणे पालकांचे कर्तव्य आहे असे सांगून शिक्षण खाजगी केलेले आहेत. हा फार मोठा जागतिकीकरणाचा परिणाम शिक्षणावर झालेला आहे. याशिवाय परदेशी विद्यापीठाला मान्यता देऊन शिक्षणाचे

जागतिकीकरण खाजगीकरण करण्याचे कटकारस्थान केले आहे. आज तर पैसे देऊन ऑनलाईन कोर्सेस केले जात आहेत. त्यामुळे ''ज्यांच्याकडे पैसे त्यांनाच शिक्षण' असेच म्हणावे लागेल.

आज सार्वजनिक सेवेतील कायमस्वरूपी कामगार कमी करून हंगामी, कंत्राटी, कामगारांची संख्या वाढत आहेत. कारखान्यातून वस्तूचे भाग तयार होते. परंतु जागतिकीकरणामुळे परदेशातून स्वस्तात ते आयात होत असल्यामुळे कामगारांना कामावरून कमी केले जात आहे. आज कामगार संघटनांना संप करण्याचा अधिकार नाकारला जात आहे. कामगार युनियन्सची मान्यता काढून घेतली जात आहे. यामुळे कामगारांच्या न्याय्य हक्कावर परिणाम झालेला आहे. जागतिकीकरणामुळे अत्याधुनिक कारखाने, साधनसामुग्री व तंत्रज्ञान आल्यामुळे कामगार कपात मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे कामगार बेकार झालेले आहेत. तर सावृजनिक/सरकारी सेवेत कर्मचाऱ्यांना २००५ पासून पेन्शनसुद्धा बंद केली आहे.

अशाप्रकारे जागतिकीकरण व उदारीकरणाचे दूरगामी परिणाम राज्यावर होत आहेत.

**दलित व आदिवासी यांचेवर परिणाम**

भारतामध्ये हिंदू समाजव्यवस्थेने गेल्या हजारो वर्षे अस्पृश्य मानलेल्या जातीच्या लोकांना कोणतेही अधिकार दिलेले नव्हते, या लोकांचा स्पर्शही होऊ देत नव्हते रोटी-बेटी व्यवहार सुद्धा होत नव्हते. या अस्पृश्य जाती गावकुसाबाहेर होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या अस्पृश्य जातींना जागृत केले, त्यांचे प्रबोधन करून न्यायहक्कासाठी लढाई करण्यास प्रवृत्त केले. आणि भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून अस्पृश्यता नष्ट करून कलम १७ नुसार अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे त्यासंबंधी शिक्षेची तरतूद केली. आणि शासकीय क्षेत्रात अनुसूचित जातीसाठी व अनुसूचित जमातीसाठी राखीव जागाची तरतूद करण्यात आली. शासकीय महामंडळे, उद्योगधंदे व महामंडळे यांच्यामध्ये आरक्षण असल्यामुळे अनु. जाती व जमाती (पूर्वाश्रमीचे अस्पृश्य) यांना नोकरीची संधी मिळाली आणि कुठेतरी नुकतीच त्यांना आपल्या विकासाची संधी मिळाली केवळ २% लोकांपर्यंत फायदा पोहोचतो तोपर्यंत जागतिकीकरण व खाजगीकरण व उदारीकरण स्वीकारले.

**कामगारांवर परिणाम**

आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेने १९९८-९९ साली जागतिक रोजगारीबद्दल जो अहवाल प्रसिद्ध केला (World Employment Report 1998) नुसार ३०० कोटी कामगारांपैकी १४ कोटी कामगार बेकार होते आणि ७५ ते ९० कोटी कामगार अर्धवेळ काम करणारे होते. मात्र पुढील वर्षात एक कोटीने बेकारीत वाढ होईल असे भाकीत केले होते. मात्र पुढील दोन वर्षामध्ये जगातील परिस्थिती फारशी सुधारली असे नाही.

जागतिकीकरणाचे समर्थन करणारी जी प्रगत राष्ट्रे होती त्यांच्या मते मुक्त बाजारपेठेत काही उद्योगधंद्यात परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर होईल व रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, नवीन कौशल्य, ज्ञान संपादीत केली जातील, त्यामुळे गुंतवणुकीमुळे रोजगार व नोकऱ्याची संधी उपलब्ध होईल. परंतु जागतिकीकरण व उदारीकरणांमुळे सार्वजनिक उद्योगधंद्यातील गुंतवणूक कमी केली. काही सार्वजनिक कारखाने, उद्योग विकले गेले. त्याचे खाजगीकरण केले. त्यामुळे भारतामध्ये १५० सार्वजनिक उद्योगातील एक लाखाहून अधिक कामगार

बेकार झाले. तर आज हजारो कामगारांवर उपासमारीची व बेकारीची वेळ येत आहे. तसेच परकीय उत्पादनांशी चालू असलेल्या स्पर्धेत टिकून रहावयाचे असेल तर आपल्या वस्तूची गुणवत्ता वाढवावी लागते व तिचा उत्पादन खर्च कमी करावा लागतो. या दोन्ही बाबीचा कामगारावर परिणाम होतो.

जागतिकीकरणामुळे सार्वजनिक उद्योगधंदे विकल्यामुळे आणि गुंतवणूक काढून घेतल्यामुळे खाजगी मालकीचे उद्योग व व्यवसाय, महामंडळे झालेली आहेत. त्यामुळे कामगाराला सेवेची शाश्वती राहिली नाही. वेतनभत्ते, सेवा शर्ती, सेवानिवृत्ती, पेन्शन या कोणत्याही बाबी खाजगी क्षेत्रातील कामगारांना दिल्या जात नाहीत. खाजगी व्यवस्थापनामध्ये नोकरीची कोणतीही शाश्वती नाही त्यामुळे जागतिकीकरणाचा मोठा परिणाम कामगारांच्या धोरणावर झालेला असून अप्रत्यक्ष कामगारांवर झालेला आहे.

जागतिकीकरण व उदारीकरणानंतर शासकीय उद्योगधंद्यांचे खाजगीकरण सुरू झाले त्यामुळे खाजगी व्यवस्थापनात खाजगी कारखाने, कंपन्यांमध्ये अनुसूचित जाती-जमातीसाठी राखीव ठेवलेल्या जागा कमी झाल्या, यामध्ये कोणत्याही आरक्षणाची तरतूद नसल्यामुळे दलित समाजातील अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागास जाती, भटक्या जाती-जमातीच्या प्रवर्गासातील हजारो सुशिक्षित युवक बेरोजगार झाले आणि जागतिकीकरणामुळे मालाच्या किमती वाढल्या, अन्नधान्याच्या किमतीही गगनाला भिडल्या. त्यामुळे दलित आदिवासी व ओबीसीच्या लोकांचे राहणीमान घसरले आणि सकस, समतोल, पुरेसा आहार न मिळाल्याने कुपोषणाची समस्या निर्माण झाली.

भारत सरकारने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी अल्पसंख्यांक या लोकांसाठी असलेली अर्थसंकल्पातील खर्चाची तरतूद खूपच कमी केली. सामाजिक न्याय व कल्याण खात्याच्या सर्व योजनाला कात्री लावली आणि त्यामुळे कुठेतरी आरक्षणामुळे या समाजाला इतर समाजाबरोबर आणण्याचा प्रयत्न सुरू होतो तो जागतिकीकरणामुळे पूर्णपणे नाहीसा झाला आणि आता दलितांचे लाखो युवक बेरोजगार झालेले आहेत. त्यांच्या हाताला काम नसल्यामुळे ते अर्धउपाशी व कुपोषित झालेले आहेत. आज दलित समाजाकडे जमिनी, उद्योगधंदे, बँका, दूधसंघ, कारखाने, शाळा-कॉलेज नाहीत. त्यामुळे ते मजुरी करून जीवन जगत आहेत. आदिवासी लोक जंगलात राहत होती त्यांच्यापर्यंत कोणतेही आधुनिकीकरण पोहोचलेले नाही. परंतु जागतिकरण व उदारीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या, कार्पोरेट सेक्टर आज जंगले ताब्यात घेत आहेत. आदिवासी वाऱ्यावर पडले आहेत. ते या विरोधात आंदोलने करीत आहेत तेव्हा सरकार त्यांना नक्षलवादी ठरवून त्यांना ठार करीत आहेत. खरेतर त्यांची सरकारच्या विरोधात न्याय हक्काची लढाई आहे. आमची जंगले सुरक्षित ठेवा, जंगलतोड करू नका, जंगल तोडून जमिनीवर प्रकल्प, बहुराष्ट्रीय कंपन्या उभ्या करू नका. या मागणीसाठी ते सरकारविरोध संघर्ष करीत आहेत. परंतु सरकारला जंगले ताब्यात घ्यायचे आहेत आणि श्रीमंत उद्योगपती, भांडवलदार, परकीय गुंतवणूकदारांच्या घशात घालायची आहेत म्हणजे जंगले या लोकांना विकायची आहेत आणि आदिवासींना बेघर, बेरोजगार करायचे आहेत. खरेतर आदिवासी लोक आपली उपजिवीका या जंगलावर, जंगलातील फळे-फुले, बिया, कंदमुळे, मध जमा करून पोट भरतात. परंतु जागतिकीकरणामुळे आज त्यांच्यावर मोठा परिणाम होत आहे. आज त्यांच्यावर उपाशी राहण्याची पाळी आली आहे.

**पर्यावरणावर परिणाम**

जागतिकीकरणामुळे विकासाचे जे प्रारूप जगाने स्वीकारले त्यामुळे पर्यावरणावर त्याचे दुष्परिणाम होणार हे विकसित राष्ट्रासहीत सर्व राष्ट्रांनाही माहीत होते. शासनाने जंगले ताब्यात घेतली, नद्या, डोंगर, घाट ताब्यात घेतले आणि तेथे बहुराष्ट्रीय कंपन्यानी मोठमोठे प्रकल्प, कारखाने उभे केले. यामुळे त्या ठिकाणी असलेले प्राणी, पक्षी, झाडे, औषधी वनस्पती व वन्यजीव यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यामुळे निसर्गातील जैव विविधता नष्ट झाली. पूर्वी जंगलावर आसपासच्या लोकांची उपजीविका भागत असे आज त्या लोकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. आज मोठे प्रकल्प उभारल्यामुळे आणि बेसुमार वृक्षतोड केल्यामुळे आज प्रदुषणाची समस्या उभी राहिली आहे. आज जगातील पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे आणि त्यामुळे जगातील तापमान वाढ (Global Warming) ही समस्या उभी राहिलेली आहे. आज शुद्ध ऑक्सिजनसुद्धा पुरेसा मिळणे अवघड झालेले आहे. मोठमोठ्या शहरांमध्ये सकाळी प्रदुषणाचा, कार्बन-डाय-ऑक्साईड थरच्या थर उभे राहून धुक्याप्रमाणे दिसत आहेत. दिल्ली शहरामध्ये व मुंबईसह पुणे, औरंगाबाद, नागपूर या शहरांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात हवेतील प्रदुषणाची समस्या उभी राहिली आहे. अशा प्रकारे जागतिकीकरणामुळे पर्यावरणाची हानी होत असून आता ''वृक्ष लावा - पर्यावरण वाचवा'' ही मोहीम जगभर सुरू झालेली आहे.

अशाप्रकारे जागतिकीकरण व उदारीकरण भारताने स्वीकारल्यानंतर त्याचे फार दूरगामी परिणाम भारतावर व भारतीयांवर होत आहेत. मग ते शेतीक्षेत्र असो, उद्योगक्षेत्र असो, कामगारवर्ग असो, शिक्षणक्षेत्र असो, सामाजिक कल्याणाच्या योजनेवर असो किंवा पर्यावरणावर खूप मोठ्या प्रमाणात परिणाम झालेले आहेत. पर्यावरणावर खूप गंभीर परिणाम सर्व जगभर दिसून येत आहेत. मानवी जीवनही यामुळे भविष्यात धोक्यात येते की काय अशी शंका येत आहे.

**४.३ जागतिकीकरण विरोधी नवे प्रवाह**

(New Trends of Antiglobalization)

जगामध्ये जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर जागतिक बँकेने आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने विकसित राष्ट्राबरोबरच अविकसित व विकसनशील राष्ट्रावर अनेक प्रकारचे निर्बंध लावले. त्या राष्ट्रावर हे निर्बंध, अटी स्वीकारण्यासाठी दबाव आणला आणि त्या राष्ट्रातील सेवा क्षेत्रावर, शेती क्षेत्रावर, औद्योगिक क्षेत्रावर, शिक्षण क्षेत्रावर कामगारावर व मागासलेल्या जाती-जमातीवर आयात-निर्यात धोरणावर मोठ्या प्रमाणात गंभीर स्वरूपाचे परिणाम झाले. त्यामुळे जागतिकीकरणाचे परिणाम झालेल्या घटकांनी समुदायांनी त्या त्या देशात आंदोलने उभी केली. त्यामधून जागतिकीकरणाच्या विरोधी वेगवेगळे प्रवाह उभे राहिले. त्याचा आढावा खालीलप्रमाणे आपणास सांगता येईल.

**१. मार्क्सवादी प्रवाह** : १९४५ नंतर शीतयुद्धाचा काळ सुरू झाला. जगाचे दोन महासत्तेमध्ये विभाजन झाले होते. भांडवलशाहीचा राष्ट्राचा अमेरिका गट तर साम्यवादी राष्ट्रांचा रशिया गट पुढे १९८६-८७ नंतर रशियाची अर्थव्यवस्था कोसळली. १९९० मध्ये रशियाचे पतन झाले. त्यामुळे समाजवादी गटाचे आंतरराष्ट्रीय सत्तासंतुलनाचे वातावरण संपुष्टात आले. युरोप व अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्या यांचे नेतृत्व भांडवलशाही

अमेरिकेकडे आल्याने जागतिकीकरण म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा नवा साम्राज्यवाद व त्यांची सत्तासूत्रे अमेरिकन साम्राज्यवाद्याकडे अशी जगभर कार्यरत असलेल्या मार्क्सवादी पक्ष संघटनांनी मांडणी केली. रशियाच्या पतनामुळे तिसऱ्या जगातील अविकसित व अप्रगत, मागास राष्ट्रावर आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना यांचा दबाव वाढला. यामुळे या तिसऱ्या जगातील असंघटित कामगार वर्गाचे श्रम स्वस्तात मिळून त्यांचे शोषण करणे बहुराष्ट्रीय कंपन्यांना सोपे झाले. या विरोधी जगामध्ये लहान-लहान असंघटित वर्गीय उठाव व प्रतिकार सुरू झाले. जगातील वेगवेगळ्या देशातील, तिसऱ्या जगासह भारतातील राज्ययंत्रणा बहुराष्ट्रीय भांडवलशाहीच्या धोरणामुळे कल्याणकारी योजनांपासून माघार घेऊन श्रमिक व असंघटित वर्गावर दमन यंत्रणा म्हणून कार्य करू लागली असे मार्क्सवादी विश्लेषण पुढे आले.

जागतिकीकरणाच्या पर्वामध्ये मनोरंजन इंडस्ट्री व मेडीया (प्रसार माध्यमे) यांची भूमिका साम्राज्यवादी वर्चस्व वाढविण्यात महत्त्वपूर्ण राहिली. त्यातून उत्तर आधुनिक उपभोगवादी भांडवली संस्कृती जन्माला आली असेही मार्क्सवादी आकलन सांगते. अशाप्रकारे जागतिकीकरणाच्या व उदारीकरण व खाजगीकरणाच्या माध्यमातून राज्याने कल्याणकारी योजना व कार्ये यावर निर्बंध घालून खाजगीकरणाला प्राधान्य दिले. त्यामुळे सामान्य लोकांच्या विकासावर व व्यक्तिस्वातंत्र्यावर निर्बंध आले आणि भांडवलदारांच्या हातातील राज्य बाहुले होईल त्यामुळे जागतिकीकरणाच्या विरोधामध्ये जगभर मार्क्सवादी प्रवाह पुढे आला.

**२. जमातवादी प्रवाह** : जागतिकीकरण व उदारीकरण स्वीकारल्यामुळे बहुराष्ट्रीय भांडवल आणि एक प्रकारची वैश्विक संस्कृती यांचा प्रचार व प्रसार सक्तीने व नकळत वेगवेगळ्या समाजावर, संस्कृतीवर, प्रदेशावर होऊन त्यांची पूर्वीची संस्कृती, धार्मिक ओळख पुसट होण्याची शक्यता वाढली आहे. याशिवाय खालच्या वर्गातील असंघटित जनसमुदायावर वर्चस्व गाजविण्यासाठी व आपले सत्तासंबंध व हितसंबंध टिकविण्यासाठी वरच्या वर्गाने जात, धर्म, भाषा, प्रदेश इत्यादी अस्मितेचे राजकारण सुरू केले. जागतिकीकरणामुळे पाश्चात्त्य संस्कृतीचे आक्रमण होऊन आपल्या धर्म, संस्कृतीला मोठा धोका निर्माण होतो म्हणून या जागतिकीकरणाच्या विरोधामध्ये आपआपल्या जमातवादी अस्मितेला जगातल्या वेगवेगळ्या भागात उठाव मिळाला. त्यातून धर्मांधता, पारंपरिक मूल्य आणि उघड-छुपेपणाने त्या-त्या समाज संस्कृतींमध्ये आणि धर्मांमध्ये भेदभावाचे वेगवेगळ्या पद्धतीने समर्थन करून जमातवादी चळवळी पुढे आल्या, तर काही राज्यशास्त्रज्ञाच्या मते जगभर मुस्लीम धर्मातील तरुण व त्यांच्या धर्मांध कर्मठ संघटना यांचा अत्यंत हिंसक दहशतवाद जो निर्माण झालेला आहे तो जागतिकीकरणातील अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या व साम्राज्यवादाच्या विरोधातून आलेला आहे. आणि जागतिकीकरणातून येणारी पाश्चात्त्य संस्कृतीमूल्य उपभोगवाद, तसेच आधुनिक दृष्टी यामुळे मुस्लीम धर्माला म्हणजे मुस्लीम धर्मातील सत्तास्थानी असलेल्या कर्मठ वरच्या वर्गाला याचा धोका वाटत आहे आणि त्यांच्यातर्फे दहशतवादाचा हिंस्र पद्धतीने वापर केला जात आहे.

भारतातही हिंदुत्ववादाचे राजकारण एका अर्थाने जागतिकीकरण म्हणजे पाश्चात्त्य संस्कृतीचे आक्रमण व हिंदूधर्म संस्कृतीला धोका या आशयातून मांडणी केली जात आहे. अशा प्रकारे जागतिकीकरण व उदारीकरण विरोधामध्ये जगभर जमातवादी प्रवाह पुढे आला आहे.

**३. फुले आंबेडकरी प्रवाह :** भारतामध्ये गेल्या हजारो वर्षांपासून समाजाला लागलेला कलंक म्हणजे जातीव्यवस्था होय. हजारो वर्षांपासून जातीव्यवस्थेतील शेवटचा घटक अनुसूचित जाती व जमाती ह्या विकासापासून व न्याय हक्कापासून दूरच होत्या. भारतात अस्पृश्यांना जनावरापेक्षाही कमी स्थान होते. कोणतेही अधिकार नव्हते. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जाती (Caste in India) हा ग्रंथ समाजातील जातिव्यवस्थेचा अभ्यास करून लिहिला आणि संपूर्ण आयुष्यभर जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी सर्व जाती धर्मासाठी समान स्वरूपामध्ये मूलभूत अधिकारांची तरतूद कलम १२ ते ३५ मध्ये केली आणि मार्गदर्शक तत्त्वामध्ये सर्व नागरिकाच्या, मागासलेल्या जाती-जमाती व महिला, लहान मुले वृद्ध यांच्या कल्याणासाठी कल्याणकारी योजना राबविण्याची तरतूद सुद्धा राज्यघटनेच्या कलम ३६ ते ५१ मध्ये केली.

फुले-आंबेडकरवादामध्ये जातिव्यवस्थेबरोबरच भांडवलशाहीला विरोध करण्याची भूमिका कार्यकर्त्यांनी घेतलेली आहे. भारतामध्ये संविधानात्मक कल्याणकारी राज्याचा पुरस्कार केल्यामुळ राज्याची गरीब, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग, शेतकरी, कामगार, बालके यांच्या विकासाची जबाबदारी प्रामुख्याने कल्याणकारी राज्याने पार पाडावी अशी घटनाकाराची अपेक्षा होती.

भारतातील राज्ययंत्रणा उच्च जाती वर्ग आणि बहुराष्ट्रीय भांडवलदारवर्ग यांच्या नियंत्रणात आहे. त्यामुळे बहुसंख्येने खालच्या वर्गाचे, जातीचे शोषण होत असते व त्यांना सामाजिक न्याय, हक्क, स्वातंत्र्य मिळत नाहीत. अशी मांडणी जागतिकीकरणानंतर उदारीकरण व खाजगीकरण स्वीकारल्यानंतर फुले-आंबेडकरी प्रवाहाने केली आहे. जागतिकीकरणानंतर कल्याणकारी योजना, सरकारी क्षेत्रातील नोकऱ्या, शिक्षण, आरक्षण यांच्या संकोचाचे (कपातीचे) धोरण मुक्त अर्थव्यवस्थेने स्वीकारल्याने आरक्षण व नोकर भरती कपात व नोकरभरतीचे बंदी यांचा फटका प्रामुख्याने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, भटक्या जाती-जमाती व इतर मागास प्रवर्गाच्या लोकांना बसलेला आहे असे फुले-आंबेडकरी मांडणी करीत आहेत. त्यामुळे मुक्त अर्थव्यवस्थेची धोरणे, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वर्चस्ववाद याला फुले-शाहू-आंबेडकरी पक्ष संघटनांनी संपूर्ण भारतभर विरोध दर्शविला.

१९९१ साली संविधानामध्ये समाजवादी भूमिका स्वीकारलेली असताना तत्कालीन नरसिंहराव सरकारने भारतीय संविधानाच्या विरोधात जावून मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले, त्यामुळे संविधानाची सामाजिक न्यायाची ताकद कमी झाली असा दावाही फुले-आंबेडकरवादी विचारप्रवाहानी केला आहे. त्यामुळे जागतिकीकरणात विरोधामध्ये अनेक लहान-मोठे फुले आंबेडकरी विचारप्रवाहानी उभे केले. मात्र जातीचा प्रश्न आजही सुटलेला नाही. त्यामुळे जागतिकीकरण हे मुळात भारताच्या संदर्भात जातीव्यवस्थेच्या पायावरच उभे आहे हे लक्षात घेऊन आजही खालच्या जातीवर अन्याय होतच आहे. आज तर सरकार व न्यायव्यवस्थाही या दलित आदिवासी स्त्रिया शेतकरी, बालक व कष्टकरी यांना सामाजिक न्याय देऊ शकत नसल्यामुळे या अन्यायवादी जागतिकीकरणाला विरोध करण्यासाठी फुले-आंबेडकरी विचारप्रवाह पुढे आला.

**४. स्त्रीवादी प्रवाह :** शेकडो वर्षे भारतामध्ये मनुस्मृतीने स्त्रियांना गुलामीत ठेवले. अनेक प्रकारची विकासविरोधी बंधने स्त्रियांवर लादली गेली. अशाच संपूर्ण जगभर २०व्या शतकाच्या सुरुवातीला जगभर स्त्रियांच्या हक्कांसाठी, मोर्चे काढले. १९६० ते १९७० च्या दशकामध्ये जगभर स्त्रीवादी चळवळी अस्तित्वात

आल्या, तशा स्त्रीवादी चळवळी १९९० नंतर आजपर्यंत कोठेही दिसून येत नाहीत. परंतु जागतिकीकरणानंतर अलीकडच्या काळात अनेक वेगवेगळ्या असंघटित लहान-लहान चळवळीत स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. त्याचबरोबर स्त्रीवादी अंगाने वेगवेगळ्या प्रश्नावर त्यांची मांडणी केली जात आहे. जागतिकीकरणाची रचना ही मुळात सुरुवातीपासून आर्थिक स्तरावरून पाहिली गेली परंतु सामाजिक अंगाने तिची मांडणी उशीरा केली गेली. जागतिकीकरणाची धोरणे वेगवेगळ्या देशात पूर्वीच्या जुन्या विषमतेच्या व्यवस्थेवरच उभी राहिल्याने भांडवलशाहीने निर्माण केलेला स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा आभास आता जास्त ठळकपणे चर्चिला जात आहे.

जागतिकीकरणाची आर्थिक धोरणे म्हणजे एका अर्थाने समाजाच्या तळाशी असलेल्या स्त्रियांच्या दडपशाहीची, दडपणूकीची आणि त्यांच्या अंकिती करणाची प्रक्रिया झाली आहे. दुसरीकडे सांस्कृतिकदृष्ट्या लिंगभेद आणि लिंगभावाची उत्तर आधुनिक संस्कृती पुढे येत आहे. स्त्रियांव्यतिरिक्त इतर लिंगी (बहुलिंगी) ओळखीची ठळक चर्चा पुढे आली आहे. समलिंगी व तृतीयपंथीयाची चळवळ जगातील वेगवेगळ्या देशामध्ये आपले अधिकार प्रस्थापित करण्यासाठी सुरू आहे. स्त्रीवादाच्या अंतर्गत लिंगभावाची व बहुलिंगीयाच्या न्याय हक्काची चळवळ म्हणून याकडे पाहिले जाते.

जात, जमात आणि राष्ट्रवाद इत्यादी समूहाच्या भेदरेषा स्त्रियांच्या शरीराच्या रणभूमीवरून ठरविल्या जात आहेत. म्हणून वेगवेगळ्या अर्थाने स्त्रियांनी व इतर लिंगी समुदायांनी जगाच्या पुनर्रचनेकडे पाहिले पाहिजे अशीही मांडणी स्त्रीवादी प्रवाह करीत आहेत. अशा प्रकारे आम्हाला आमचे न्याय, हक्क मिळावेत यासाठी जागतिकीकरणाच्या विरोधात स्त्रीवादी प्रवाह पुढे आला आहे.

**जागतिकीकरण विरोधात इतर प्रवाह**

जागतिकीकरणानंतर दोन ते अडीच दशकाच्या कालखंडामध्ये संपूर्ण जगात व भारतामध्ये वेगवेगळ्या समुदायाच्या, जागतिकीकरण विरोधात प्रतिकार करणाऱ्या चळवळी किंवा प्रवाह उभे राहिले. यातील अनेक समुदायाचे प्रवाह सबाल्टन म्हणजे वंचीत जनसमुदायाचे राहिलेले आहेत.

**१. पारंपरिक व्यवसायातील मजुरांचा प्रवाह :** कारखानदारी व्यतिरिक्त जगामधील व भारतामधील वेगवेगळ्या पारंपरिक उद्योग, व्यवसायामधील काम करून आपली उपजिवीका करणारे मजूर यांचे पारंपरिक उद्योग व्यवसाय, जागतिकीकरणानंतर जगातील प्रगत राष्ट्रांनी, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी, कार्पोरेट भांडवलशाहीने उद्ध्वस्त केले. त्यामुळे त्यांचे उद्योग-व्यवसाय बंद पडले व त्यातून लाखो मजूर बेरोजगार झाले. त्यामुळे जागतिकीकरणाला व उदारीकरणाला प्रतिकार करण्यासाठी मजुरांचा प्रवाह पुढे आहे.

**२. शेतकरी व शेतमजुरांचा प्रवाह :** भारतामध्ये किंवा जगातील सर्वच देशामध्ये जागतिकीकरण व उदारीकरण आणि खाजगीकरणानंतर नवे औद्योगिक धोरण स्वीकारले. या नव्या औद्योगिक धोरणानुसार प्रत्येक राज्याने आपल्या शेतकऱ्याच्या जमीन संपादीत करण्यासाठी भूसंपादन कायदा करून मातीमोल म्हणजे अगदी स्वस्त दराने शेतकऱ्याच्या हजारो एकर जमिनी संपादन केल्या. सेझ SEZ (Special Economic Zone) च्या

नावाखाली धोरणे राबवून परकीय गुंतवणूकदारांना, उद्योगपतींना ह्या जमिनी स्वस्त दराने दिल्या. शेतकऱ्यांची अनुदाने कपात केली. प्रगत देशातील शेतकऱ्याच्या मालाला-अन्नधान्याला मुक्त बाजारपेठेत परवानगी दिली. यामुळे भारतासारख्या मागास राष्ट्रातील शेतकऱ्याचा माल स्पर्धेत टिकू शकला नाही. शेतकऱ्यांना अनुदाने नसल्याने उत्पादनासाठी प्रचंड खर्च होत असल्याने उत्पादीत मालाला जगाच्या व स्थानिक बाजार पेठेत योग्य व किफायतशीर दर मिळणे अवघड झालो. त्यामुळे भारतामध्ये आजपर्यंत गेल्या २५ वर्षात जवळपास ३ लाख शेतकऱ्यांनी कर्जापोटी आत्महत्या केल्या. यातून शेतकरी कामगार पक्ष व शेतकरी संघटना यांनी ''सेझ हटाव, शेती बचाव'' 'जमीन अधिग्रहण कायदा रद्द झालाच पाहिजे', 'शेतीला अनुदाने मिळालीच पाहिजेत' शेतमालाला किफायतशीर दर व हमीभाव मिळालाच पाहिजे, 'भिक नको हवे घामाचे दाम' अशाप्रकारे प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरकारकडे मागण्या केल्या आणि जागतिकीकरणात भरडलेला शेतकरी व शेतमजूर कामगार यांचा प्रवाह पुढे आला आणि जागतिकीकरण विरोधी हा प्रवाह सर्व भारतभर किंवा जगभर मांडणी करीत आहे.

**३. पर्यावरणवादी प्रवाह** : जागतिकीकरणापूर्वी प्रत्येक देशात प्रचंड वने, वनराई, जंगले, डोंगर, किनारे होते. परंतु जागतिकीकरणानंतर व उदारीकरणानंतर तिसऱ्या जगातील व भारतातील मोठ्या प्रमाणात असलेल्या या नैसर्गिक साधनसंपत्तीवर बहुराष्ट्रीय कंपन्या कब्जा करीत आहेत. यामुळे बेसुमार खनिज, पाणी उपसणे, प्रचंड वृक्षतोड, जंगलतोड आणि विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची हानी, भव्य दिव्य बहुराष्ट्रीय कंपन्या व औद्योगिकी-करणामुळे प्रदुषणाची समस्या निर्माण झालेली आहे. आज तर (Global Warming) ग्लोबल वार्मिंगची समस्या निर्माण झालयामुळे जागतिक तापमानात प्रचंड वाढ होत आहे. त्यामुळ यांची झळ नैसर्गिक साधनसंपत्तीवर वन्य जीव व इतर पशुपक्षी व मानवी जीवनाला सुद्धा पोहोचलेली आहे. त्यामुळे जागतिकीकरण उदारीकरण आणि खाजगीकरण विरोधात पर्यावरणवाद्यांनी चळवळ सुरू केल्या आहेत.

आज जगभर जागतिकीकरणाच्या विरोधात पर्यावरणवाद्यांनी चळवळी उभ्या केलेल्या आहेत. केरळमध्ये नदीवर खाजगीरित्या भांडवलदाराने मक्तेदारी सांगितल्यानंतर पर्यावरणवाद्यांनी 'नदी वाचवा, पर्यावरण वाचवा' ही चळवळ सुरू केली. अनेक भांडवलदारांनी उद्योगपतीने व बहुराष्ट्रीय कंपन्यानी जंगले, नद्या, डोंगरे, समुद्रकिनारा यावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न चालू केला. यामुळे पर्यावरणवाद्यानी यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात तक्रारी, याचिका दाखल केलेल्या आहेत. जैव विविधतेचा मुद्दा लक्षात घेऊन वेगवेगळ्या परदेशातील शेती व वनस्पती व नैसर्गिक वस्तू यांचे स्थानिक बौद्धिक संपदा (पेटंटस्) अधिकाराच्या चळवळी पर्यावरणवाद्यानी उभ्या केल्या आहेत.

अशा प्रकारे जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या मोठमोठे उद्योगपतीचे कारखाने पर्यावरणाची हानी करीत असल्यामुळे पर्यावरणवाद्यांनी जागतिकीकरणाविरोधी लढा पुकारला यामुळे पर्यावरणवाद्याचा प्रवाह या विरोधात उभा राहिला.

## ४.४ सारांश

अशाप्रकारे जागतिकीकरणानंतर आर्थिक सुधारणाच्या धोरणामुळे राज्यावर खूप मोठ्या प्रमाणात परिणाम झाले. मात्र जागतिक बँकेच्या व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व प्रगत राष्ट्राच्या व उद्योगपतीच्या दबावापोटी राज्याने इच्छेने नव्हे तर सक्तीने जागतिकीकरण, उदारीकरण स्वीकारलेले असल्यामुळे जागतिकीकरणाच्या विरोधी वेगवेगळे नवे प्रवाह उभे राहिले. त्यांनी मोठमोठ्या चळवळी उभ्या केल्या आणि न्याय हक्कासाठी एकत्र येऊन संघटीतपणे किंवा काही समुदायांनी असंघटित असतानाही जागतिकीकरणाला प्रखर विरोध केलेला आहे. अशा प्रकारे जागतिकीकरणाच्या विरोधी नवनवीन प्रवाह उभे राहिले.

हे जागतिकीकरणाच्या विरोधी प्रवाह उभे राहिल्यामुळे राज्याला काही धोरणे बदलणे भाग पडलेले आहे. कितीही राज्यावर जागतिक बँकेचा दबाव असला तरीही पूर्णपणे लोकमत विरोधात जाणे कोणत्याही राज्याला (सरकारला) परवडत नाही. अन्यथा संपूर्ण राज्यभर जनसमुदाय विरोधात गेले तर सरकार चालविणे अशक्य आहे. त्यामुळे आपल्या मागे बहुमत असावे यासाठी राज्याला, सरकारला काही धोरणे लोकमताच्या रेट्यामुळे बदलावे लागतात. या जागतिकीकरण विरोधी प्रवाहामुळे राज्याने नक्कीच आपल्या काही धोरणात कायद्यात सुधारणा केलेल्या आहेत. हे फक्त जनसमुदायाच्या रेट्यामुळेच.

## ४.५ पारिभाषिक शब्द

- **जागतिकीकरण** : Globalization शब्द जागतिक आर्थिक प्रक्रियेशी संबंधीत आहे. या जागतिकीरण या प्रक्रियेमध्ये जागतिक अर्थव्यवस्थेचे एकात्मीकरण केले जाते. प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेला जोडून त्यानुसार आपल्या अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल केले जातात.

- **उदारीकरण** : उदारीकरण ही आर्थिक प्रक्रिया आहे. म्हणजेच अर्थव्यवस्थेतील शासकीय हस्तक्षेप व नियंत्रण कमी करण्याकडे कल असणाऱ्या धोरणांचा अवलंब करणारी प्रक्रिया होय. या प्रक्रियेत राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राला अधिक सहभागी करून घेण्यात येते. जागतिकीकरणाकडे जाण्यासाठी उदारीकरण ही एक दिशा आहे. या प्रक्रियेमध्ये शासकीय उद्योगधंद्याच्या खाजगीकरणावर भर देवून आयात कर कमी केले जातात.

- **खाजगीकरण** : सार्वजनिक किंवा राष्ट्रीय उद्योगधंद्याची किंवा महामंडळे व कंपन्यांची मालकी व नियंत्रण खाजगी व्यक्ती, उद्योगपतींकडे किंवा खाजगी कंपनीला हस्तांतरित करणे. तसेच एखादी औद्योगिक कंपनी सार्वजनिक क्षेत्रातून खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरीत करण्याच्या प्रक्रियेला खाजगीकरण म्हणतात.

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

**प्रश्न १ : रिकाम्या जागा भरा.**

१. जागतिकीकरण ही संकल्पना .......... या संदर्भात वापरली जाते.

(अ) आर्थिक जागतिकीकरण (ब) सामाजिक जागतिकीकरण

(क) सांस्कृतिक जागतिकीकरण (ड) यापैकी नाही.

२. जागतिकीकरण म्हणजे राष्ट्राराष्ट्राच्या राजकीय सीमा ओलांडून विस्तारीत झालेली आर्थिक क्रिया होय असे .......... यांनी म्हटले आहे.

(अ) चार्लस हिल (ब) जगदीश भगवती (क) दिपक नायर (ड) यापैकी नाही

३. उपभोग्य वस्तूंवर सर्वच वस्तूवरील आयात निर्बंध हळूहळू रद्द करणे, आयात करात कपात करणे आणि सार्वजनिक उद्योगधंद्याचे खाजगीकरण करणे म्हणजे जागतिकीकरण असे .......... यांनी म्हटले आहे.

(अ) स्टिगलिड्स (ब) बायलिस

(क) जागतिक बँक (ड) रिझर्व बँक ऑफ इंडिया

४. भारतात जागतिकीकरणाची प्रक्रिया .......... मध्ये सुरू झाली.

(अ) १९९१ (ब) १९९५ (क) २००० (ड) २०१४

५. FDI हे .......... उदाहरण आहे.

(अ) जागतिकीकरणाचे (ब) राष्ट्रवादाचे (क) अमेरिका (ड) जपान

६. GATT करार .......... येथे तयार झाला.

(अ) युराग्वे (ब) भारत (क) अमेरिका (ड) जपान

**प्रश्न २ : जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| १. खुली अर्थव्यवस्था | (अ) जागतिकीकरणाचा नवा प्रवाह |
| २. युराग्वे | (ब) १९९१ |
| ३. फुले आंबेडकरी प्रवाह | (क) जागतिकीकरण |
| ४. भारतात जागतिकीकरणाचा स्वीकार | (ड) उदारीकरण |
| ५. आयात निर्बंध व कपात | (इ) GATT |

**प्रश्न ३ : एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. जागतिकीकरण म्हणजे काय ?

२. जागतिकीकरण प्रमुख घटक सांगा.

३. भारताने जागतिकीकरण कोणत्या साली स्वीकारले ?

४. महाराष्ट्रात सर्वप्रथम कोणाच्या नेतृत्वाखाली जागतिकीकरणाविरुद्ध आंदोलन झाले ?

५. जागतिकीकरणात नोकर कपात का करण्यात आली ?

**उत्तरे :**

**प्रश्न १ :** १. (अ) आर्थिक जागतिकीकरण २. (क) दिपक नायर

३. (क) जागतिक बँक ४. (अ) १९९१

५. (अ) जागतिकीकरणाचे ६. (अ) युराग्वे

**प्रश्न २ :** १. (अ) जागतिकीकरण २. (ब) GATT

३. (क) जागतिकीकरणाचे नवे प्रवाह ४. (ड) १९९१

५. (इ) उदारीकरण

**प्रश्न ३ :** १. देशाची अर्थव्यवस्था खुली करून त जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडण्याचा प्रयत्न करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

२. (अ) वस्तू व सेवांचा मुक्तप्रवाह, (ब) तंत्रज्ञानाचा मुक्त प्रवाह, (क) श्रमाचा मुक्त प्रवाह आणि भांडवलाचा मुक्त प्रवाह हे चार प्रमुख घटक आहेत.

३. भारताने १९९१ साली जागतिकीकरण स्वीकारले.

४. महाराष्ट्रात सर्वप्रथम शेतकरी कामगार पक्षाचे नेते मा. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली जागतिकीकरणाविरुद्ध आंदोलन झाले.

५. जागतिकीकरणात सार्वजनिक उद्योगधंद्याचे खाजगीकरण झाल्यामुळे व तंत्रज्ञानामुळे नोकरकपात करण्यात आली आहे.

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

**प्रश्न १ : टिपा लिहा.**

१. जागतिकीकरण

२. उदारीकरण

३. जागतिकीकरण विरोधी इतर प्रतिकार करणारे प्रवाह

४. स्त्रीवादी प्रवाह

५. मार्क्सवादी प्रवाह.

६. जागतिकीकरणात शेतीक्षेत्रापुढे कोणते आव्हान निर्माण झाले ?

**प्रश्न २ : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. जागतिकीकरण म्हणजे काय ते सांगून स्वरूप स्पष्ट करा.

२. जागतिकीकरणाचे राज्यावरील परिणाम स्पष्ट करा.

३. जागतिकीकरणाच्या विरोधी नवे प्रवाह स्पष्ट करा.

## ४.८ संदर्भसूची


१. जैन निरज : जागतिकीकरण की नवी गुलामगिरी, लोकायत प्रकाशन, पुणे.

२. पंडित नलिनी : जागतिकीकरण आणि भारत, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

३. पाटील एकनाथ (संपा.) : जागतिकीकरण आणि वर्तमान आव्हाने, प्राचार्य विश्वास सायनाकर गौरव अंक.

४. डॉ. तेलतुंबडे आनंद : सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण

६. डॉ. चव्हाण दिलीप : साम्राज्यवाद आणि संस्कृती

७. प्रा. डॉ. बोर्डे खडसे सुनिता/प्रा. डॉ. एस. के. खडसे : ऐतिहासिक परिक्षेत्रातील स्त्रिया, शुभम अतकर पब्लिकेशन, पुणे.

८. खातु गजानन : जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन.


❖❖❖